

लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर साहेब

जनसेवेचे अमृतपर्व

लोककल्याणाच्या अखंड सेवेचा प्रेरणादायी जीवनप्रवास!

रयत शिक्षण संस्थेचे

लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
मोखाडा, जि. पालघर - ४०१ ६०४

जनसेवेचे अमृतपर्व

लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी गौरव ग्रंथ

ISBN : 978-81-994069-0-2

© लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा,
ता. मोखाडा, जि. पालघर - ४०१ ६०४. फोन नं.: ०२५२९ - २९५१०१, २९५७२८
ईमेल : asccmokhada@gmail.com । वेबसाईट : www.asccmokhada.co.in

प्रकाशन : ०९ ऑगस्ट २०२६

- संपादक
  प्रा. संजोग रामकिसन व्हंडे,
  सहाय्यक प्राध्यापक, विभागप्रमुख रसायनशास्त्र,
  लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा,
  ता. मोखाडा, जि. पालघर - ४०१ ६०४.

- सह-संपादक
  प्रा. विवेक मिलिंद मोरे, ग्रंथपाल
  लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा,
  ता. मोखाडा, जि. पालघर - ४०१ ६०४.

- मुखपृष्ठ व मांडणी
  शरद बोंबले, सिन्नर


- प्रकाशक
  बुकनुक पब्लिकेशन, नाशिक
  मो. ७५५९२०५१५०

- मुद्रक
  विकास प्रिंटिंग ॲन्ड कॅरिअर्स प्रा. लि. ,
  एमआयडीसी, सातपूर, नाशिक - ४२२ ००७. मो. ७२१९६११२९८

साहित्य प्रकार : लेख संग्रह
पृष्ठ संख्या : १००

खाजगी वितरणासाठी

रयत शिक्षण संस्था, सातारा



संस्थापक

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

डी. लिट.



रयत माऊली

त्यागभूर्ती सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील



लोकनेते

मा.खा. रामशेठ ठाकूर साहेब

सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा

रयत शिक्षण संस्थेचे

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा, जि. पालघर - ४०१ ६०४



सन्मानपत्र

मा.खा. रामशेठ ठाकूर साहेब

अमृत महोत्सवानिमित्त कृतज्ञ अभिवादन!

आपले संपूर्ण जीवन समाजसेवा, शिक्षणप्रसार, ग्रामीण विकास आणि जनकल्याणासाठी समर्पित राहिले आहे. दूरदृष्टी, कार्यतत्परता आणि लोकाभिमुख नेतृत्वाच्या बळावर आपण असंख्य विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित केली. शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, या विचाराने प्रेरित होऊन आपण अनेक शैक्षणिक उपक्रमांना दिशा, प्रेरणा आणि भक्कम आधार दिला.

आपल्या अथक प्रयत्नांमुळे ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या. आपले नेतृत्व, साधेपणा, कार्यनिष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव, भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहेत. आपण रुजविलेली मूल्ये, शिक्षणाबद्दलची निष्ठा आणि समाजहिताची भावना आमच्यासाठी सदैव मार्गदर्शक राहील. आपले प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व, दूरदर्शी विचार आणि लोककल्याणासाठीची निःस्वार्थ बांधिलकी भावी पिढ्यांसाठी सदैव मार्गदर्शक राहो, हीच सदिच्छा.

आपल्या सच्च्या लोकसेवेचा, साधेपणाचा, कार्यतत्परतेचा आणि समाजहितासाठीच्या अखंड समर्पणाचा गौरव म्हणून, आपल्या अमृत महोत्सवानिमित्त, रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा, परिवारातर्फे आपणास हे सन्मानपत्र अत्यंत आदरपूर्वक व कृतज्ञतापूर्वक अर्पण करण्यात येत आहे.

आपल्या कार्याचा गौरव करताना आम्हाला मनस्वी आनंद आणि अभिमान वाटतो आहे.

ईश्वरचरणी आपणास उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड कार्यशक्ती आणि निरंतर यश लाभो, ही मनःपूर्वक प्रार्थना.

अमृत महोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

डॉ. ए. एन. चांदोरे, प्र. प्राचार्य,
लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा, जि. पालघर

संस्था पदाधिकारी



पद्मविभुषण

मा.खा. शरदचंद्रजी पवार साहेब

अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा. चंद्रकांत दळवी

चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा. ॲड. भगीरथ शिंदे

व्हा. चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा.खा. रामशेठ ठाकूर

सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था



मा. अनिल पाटील

संघटक, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा. बाळाराम पाटील

चेअरमन, रायगड विभाग, रयत शिक्षण संस्था , सातारा



मा. विकास देशमुख

सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा.प्रिं.डॉ. शिवलिंग मेनकुदळे

सहसचिव, (उ.शि.),



मा. प्रिं. डॉ. राजेंद्र मोरे

सहसचिव, (ऑडीटर)



मा. बंडू पवार

सहसचिव, (माध्य.)



लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर साहेब

जनसेवेचे अमृतपर्व

लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी गौरव ग्रंथ

संपादकीय समिती

डॉ. ए. एन. चांदोरे
अध्यक्ष
प्र. प्राचार्य, लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालय, मोखाडा

संपादक
प्रा. एस. आर. व्हंडे

सह-संपादक

प्रा. व्ही. एम. मोरे
डॉ. एस. जी. मेंगाळ

सदस्य

डॉ. ए. एल. शेख
प्रा. एस. ए. फुंदे
प्रा. टी. एम. पराडके
प्रा. ए. डी. वरठा
डॉ. आर. ए. कवळे
प्रा. पी. टी. भोये



शुभेच्छा संदेश

मा. खा. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांना आदरपूर्वक अभिवादन करताना आम्हा सर्वांसाठी हा अत्यंत आनंदाचा, अभिमानाचा आणि कृतज्ञतेचा क्षण आहे. समाजकारण, शिक्षण, ग्रामीण विकास आणि जनसेवा या क्षेत्रांत आपल्या दूरदृष्टी, कार्यतत्परता आणि लोकाभिमुख नेतृत्वाने मा. रामशेठ ठाकूर साहेब यांनी एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या कार्यातून असंख्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या, ग्रामीण व आदिवासी भागातील विकासाला नवी दिशा मिळाली आणि समाजहिताच्या विविध उपक्रमांना बळ प्राप्त झाले.

रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा या महाविद्यालयाच्या माध्यमातूनही त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रेरणादायी वारसा आदिवासी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे. शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, हा त्यांचा दृढ विश्वास आमच्यासाठी सदैव प्रेरणादायी राहिला आहे. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेमाची जाणीव निर्माण करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत.

अमृत महोत्सव हा केवळ वाढदिवसाचा उत्सव नसून समाजासाठी समर्पित आयुष्याचा गौरव करणारा सोहळा आहे. या निमित्ताने त्यांच्या कार्याचा आदर्श नव्या पिढीसमोर ठेवण्याची आणि समाजसेवेची प्रेरणा देण्याची संधी आम्हाला लाभत आहे, ही आमच्यासाठी गौरवाची बाब आहे.

मा. रामशेठ ठाकूर साहेब यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड कार्यशक्ती आणि निरंतर यश लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांचे प्रेरणादायी नेतृत्व समाजाला पुढील अनेक वर्षे लाभत राहो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

डॉ. ए. एन. चांदोरे
प्र. प्राचार्य,
लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालय,
मोखाडा, जि. पालघर



संपादकीय

अमृतवर्ष : कर्तृत्व, समर्पण, कृतज्ञता आणि प्रेरणेचा गौरव सोहळा!

काही व्यक्ती आपल्या कर्तृत्वाने यशस्वी ठरतात; काही आपल्या नेतृत्वाने समाजाला दिशा देतात; तर काही आपल्या दातृत्व, दूरदृष्टी आणि निःस्वार्थ लोकसेवेमुळे काळाच्या पलीकडे जाऊन प्रेरणास्थान बनतात. लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर हे अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. त्यांचे अमृत वर्ष म्हणजे केवळ पंचाहत्तरीचा एक टप्पा नव्हे, तर संघर्ष, कष्ट, जिद्द, शिक्षणप्रेम, समाजसेवा, मानवता आणि लोककल्याण यांच्या अखंड सेवेचा गौरव करणारा ऐतिहासिक सुवर्ण क्षण आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या "कमवा आणि शिका" या संस्कारक्षम योजनेतून घडलेला एक विद्यार्थी, उद्योगविश्वात यशस्वी उद्योजक, एक प्रभावी लोकप्रतिनिधी, शिक्षणप्रेमी, समाजहित जपणारा आणि दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून उभा राहतो, ही केवळ प्रेरणादायी कथा नाही; तर शिक्षण, परिश्रम आणि मूल्यनिष्ठ जीवनदृष्टीच्या सामर्थ्याची साक्ष आहे. संघर्षातून मिळविलेले यश समाजाला परत देण्याची त्यांची वृत्ती हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख आहे.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, हा कर्मवीर पद्मभूषण डॉ. भाऊराव पाटील यांचा विचार लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी आपल्या कार्यातून व कृतीतून जिवंत ठेवला. ग्रामीण, आदिवासी व वंचित विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शैक्षणिक सुविधा उभारणे, संशोधनाला प्रोत्साहन देणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून असंख्य विद्यार्थ्यांच्या जीवनात नवी आशा निर्माण करणे, हे त्यांचे शिक्षणक्षेत्रातील मोलाचे योगदान आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा या शाखेच्या विकासामध्ये त्यांचे योगदान अविस्मरणीय आहे. आदिवासी व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शहरांतील विद्यार्थ्यांप्रमाणे दर्जेदार शिक्षण मिळावे, या ध्येयातून आधुनिक इमारत, प्रयोगशाळा, स्मार्ट वर्ग खोल्या, इंटराक्टीव स्मार्ट बोर्ड, संशोधन सुविधा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि विविध शैक्षणिक उपक्रमांची उभारणी झाली. आज या महाविद्यालयाने राष्ट्रीय स्तरावर गुणवत्ता सिद्ध करत नॅकचे 'A+' मानांकन आणि मुंबई विद्यापीठाचा ग्रामीण भागातील "सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार" प्राप्त करून शैक्षणिक गुणवत्तेचा नवा आदर्श निर्माण केला आहे., यामागे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांची दूरदृष्टी, नियोजन आणि सातत्यपूर्ण पाठबळ यामुळे हा प्रवास शक्य झाला.

अमृत महोत्सव वर्षानिमित्त प्रकाशित होत असलेला **'जनसेवेचे अमृतपर्व'** हा गौरवग्रंथ केवळ अभिनंदनपर लेखांचा संग्रह नाही; तर एका प्रेरणादायी जीवनप्रवासाची, एका लोकनेत्याच्या विचारांची, त्यांच्या कार्याच्या सामाजिक परिणामांची आणि शिक्षणाविषयीच्या त्यांच्या असामान्य बांधिलकीची दस्तऐवजी नोंद आहे. या ग्रंथातील लेख, आठवणी, अनुभव, अभ्यासपूर्ण लेखन आणि शुभेच्छा संदेश यांच्या माध्यमातून लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात आला आहे.

या गौरवग्रंथाच्या निर्मितीत महाविद्यालयातील प्राध्यापक यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यांच्या मौलिक लेखनामुळे हा ग्रंथ अधिक समृद्ध झाला आहे. या सर्वांचे संपादक समितीच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. तसेच हा गौरवग्रंथ भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी संदर्भग्रंथ ठरेल, अशी आम्हाला खात्री आहे. संघर्षातून यश संपादन करताना समाजाशी असलेली बांधिलकी कशी जपावी, शिक्षणातून परिवर्तनाची वाट कशी घडवावी आणि यशाच्या शिखरावर पोहोचूनही नम्रता, संवेदनशीलता व समाजऋणाची जाणीव कशी टिकवावी, याचे प्रेरणादायी दर्शन या ग्रंथातून प्रत्येक वाचकाला घडेल.

लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त त्यांच्या महान कार्याला कृतज्ञ अभिवादन अर्पण करीत, त्यांना निरोगी, दीर्घायुष्य लाभावे आणि त्यांची जनसेवा व शिक्षणसेवेची प्रेरणादायी परंपरा अशीच अखंड सुरू राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

"कर्तृत्वाने उंचावलेले व्यक्तिमत्त्व, शिक्षणातून समाज घडविण्याचा ध्यास; लोककल्याणाच्या अखंड सेवेतच सामावले आहे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे खरे मोठेपण."

प्रा. एस. आर. व्हंडे
संपादक
लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर
अमृत महोत्सवी गौरव ग्रंथ

अनुक्रमणिका

१.	**मी अनुभवलेले मा. खा. लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब : मोखाडा महाविद्यालयाचे आधारस्तंभ** – डॉ. ए. एन. चांदोरे (प्र. प्राचार्य)	१३
२.	**लोकनेते मा. रामशेठ ठाकूरः समाजसेवेच्या आकाशातील तेजस्वी ध्रुवतारा** - प्रा. डॉ. एस. जी. मेंगाळ	१५
३.	**लोकनेते मा. रामशेठ ठाकूरः शिक्षण, समाजकारण आणि विकासाभिमुख नेतृत्व** - प्रा. व्ही. एम. मोरे	१८
४.	**एक थोर व्यक्तिमत्वः लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूरः** - डॉ. ए. एल. शेख	२२
५.	**मोखाडा महाविद्यालयाचा आधारवड : लोकनेते मा. रामशेठ ठाकूर** - प्रा. एस. ए. फुंदे	२५
६.	**लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : शिक्षण क्षेत्रातील परिवर्तनाचे शिल्पकार** - प्रा. टी. एम. पराडके	२९
७.	**लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : शिक्षण, समाजकारण आणि विकासदृष्टीचे प्रेरणास्थान** - प्रा. ए. डी. वरठा	३२
८.	**लोकसेवेचा दीपस्तंभ : लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर** - प्रा. एस. आर. व्हंडे	३४
९.	**लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : शिक्षण, संशोधन आणि समाजपरिवर्तनाचे दूरदर्शी शिल्पकार** -प्रा. डॉ. आर. ए. कवळे	३७
१०.	**मा. रामशेठ ठाकूर : शिक्षण विकासातील योगदानाचा अभ्यास** - प्रा. पी. टी. भोये	३९
११.	**लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे शिक्षण क्षेत्रातील अतुलनीय योगदान** - प्रा. एच. एम. महाले	४२
१२.	**करुणाशील व दातृत्ववान : लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर** - प्रा. पी. आर. हवाले	४४
१३.	**शैक्षणिक क्षेत्रातील "निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू" – लोकनेते मा. रामशेठ ठाकूर** - प्रा. डी. आर. भोये	४७
१४.	**देणाऱ्याने देत जावे...** - प्रा. के. के. पारधी	५१
१५.	**"माझ्या अनुभवातील मोखाडा महाविद्यालयाचा परिवर्तनप्रवासः लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या दूरदृष्टीचे प्रेरणादायी योगदान"**- प्रा. एस. के. डामसे	५३
१६.	**शिक्षण क्षेत्राला नवसंजीवनी देणारे आधुनिक काळातील 'एकलव्य': लोकनेते मा. रामशेठ ठाकूर** - प्रा. डॉ. एम. आर. खंबाईत	५६

१७.	**आदिवासी लोकांच्या जीवनातील ध्रुवतारा– मा. खा. रामशेठ ठाकूर** - प्रा. डॉ. व्ही. एम. डोंगरदिवे	६०
१८.	**लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : सेवाभावी नेतृत्व** - प्रा. पी. एल. नाडेकर	६३
१९.	**लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : समाजसेवा, शिक्षण आणि विकासाचे प्रेरणास्थान** - प्रा. पी. एस. राऊत	६६
२०.	**एक कल्पतरू: लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर** - प्रा. एस. आर. झुगरे	६८
२१.	**शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तन: लोकनेते मा. रामशेठ ठाकूर** -प्रा. बी. पी. कनोजा	७१
२२.	**लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर : शिक्षण, समाजसेवा आणि लोककल्याणाचे खरे उपासक** - प्रा. के. व्ही. धनेश्वर	७३
२३.	**शिक्षण आणि मानवतेचा दीपस्तंभ : लोकनेते मा. रामशेठ ठाकूर** - प्रा. बी. एल. बोंड	७५
२४.	**लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर यांचे सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान** - प्रा. एम. के. खादे	७७
२५.	**लोकनेते मा. रामशेठ ठाकूर: लोकहितासाठी आयुष्य वेचलेले शिक्षणमहर्षी व समाजसेवक : लोकनेते मा. रामशेठ ठाकूर** - प्रा. टी. एस. जाबर	७९
२६.	**लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : दानशूर व्यक्तिमत्त्व, शिक्षणप्रेमी आणि समाजसेवेचा आधारवड** - प्रा. डी. बी. महाले	८१
२७.	**लोकनेते मा. रामशेठ ठाकूर: कर्तृत्व, दानशूरता आणि जनसेवेचे महापर्व** - प्रा. पी. के. कुवरे	८३
२८.	**लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे ग्रामीण भागातील शिक्षणाचे कार्य व वृक्षप्रेम** - प्रा. डॉ. डी. बी. बोरुडे	८५
२९.	**युगप्रवर्तक: लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर** - प्रा. डॉ. एन. ए. माधव	८७
३०.	**सर्वसामान्यांचे 'आधारवड' लोकनेते रामशेठ ठाकूर** - प्रा. बी. एस. बांगर	८९
३१.	**लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : शैक्षणिक क्षेत्रातील आधारस्तंभ** - प्रा. दिलीप पागी	९१
३२.	**लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : जनसेवा, शिक्षण आणि मानवतेचा दीपस्तंभ** - प्रा. डी. टी. सावंत	९३
३३.	**लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या दूरदृष्टीतून साकारलेला परिवर्तनाचा प्रेरणादायी प्रवास** - प्रा. व्ही. पी. बोबे	९५
३४.	**शिक्षण, संस्कार आणि मानवसेवेचे युगपुरुष: लोकनेते मा. रामशेठ ठाकूर** - प्रा. आर. डी. घाटाळ	९९

मी अनुभवलेले मा. खा. लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब : मोखाडा महाविद्यालयाचे आधारस्तंभ



डॉ. ए. एन. चांदोरे

प्र. प्राचार्य, लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालय, मोखाडा

मा. खा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे सामाजिक व राजकीय कार्याबरोबर शैक्षणिक कार्यात प्रचंड मोठे योगदान आहे. रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा, जिल्हा-पालघर या महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक म्हणून काम करत असताना सन २०२२ मध्ये रामशेठ ठाकूर साहेब व माझी पहिली भेट झाली. शहराप्रमाणे आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुविधांमध्ये कोणतीही तफावत राहता कामा नये ही साहेबांची भूमिका होती. त्यावेळी महाविद्यालयाचे नॅक झालेले नव्हते आणि महाविद्यालयाची आर्थिक परिस्थिती ही नाजूक होती तेव्हा साहेबांनी सी.डी. सी. मिटिंग मध्ये सांगितले की महाविद्यालयाचे नॅक पूर्ण होण्यासाठी इमारत, प्रयोगशाळा व जे काय लागेल ते उभे करा, व त्यासाठी लागणाऱ्या निधीची काळजी करू नका, सर्व पैसा मी देईन एवढ्या एका वाक्यातच त्यांनी विश्वास व्यक्त करून प्रचंड पाठबळ दिले आणि महाविद्यालयासाठी कुठलाही निधी कमी पडू दिला नाही. रामशेठ ठाकूर साहेबांचे झाडांवरती व निसर्गावरती असलेले प्रेम मला एका अनुभवातून सांगावेसे वाटते, जेव्हा महाविद्यालयामध्ये प्रशासकीय इमारत बांधायची होती त्यावेळेस तेथे एक जांभळाचे उंच झाड होते, त्यावेळेस साहेबांनी ते बघितले आणि लगेच सांगितले इमारत थोडी बाजूला सरकली तरी चालेल परंतु हे जांभळाचे झाड तोडायचे नाही.

जून २०२४ पासून मला प्र.प्राचार्य पदाची धुरा सांभाळताना साहेबांबद्दल आलेले अनुभव मी इथे नमूद करू इच्छितो. मोखाडा महाविद्यालयाचे आर्थिक परिस्थिती नाजूक असल्यामुळे सी.डी.सी. मिटिंग मध्ये बऱ्याचशा आर्थिक विषयावरती चर्चा व्हायची, त्यावेळेस रामशेठ ठाकूर साहेब कुठल्याही गोष्टीचा विचार न करता महाविद्यालयासाठी भरघोस निधी देणगी म्हणून देत. रयत शिक्षण संस्थेच्या ध्येय धोरणानुसार सर्व महाविद्यालयांमध्ये इंटरऍक्टिव्ह पॅनल बसविणे गरजेचे होते त्यावेळेस आम्ही रामशेठ ठाकूर साहेबांकडे या विषयावर चर्चा करण्यासाठी गेलो, त्यावेळेस साहेबांनी एका क्षणार्धात बारा लाख रुपयांचा चेक आमच्याकडे सुपूर्द केला व आम्हाला सांगितले की महाविद्यालयाच्या सर्व वर्गामध्ये व प्रयोगशाळेमध्ये इंटरऍक्टिव्ह पॅनल बसवून घ्या, मोखाड्यातील विद्यार्थ्याला सर्व अत्याधुनिक सुविधा मिळाल्या पाहिजे. आमच्यासारखे अनेक जण साहेबांकडे मदत मागण्यासाठी दररोज येत असतात आणि दारी आलेल्या कोणालाही साहेब रिकामी हाती जाऊ देत नाहीत. एवढे

सर्व असून सुद्धा साहेबांचा शांत स्वभाव आणि साधे राहणीमान हे सर्वांनाच भावून जाते.

सन २०२४-२५ च्या वार्षिक पारितोषिक कार्यक्रमाच्या निमित्ताने साहेब महाविद्यालयामध्ये उपस्थित होते, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की मोखाडा परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये खूप चांगले कलागुण आहेत आणि त्यांना वाव देणे गरजेचे आहे, त्यासाठी त्यांनी लगेच महाविद्यालयातील संगीत साहित्य व इतर साहित्य घेण्यासाठी रुपये वीस लाखाची देणगी जाहीर केली आणि पुढील दोनच दिवसात त्याचा चेक संस्थेकडे सुपूर्द केला.

रयत शिक्षण संस्थेच्या ध्येय धोरणानुसार सर्व विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना कृत्रिम बुद्धीमत्ता (AI) शिकण्यासाठी महाविद्यलयात AI ची लॅब करणे गरजेचे होते. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पहिल्याच सी.डी.सी. मिटिंगमध्ये मा. रामशेठ ठाकूर साहेब यांनी ३० लाख रुपये देणगी दिली व या देणगीतून AI लॅब तयार करण्यात आली व तसेच महाविद्यालयातील विनाअनुदानित प्राध्यापक व सेवकांचे मानधन देण्यात आले. तसेच सन २०२५-२६ च्या वार्षिक पारितोषिक कार्यक्रम, कृत्रिम बुद्धीमत्ता (AI) लॅब व लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कलामंच उद्घाटन कार्यक्रमाच्या निमित्ताने साहेब महाविद्यालयामध्ये उपस्थित होते त्यावेळी साहेबांनी महाविद्यालय विकासासाठी पुन्हा एकदा ३८ लाख रुपयांचा निधी महाविद्यालयास दिला. सन २०२४ ते २०२६ या दोन वर्षात एकूण एक कोटी रुपयाचा निधी महाविद्यालयास उपलब्ध करून दिला. या अगोदर साहेबांनी सन २०२१ ते २०२३ या वर्षादरम्यान पाच कोटी पेक्षा जास्त देणगी या महाविद्यालयाला दिलेली असून त्यातून महाविद्यालयाची प्रशासकीय इमारत, व नवीन रयत शताब्दी इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले.

लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालय हे महाराष्ट्र शासनाच्या परिसस्पर्श योजने अंतर्गत मुंबई विद्यापीठाने पालघर जिल्ह्यातील महाविद्यालयांना मार्गदर्शनासाठी नियुक्त केलेले प्रमुख महाविद्यालय आहे. तसेच नॅक मूल्यांकनांमध्ये ए प्लस ग्रेड व ३.४३ सी.जी.पी.ए. मिळवणारे पालघर जिल्ह्यातील एकमेव महाविद्यालय आहे. महाविद्यालयास मुंबई विद्यापीठाकडून दिला जाणारा ग्रामीण भागातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार हा केंद्रीय मंत्री मा. किरेन रिजिजू यांच्या हस्ते दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबई विद्यापीठात प्रदान करण्यात आला. याचे श्रेय जाते ते मा. खा. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर या दानशूर व्यक्तिमत्त्वाला. महाविद्यालयाचा झालेला कायापालट व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचा विकास हे साहेबांच्या दुरदृष्टीकोनामुळेच शक्य झालेले आहे.

याव्यतिरिक्त रामशेठ ठाकूर साहेब यांच्या महाविद्यालयातील भेटीदरम्यान ते विद्यार्थी, सेवक, शिक्षकेतर कर्मचारी, प्राध्यापक, प्राचार्य या सर्वांची आवर्जून विचारपूस करतात. मोखाड्यासारख्या दुर्गम भागात रामशेठ ठाकूर साहेब वर्षातून किमान तीन ते चार वेळा भेट देत असतात ते फक्त आदिवासी विद्यार्थी व बांधवांविषयीची आत्मीयता, तळमळ आणि त्यांच्या कल्याणाचा ध्यास यामुळेच.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा हे पालघर जिल्ह्यातील उत्कृष्ट व सुंदर महाविद्यालय म्हणून ओळख, त्याचबरोबर महाविद्यालयासाठी आवश्यक असणारी प्रशस्त इमारत, अद्ययावत प्रयोगशाळा, सुसज्ज वर्ग खोल्या, संशोधन लॅब, कम्प्युटर लॅब, प्रशासकीय इमारत, खेळाचे मैदान, बोटॅनिकल गार्डन इत्यादी सर्व मोखाडासारख्या दुर्गम व डोंगराळ माळरानावरती उभे आहे ते केवळ मा. खा. रामशेठ ठाकूर साहेबांच्या थोर दातृत्वातून.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर: समाजसेवेच्या आकाशातील तेजस्वी ध्रुवतारा



प्रा. डॉ. एस. जी. मेंगाळ

सहाय्यक प्राध्यापक, उप-प्राचार्य
व वाणिज्य विभाग प्रमुख

राजकारणाच्या विस्तीर्ण पटावर अनेक नेते उदयास येतात, अनेकांची भाषणे गाजतात, अनेकांची पदे आणि प्रतिष्ठा चर्चेत राहते; परंतु काळाच्या कसोटीवर टिकून राहणारे आणि जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण करणारे नेते फारच विरळ असतात. कारण नेता मोठा पदाने होत नाही, तर जनतेच्या मनातील विश्वासाने होतो. अशा विश्वासाचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे माजी खासदार, लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब होय. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर हे असेच एक तेजोमय व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या जीवनाचा अमृतमहोत्सव म्हणजे केवळ पंचाहत्तर वर्षांचा कालखंड नव्हे; तर समाजसेवा, शिक्षण, विकास, माणुसकी, दूरदृष्टी आणि लोककल्याण यांच्या दिव्य प्रवासाचा सुवर्णमहोत्सवी सोहळा आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करणे म्हणजे एका व्यक्तीचे अभिनंदन नव्हे, तर समाजपरिवर्तनाच्या अखंड वाहणाऱ्या जीवनदायी गंगेला वंदन करण्यासारखे आहे.

अमृतमहोत्सव हा प्रत्येकाच्या जीवनातील अभिमानाचा क्षण असतो. या निमित्ताने मागे वळून पाहताना संघर्ष, परिश्रम, त्याग, समर्पण आणि समाजहितासाठी केलेल्या अथक कार्याची सुवर्ण पाने आपल्या डोळ्यांसमोर उलगडत जातात. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या जीवनप्रवासाकडे पाहताना यशाच्या सर्वोच्च शिखरावर विराजमान असूनही विनम्रतेची शाल पांघरलेला, लोकांच्या सुख-दुःखात स्वतःचे अस्तित्व विसरणारा आणि जनतेच्या विश्वासाचा दीपस्तंभ बनलेला नेता आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो.

आजच्या राजकीय युगात जनाधार हा शब्द सहजपणे वापरला जातो; परंतु खऱ्या अर्थाने जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणारा, त्यांच्या अडचणी स्वतःच्या समजून सोडविण्यासाठी झटणारा आणि समाजकारणाला जीवनाचे ध्येय मानणारा नेता शोधायचा झाला, तर लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेबांचे यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जादू ही केवळ राजकीय प्रभावात नाही, तर त्यांच्या माणुसकीत आहे. समाजातील प्रत्येक घटकाशी जोडलेली त्यांची नाळ आजही तितकीच घट्ट आहे. म्हणूनच दररोज हजारो लोक त्यांच्या भेटीसाठी येतात. कोणी समस्या घेऊन येतो, कोणी आशा घेऊन येतो, तर कोणी केवळ त्यांच्या आशीर्वादासाठी येतो. विशेष म्हणजे, त्यांच्या दारातून कोणतीही व्यक्ती निराश होऊन परत जात नाही. मदतीचा हात पुढे करणे, अडचणीत धीर देणे आणि संकटात आधार बनणे हा

त्यांच्या स्वभावाचा अविभाज्य भाग आहे.

अनेकांच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्याचे पुण्यकार्य त्यांनी आयुष्यभर केले आहे. जीवनाच्या संघर्षात खचलेल्या माणसाला उभारी देणे, नाउमेद झालेल्यांच्या मनात आशेचा किरण जागवणे आणि स्वप्न पाहणाऱ्यांना त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी बळ देणे, ही त्यांची जीवनशैली बनली आहे. म्हणूनच लोक त्यांच्याकडे केवळ नेता म्हणून पाहत नाहीत, तर कुटुंबातील ज्येष्ठ आधारस्तंभ म्हणून पाहतात. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या विषयी जनतेच्या मनात असलेला विश्वास हा त्यांच्या दीर्घकालीन समाजकारणाचा परिणाम आहे. त्यांनी केलेली मदत, उभारलेल्या संस्था, दिलेला आधार आणि जपलेले सामाजिक संबंध यामुळेच लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल अपार आदर निर्माण झाला आहे. अनेकदा सामान्य नागरिकांच्या तोंडून सहजपणे एक वाक्य ऐकायला मिळते "पनवेलचा विकास करण्याची क्षमता रामशेठ ठाकूर साहेबांमध्येच आहे." ही भावना केवळ लोकप्रियतेतून आलेली नाही, तर त्यांच्या कार्यावर असलेल्या दृढ विश्वासातून निर्माण झालेली आहे. विशेषतः शिक्षण क्षेत्राबद्दल त्यांना असलेले प्रेम आणि आत्मीयता उल्लेखनीय आहे. शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, या विचारावर त्यांची ठाम श्रद्धा आहे. सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे, त्यांची स्वप्ने आर्थिक अडचणींमुळे अपूर्ण राहू नयेत, यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी केलेले योगदान हे केवळ आर्थिक मदत नसून भावी पिढी घडविण्याचा व्यापक दृष्टिकोन आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या मूल्यांचा वारसा जपत त्यांनी शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी, आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शेकडो कोटी रुपयांची आर्थिक मदत करून सातत्याने प्रयत्न केले. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनाही उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे त्यांचे ध्येय अनेक उपक्रमांमधून प्रत्यक्ष साकार झाले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, कौशल्य विकास, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रांना त्यांनी प्रोत्साहन दिले. वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षीही त्यांच्यातील कार्यतत्परता आणि ऊर्जा तरुणांनाही लाजवेल अशी आहे. समाजासाठी काहीतरी करण्याची धडपड, लोकांच्या समस्या समजून घेण्याची तळमळ आणि विकासाच्या नव्या संकल्पना राबविण्याची जिद्द आजही तितकीच प्रखर आहे. काळ पुढे सरकला, पिढ्या बदलल्या, राजकारणाचे स्वरूप बदलले; पण लोकसेवेची त्यांची भावना मात्र अजिबात बदललेली नाही.

गरिब, गरजू आणि वंचित घटकांबद्दल त्यांच्या मनात असलेली करुणा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. कोणतीही समस्या घेऊन त्यांच्याकडे गेलेल्या व्यक्तीला ते मनापासून ऐकून घेतात आणि त्या प्रश्नाच्या निराकरणासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करतात. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याची त्यांची धडपड आजही अखंड सुरू आहे. आदिवासी समाजाच्या विकासासाठी शिक्षण हे सर्वात प्रभावी साधन आहे. पालघर जिल्ह्यातील मोखाडा हा अतिदुर्गाम आदिवासी डोंगराळ तालुका आहे. येथील आदिवासी बांधवांची मागास आर्थिक परिस्थिति, शिक्षण नसणे, व्यसनाधीनता, रोजगार नसणे अशा अनेक समस्यांनी ग्रासलेले लोक येथे राहत आहेत. अशा या मोखाडा परिसरातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी निर्माण झालेले चांगले वातावरण हे रामशेठ ठाकूर साहेबांच्या दूरदृष्टीचे फलित आहे. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा हे महाविद्यालय त्यांच्या दूरदृष्टीचे जिवंत स्मारक आहे. रयत शिक्षण संस्थेने मोखाड्यासारख्या अतीदुर्गम, आदिवासी, डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी यासाठी हे महाविद्यालय सुरू केले. महाविद्यालायची आर्थिक परिस्थिति नाजुक असल्याने पुरेशी इमारत व अनेक भौतिक सुविधांची वाणवा होती. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांनी ही दयनीय परिस्थिति पाहिली आणि अंतकरणातून या

आदिवासी विद्यार्थ्यांचा व महाविद्यालयाचा विकास करण्याचा चंग मनाशी बांधला. महाविद्यालयला लागणारी पुरेशी नवीन व अत्याधुनिक सोईसुविधा असणारी भव्य सुंदर इमारत, प्रयोगशाळा, प्रशासकीय इमारत, सभागृह, रंगमंच, कृत्रिम बुद्धिमत्ता लॅब , संगणक प्रयोगशाळा, सर्व वर्ग खोल्यांमध्ये आधुनिक इंटरॅक्टिव बोर्ड, इतर भौतिक सुविधा, सर्व प्रकारचे शैक्षणिक साहित्य यासाठी कोट्यवधी रुपये रामशेठ ठाकूर साहेब यांनी खर्च केले. महाविद्यालायचा चेहरा मोहरा बदलून टाकला. यामुळे विद्यार्थी, शिक्षक, पालक, ग्रामस्थ या सर्वांना प्रेरणा मिळाली आणि एक गुणवत्तापूर्ण आदर्श महाविद्यालय म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. नॅक पुनर्रमूल्यांकनात महाविद्यालयाला अव्वल मानांकन अ$^{+}$ ग्रेड मिळाली. तसेच मुंबई विद्यापीठाचा ग्रामीण भागातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार या महाविद्यालायला मिळाला.

आज या महाविद्यालयातून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत यशाची पताका फडकवत आहेत. त्यांच्या यशामागे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या दूरदृष्टीचा, विश्वासाचा आणि शिक्षणावरील निष्ठेचा तेजस्वी प्रकाश दडलेला आहे. आर्थिक, सामाजिक आणि भौगोलिक अडचणींवर मात करून अनेक विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाची वाट धरली आहे. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वामुळे आमच्या या महाविद्यालयाला विकासाची नवी दिशा मिळाली आहे. विद्यार्थीकेंद्रित उपक्रम, गुणवत्तापूर्ण अध्यापन, सामाजिक उत्तरदायित्व आणि संशोधनाभिमुख वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांची प्रेरणा नेहमीच मार्गदर्शक ठरते. शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्याशी असलेला त्यांचा आत्मीय संवाद ही त्यांच्या नेतृत्वाची विशेष ओळख आहे.

नेतृत्व म्हणजे केवळ अधिकार नव्हे; तर विश्वासाचा सेतू, प्रेरणेचा झरा आणि समर्पणाची अखंड साधना होय. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी आपल्या नेतृत्वातून गुणवत्ता, शिस्त, पारदर्शकता आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचे संस्कार संस्थांमध्ये रुजविले. त्यांच्या कार्यामुळे शिक्षकांना नवी प्रेरणा, विद्यार्थ्यांना नवे स्वप्न आणि संस्थांना नवी ऊर्जा प्राप्त झाली. त्यांचे व्यक्तिमत्त्व हे केवळ शिक्षणापुरते मर्यादित नाही. समाजकारणाच्या क्षेत्रात त्यांनी लोकांच्या मूलभूत गरजा ओळखून विकासाची दिशा निश्चित केली. रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य, महिला सक्षमीकरण, युवकांसाठी रोजगाराच्या संधी, सामाजिक ऐक्य आणि ग्रामीण व शहरी विकास अशा विविध क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य लोकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणणारे ठरले आहे. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी विकासकामांना केवळ प्रशासकीय प्रक्रिया न मानता, लोकांच्या आशा-आकांक्षांशी जोडलेले सामाजिक दायित्व मानले. त्यांचा साधेपणा हा हिमालयाच्या उंचीइतकाच भव्य आणि गंगेच्या प्रवाहाइतकाच निर्मळ आहे. मोठ्या उंचीवर असूनही प्रत्येक सामान्य नागरिक, विद्यार्थी, शिक्षक यांच्याशी आत्मीयतेने संवाद साधण्याची त्यांची वृत्ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला विलक्षण उंची प्रदान करते. त्यांच्या हास्यात आत्मीयता आहे, शब्दांत विश्वास आहे आणि कृतीत समाजसेवेची अखंड साधना आहे. प्रसिद्धीच्या झगमगाटापेक्षा परिणामांच्या प्रकाशावर त्यांचा विश्वास आहे. म्हणूनच त्यांच्या कार्याचा सुवास एका फुलाप्रमाणे नव्हे, तर संपूर्ण बागेला दरवळविणाऱ्या सुगंधासारखा समाजभर पसरला आहे. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड कार्यशक्ती आणि समाजसेवेची अविरत ऊर्जा लाभो. त्यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण, संस्कार, विकास आणि मानवतेचा हा सुवर्णप्रवास अधिकाधिक समृद्ध होत राहो, हीच अमृत महोत्सवानिमित्त मनःपूर्वक सदिच्छा.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर: शिक्षण, समाजकारण आणि विकासाभिमुख नेतृत्व



प्रा. व्ही. एम. मोरे

सहाय्यक प्राध्यापक,
ग्रंथपाल विभागप्रमुख

संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून उमटणारी ती भावनिक सामाजिक जाणीव ज्यात गरिब-दुर्बलांचे दु:ख, समतेची ओढ आणि ज्ञानाच्या दिव्य प्रकाशाची तहान दिसते. त्यांच्या एका अभंगात ते म्हणतात: "**ज्ञानियासी ज्ञान घडे, अज्ञानियासी अंधार । तुका म्हणे विठोबा, सर्वांसी समान॥**" **हीच** तुकोबांची तत्त्वे आजच्या काळात लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या कार्यात साकार झालेली दिसतात. जणू तुकारामांच्या वारकरी परंपरेची आधुनिक काळातील अभिव्यक्ती. महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक जीवनात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, की त्यांचे योगदान केवळ एखाद्या राजकीय पदापुरते मर्यादित राहत नाही, तर समाजाच्या दीर्घकालीन विकासाची दिशा ठरविणारे ठरते. अशा व्यक्तिमत्त्वांमध्ये लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे स्थान विशेष उल्लेखनीय आहे. त्यांनी शिक्षण, ग्रामीण विकास, सामाजिक बांधिलकी आणि लोकसहभाग यांचा समन्वय साधत, विकासाची एक लोकाभिमुख संकल्पना प्रत्यक्ष कार्यातून साकार केली.

तुकाराम महाराज जसे म्हणतात की, खरा भक्त तो जो दुसऱ्याच्या दु:खात आपले दु:ख पाहतो, त्याचप्रमाणे रामशेठ यांनी ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी स्वत:ला जोडून घेतले. त्यांचे कार्य केवळ दान नव्हते, तर एक भावनिक बांधिलकी होती – ज्यामध्ये रयत शिक्षण संस्था सारख्या प्रेरणादायी संस्थेला भरभरून मदत करून, हजारो तरुण-तरुणींच्या आयुष्यात ज्ञानाचा दिवा प्रज्वलित केला. लोकशाही व्यवस्थेत नेतृत्वाची खरी कसोटी निवडणूक जिंकण्यात नसून, समाजात विश्वास निर्माण करण्यात असते. लोकांच्या गरजा ओळखून त्यावर दीर्घकालीन उपाययोजना करणे, शिक्षणाला विकासाचा केंद्रबिंदू मानणे आणि समाजातील दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, ही लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये आहेत. "महाराष्ट्रात महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन बनविले. फुल्यांनी शिक्षणाला क्रांतीचे शस्त्र दिले, तर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण रयतेसाठी शिक्षणाची मोठी चळवळ उभी केली. स्वातंत्र्यानंतर ही ग्रामीण आणि आदिवासी भागात गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण, संशोधन सुविधा आणि कौशल्य विकास यांची तीव्र

तहान कायम होती. अशा पार्श्वभूमीवर रामशेठ ठाकूर यांचे कार्य उदयास आले. ते स्वतः रयत शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या गुरु-शिष्य परंपरेत त्यांनी त्या बीजाला नवी फलधार दिली. संस्थेने त्यांना घडवले आणि त्यांनी संस्थेला दीडशे कोटी रुपयांहून अधिक देणग्या देऊन गुरुदक्षिणा अर्पण केली.

तुकाराम महाराज जसे गातातः "**ज्ञानियासी ज्ञान घडे, अज्ञानीयासी अंधार । तुका म्हणे विठोबा, सर्वांसी समान॥** रामशेठ यांनी शिक्षणाकडे केवळ पदवीचे साधन म्हणून न पाहता, **व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक न्याय, आर्थिक स्वावलंबन आणि राष्ट्रनिर्मितीचा पाया** म्हणून पाहिले. त्यांनी ग्रामीण व आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आधुनिक सुविधा, संशोधन केंद्रे आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले. आज राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP २०२०), कौशल्य विकास, डिजिटल शिक्षण आणि Outcome Based Education यांच्या युगात त्यांची दूरदृष्टी अधिक प्रासंगिक ठरते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या "शिक्षण हेच सेवा" या संकल्पनेला त्यांनी आधुनिक रूप दिले. त्यांच्या मार्गावरून महाराष्ट्रातील अनेक तरुण आज स्वावलंबी आणि सक्षम होत आहेत. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे जीवन **संत तुकाराम महाराजांच्या वारकरी संदेशाचे** आणि **कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या गुरु-शिष्य परंपरेचे** जीवंत उदाहरण आहे.

तुकोबा म्हणतातः "**तुका म्हणे आम्हा, विठोबा विठोबा । नामस्मरणाने, सर्व सिद्धी साध्य॥**" रामशेठ यांनी भक्तीच्या रूपाने समाजसेवा केली, समतेच्या भावनेतून शिक्षणाचा प्रसार केला आणि कर्मवीरांच्या परंपरेला नवी उंची दिली. त्यांच्या कार्यातून उमटणारी ही सामाजिक जाणीव पिढ्यान्पिढ्या प्रेरणा देत राहील. रामशेठ ठाकूर यांच्या नावाने सुरू झालेल्या या शैक्षणिक क्रांतीत विठोबाची कृपा आणि कर्मवीरांची दृष्टी कार्यरत आहे **सर्वांसाठी समान संधी, सर्वांसाठी उज्ज्वल भविष्य.** महाभारतातील कर्ण हा दानशूर व्यक्तिमत्त्वाचा आदर्श मानला जातो. त्याची उदारता केवळ संपत्ती देण्यापुरती मर्यादित नव्हती, तर त्याने आपले सर्वस्व, प्रतिष्ठा, सुख आणि शेवटी प्राणही दान केले. त्याची दानशूरता इतकी निःस्वार्थ आणि निर्भय होती की, तो दान करताना कधीही "नाही" म्हणाला नाही. दानशूर कर्ण जसा महाभारतात उदारतेचा सूर्य होता, तसेच लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या कार्यातही तीच निःस्वार्थ दानशूरता दिसून येते. कर्णाने आपल्या शरीराचे रक्त आणि कुंडले दान केली, तसेच रामशेठ यांनी आपल्या कमाईचे सर्वस्व रयत शिक्षण संस्थेला आणि ग्रामीण-आदिवासी विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी अर्पण केले. कर्ण दान करताना कधीही पश्चात्ताप करत नव्हता किंवा प्रसिद्धी शोधत नव्हता, त्याचप्रमाणे रामशेठ यांनीही मोठ्या देणग्या देताना केवळ समाजहित लक्षात घेतले. कर्णाची उदारता युद्धभूमीवरही कायम राहिली, तशीच रामशेठ यांची दानशूरता शिक्षणक्षेत्रात आजही हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रकाश पसरवत आहे.

तुकोबा अभंगासह जोडः "तुका म्हणे, दान करा, सेवा करा । विठोबा नावाने, सर्व सिद्धी साधा ॥" कर्ण आणि रामशेठ–समान धागाः कर्णाने दान दिले ते यशासाठी नव्हे, तर स्वभावामुळे. रामशेठ ठाकूर यांनी शिक्षणासाठी दान केले ते प्रसिद्धीसाठी नव्हे, तर ग्रामीण रयतेच्या उज्ज्वल भविष्यासाठी. महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक जीवनात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांचे योगदान केवळ एखाद्या राजकीय पदापुरते मर्यादित राहत नाही, तर समाजाच्या दीर्घकालीन विकासाची दिशा ठरविणारे ठरते. अशा व्यक्त मत्त्वांमध्ये "**लोकनेते मा. रामशेठ ठाकूर**" यांचे स्थान विशेष उल्लेखनीय आहे. त्यांनी शिक्षण, ग्रामीण विकास, सामाजिक बांधिलकी आणि लोकसहभाग यांचा समन्वय साधत विकासाची एक लोकाभिमुख संकल्पना प्रत्यक्ष कार्यातून साकार करण्याचा प्रयत्न केला. लोकशाही व्यवस्थेत नेतृत्वाची खरी कसोटी निवडणूक जिंकण्यात नसून समाजात विश्वास निर्माण करण्यात असते. लोकांच्या गरजा ओळखून त्यावर दीर्घकालीन उपाययोजना करणे, शिक्षणाला विकासाचा केंद्रबिंदू मानणे

आणि समाजातील दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, ही लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये मानली जातात. आज जागतिकीकरण, तंत्रज्ञान, बदलती सामाजिक रचना आणि आर्थिक स्पर्धा यामुळे ग्रामीण भारतासमोर अनेक नवी आव्हाने निर्माण झाली आहेत. अशा काळात गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्य विकास, रोजगारनिर्मिती, संशोधन, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक समावेशकता या विषयांचे महत्त्व अधिक वाढले आहे. या सर्व बाबींचा विचार करता रामशेठ ठाकूर यांची विकासदृष्टी अभ्यासण्यासारखी ठरते. हा लेख त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव करण्यापुरता मर्यादित नसून, त्यांच्या सार्वजनिक कार्याचे शैक्षणिक व चिकित्सक विश्लेषण करण्याचा प्रयत्न आहे. शिक्षण आणि समाजकारण यांच्या परस्परसंबंधाचा अभ्यास करताना त्यांच्या कार्यातून विकसित झालेल्या संकल्पना, प्राधान्यक्रम आणि नेतृत्वशैली यांचे विवेचन या लेखात करण्यात येत आहे.

जीवनदृष्टी आणि मूल्यव्यवस्था: कोणत्याही नेतृत्वाची दिशा त्याच्या मूल्यव्यवस्थेतून ठरते. सार्वजनिक जीवनात कार्य करणाऱ्या व्यक्तीचे विचार, निर्णयप्रक्रिया आणि कार्यपद्धती ही त्याच्या जीवनदृष्टीचे प्रतिबिंब असते. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा अभ्यास करताना काही मूलभूत तत्त्वे स्पष्ट दिसून येतात.

१. **शिक्षण हा विकासाचा पाया आहे:** समाजाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी दर्जेदार शिक्षण आवश्यक आहे, हा त्यांच्या कार्यातील मूलभूत विचार मानला जातो.

२. **ग्रामीण आणि आदिवासी भागाला प्राधान्य:** विकासाचे लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले पाहिजेत, या तत्त्वानुसार त्यांनी ग्रामीण भागातील शिक्षण आणि पायाभूत सुविधांकडे विशेष लक्ष दिले.

३. **संस्थात्मक विकास:** व्यक्तीपेक्षा संस्था मोठी असते. दीर्घकालीन सामाजिक परिवर्तनासाठी सक्षम संस्था निर्माण करणे आवश्यक आहे, ही त्यांची कार्यपद्धती दर्शविते.

४. **लोकसहभाग:** विकास हा केवळ शासनाचा विषय नसून समाजाच्या सहभागातूनच तो प्रभावीपणे घडतो, या विचाराचा त्यांच्या कार्यात वारंवार प्रत्यय येतो. प्रेत्येक व्यक्ती त्यांचे काम घेऊन रामशेठ यांच्या घरी मदतीचा, आधाराचा हक्काचा देव माणूस म्हणून येतात. लोकसहभागाची जत्रेचा महोत्सव राबविणारे लोकनेते म्हणजे रामशेठ ठाकूर साहेब आहेत.

५. **गुणवत्तेला प्राधान्य:** केवळ संख्यात्मक वाढ न करता शिक्षणाची गुणवत्ता, संशोधन, तंत्रज्ञान आणि कौशल्य विकास या बाबींवर त्यांनी भर दिला.

६. **सार्वजनिक जीवनाची सुरुवात:** सार्वजनिक जीवनातील यश हे लोकांशी असलेल्या सातत्यपूर्ण संवादातून निर्माण होते. सामान्य नागरिकांच्या समस्या, ग्रामीण भागातील विकासाच्या गरजा, शिक्षणातील असमानता आणि सामाजिक प्रश्न यांचा अभ्यास करून त्यावर प्रत्यक्ष काम करण्याची वृत्ती ही प्रभावी नेतृत्वाची ओळख असते. रामशेठ ठाकूर यांच्या सार्वजनिक कार्याचा केंद्रबिंदू समाजाशी असलेले जिव्हाळ्याचे नाते हा होता. स्थानिक पातळीवरील प्रश्न समजून घेणे, विकासकामांसाठी आवश्यक संसाधने उपलब्ध करून देणे आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना समाजहिताच्या उपक्रमांशी जोडणे, या माध्यमातून त्यांनी स्वतःची कार्यपद्धती विकसित केली. सार्वजनिक जीवनात विश्वासार्हता, सातत्य आणि प्रत्यक्ष कृती यांना त्यांनी महत्त्व दिले. याच कारणामुळे विविध सामाजिक, शैक्षणिक आणि विकासात्मक उपक्रमांमध्ये त्यांचे नेतृत्व स्वीकारले गेले.

७. **समाजकारणाची व्यापक संकल्पना:** लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे समाजकारणाची व्यापक

व्याख्या. त्यांच्या दृष्टीने समाजसेवा म्हणजे केवळ आर्थिक मदत नव्हे; तर समाजाला स्वावलंबी बनविण्यासाठी आवश्यक संधी उपलब्ध करून देणे. त्यांच्या कार्यात पुढील क्षेत्रांना विशेष स्थान दिसून येते. शिक्षणाचा विस्तार, विद्यार्थी कल्याण, ग्रामीण पायाभूत सुविधा, युवकांचे कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण, आरोग्यविषयक जनजागृती, पर्यावरण संरक्षण, संस्थात्मक बळकटीकरण समाजातील विविध घटकांना एकत्र आणून सामूहिक प्रयत्नांतून विकास साधण्याची ही कार्यशैली त्यांच्या नेतृत्वाची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये ठरते.

८. **लोकाभिमुख नेतृत्वः** लोकाभिमुख नेतृत्व म्हणजे लोकांच्या अपेक्षा समजून घेत त्यांना विकास प्रक्रियेचा भाग बनविणे. प्रभावी नेता केवळ निर्णय घेत नाही, तर त्या निर्णयामागील उद्दिष्ट समाजापर्यंत पोहोचवितो. रामशेठ ठाकूर यांच्या कार्यपद्धतीमध्ये संवाद, समन्वय आणि सहभाग या तीन घटकांना विशेष महत्त्व दिसते. शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना, स्थानिक नेतृत्व, शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिक यांच्यात समन्वय निर्माण करून विकासाची प्रक्रिया अधिक व्यापक करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येतो.

९. **सामाजिक जबाबदारीची जाणीवः** शिक्षणसंस्था या समाजाच्या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असल्या पाहिजेत, ही संकल्पना महाराष्ट्रातील अनेक शिक्षणतज्ज्ञांनी मांडली आहे. या विचाराशी सुसंगतपणे शिक्षण संस्थांनी समाजाशी जोडलेले राहावे, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक उत्तरदायित्व विकसित व्हावे आणि ज्ञानाचा उपयोग समाजकल्याणासाठी व्हावा, या दृष्टीने विविध उपक्रमांना प्रोत्साहन देण्यात आले. रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, ग्रामविकास, पर्यावरण संवर्धन, कौशल्य प्रशिक्षण आणि सामाजिक जनजागृती यांसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थी समाजाशी प्रत्यक्ष जोडले जातात. ही संकल्पना आधुनिक उच्च शिक्षणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत आहे.

१०. **विकासाची समग्र दृष्टीः** विकास हा केवळ आर्थिक निर्देशांकांवर मोजला जाऊ शकत नाही. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, कौशल्य, सामाजिक समता आणि मानवी विकास हे त्याचे महत्त्वाचे घटक आहेत. समग्र विकासाच्या या संकल्पनेत पुढील बाबींचा समावेश होतो. सर्वसमावेशक शिक्षण, गुणवत्तापूर्ण उच्च, शिक्षण, संशोधन व नवोपक्रम, रोजगाराभिमुख कौशल्य, ग्रामीण पायाभूत सुविधा, पर्यावरणीय शाश्वतता, सामाजिक समावेशकता या दृष्टीकोनामुळे विकास ही एक बहुआयामी प्रक्रिया ठरते आणि समाजातील विविध घटकांचा त्यात सक्रिय सहभाग आवश्यक ठरतो.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या सार्वजनिक कार्याचा अभ्यास करताना एक बाब स्पष्टपणे जाणवते की त्यांनी विकासाची संकल्पना केवळ राजकीय कार्यक्रम म्हणून न पाहता, शिक्षण, समाजकारण आणि लोकसहभाग यांचा समन्वय साधणारी व्यापक सामाजिक प्रक्रिया म्हणून स्वीकारली. त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू व्यक्ती नसून संस्था, अल्पकालीन लोकप्रियता नसून दीर्घकालीन विकास आणि केवळ सुविधा नसून गुणवत्तापूर्ण संधी निर्माण करणे हा होता. त्यांच्या नेतृत्वाची खरी ओळख म्हणजे शिक्षणाला परिवर्तनाचे साधन मानणारी दृष्टी, ग्रामीण समाजाविषयीची बांधिलकी आणि विकासात सर्व घटकांचा सहभाग सुनिश्चित करण्याची वृत्ती. त्यामुळे त्यांचे कार्य महाराष्ट्रातील शिक्षण आणि समाजविकासाच्या अभ्यासात महत्त्वाचे संदर्भस्थान प्राप्त करते.

एक थोर व्यक्तिमत्व: लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर



डॉ. ए. एल. शेख

सहाय्यक प्राध्यापक,
विभाग प्रमुख प्राणिशास्त्र

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो ते प्राशन करेल तो गुरगुरणारच" या प्रसिद्ध वक्तव्यापासून ते नेल्सन मंडेला यांच्यानुसार "शिक्षण हे असे सर्वात शक्तिशाली शस्त्र आहे ज्याचा वापर तुम्ही जग बदलण्यासाठी करू शकता" या वक्तव्यापर्यंत अनेक महान विचारवंतांनी आणि महापुरुषांनी शिक्षणाचे महत्त्व वेगवेगळ्या पद्धतीने वेळोवेळी विशद केले आहे. अलीकडच्या काळात शिक्षण हे फक्त नोकरीसाठी असतं हा विचार जरी वाढत गेला असला तरी शिक्षणाचे महत्त्व तितक्या कारणापुरताच मर्यादित नाही हे आपल्या सर्वांनाच ज्ञात आहे. पृथ्वीवर जन्माला आलेल्या इतर प्राण्यांप्रमाणेच माणूसही जन्माला आला आणि त्याच्यामध्ये उत्क्रांती होऊन आजचा सर्वगुणसंपन्न असा आधुनिक मानव तयार झाला. इतर प्राण्यांच्या तुलनेत इतका प्रचंड मोठा बदल जो मानवामध्ये झाला त्याचे श्रेय हे शिक्षणाला नक्की द्यावे लागेल. मानवी मनाच्या अनेक पैलूंना आखिव-रेखिव पद्धतीने कोरून तयार करण्याचे काम शिक्षणाचे आहे, माणसातील अनेक सहज भावनाही शिक्षणामुळेच वृद्धिंगत होतात असं मानणाऱ्यांपैकी मी आहे. या अनेक सहज भावनांपैकी कृतज्ञता हा एक महत्त्वाचा भाव आहे. प्रस्तुत लेखामध्ये ज्या थोर व्यक्तीबद्दल मी लिहीत आहे त्यांच्या ठायी कृतज्ञता हा सर्वात मोठा गुण आहे असे मला वाटते. मा. खासदार लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्याबद्दल लिहीत असताना मनात येणारे पहिले वाक्य म्हणजे शिक्षणाप्रती अत्यंत कृतज्ञ भाव असणारी जगातील खरी श्रीमंत व्यक्ती.

ज्या शिक्षणाने घडवलं, आयुष्यात मोठं केलं, त्या शिक्षण व्यवस्थेसाठी भरीव योगदान त्यांनी दिलं आहे. त्याही पुढे जाऊन ज्या शिक्षण संस्थेमध्ये ते शिकले अशी रयत शिक्षण संस्था, या संस्थेचे मोठे देणगीदार म्हणून त्यांची ओळख आज निर्माण झाली आहे. एकेकाळी रयत शिक्षण संस्थेच्या 'कमवा आणि शिका' या योजनेमधून त्यांनी शिक्षण घेतलं आणि पुढे जाऊन जीवनामध्ये अतिशय उत्तुंग भरारी घेतली. तरीही त्यांचे पाय आज अजूनही जमिनीला टेकले आहेत हे विशेष. शिक्षणावरील त्यांचे प्रेम हे सर्वश्रुतच आहे, त्याचाच एक भाग म्हणून आदर्श अशा मानल्या गेलेल्या शिक्षण संस्थांची मुहूर्तमेढ त्यांनी केलेली आहे. पण रयत शिक्षण संस्थेविषयी असणारे त्यांचे प्रेम हे अबाधित आहे. रयत शिक्षण संस्थेच्या सर्व कार्यक्रमांमध्ये ते हिरीरीने भाग घेतात, भरीव अशी आर्थिक मदत देतात, त्याचबरोबर आशिया खंडातील सर्वात मोठी

असणाऱ्या रयत शिक्षण संस्थेच्या ध्येयधोरणांमध्येही ते त्यांचे बहुमोल मार्गदर्शन वेळोवेळी करत असतात. मा. ठाकूर साहेबांच्या रयत शिक्षण संस्थेतील योगदानाबद्दल लिहीत असताना, आदिवासी भागातील मोखाडा येथील महाविद्यालयामध्ये केलेले भरीव योगदानाचा उल्लेख सर्व प्रथम करायला हवा. तसं बघायला गेलं तर इतर अनेक शैक्षणिक संस्थांचं काम हे शहरी मुलांना केंद्रित आहे आणि या उलट रयत शिक्षण संस्थेचे काम हे गोरगरीब ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी आहे.

रयत शिक्षण संस्थेचे एक वरिष्ठ महाविद्यालय हे पालघर जिल्ह्यातील मोखाडा या गावामध्ये सुमारे ४२ वर्षांपूर्वी सुरू झालं. सुरुवातीला फक्त कला आणि वाणिज्य असणाऱ्या या महाविद्यालयामध्ये २०१४ साली विज्ञान शाखा सुरू झाली. महाविद्यालय स्थापन झाल्यापासून ते अगदी गेल्या काही वर्षांपर्यंत हे महाविद्यालय जुन्या पत्र्याच्या खोल्यांमध्ये भरत होते. तालुक्यातील एकमेव अनुदानित महाविद्यालय म्हणून विद्यार्थी संख्या ही बऱ्यापैकी असायची, पण विद्यार्थ्यांना पुरेशा सुविधा उपलब्ध नव्हत्या. मोजक्या वर्गखोल्या आणि उपलब्ध तुटपुंज्या अशा सुविधांवर हे महाविद्यालय सुरू होते. अनुदानित विज्ञान शाखा सुरू होऊन ५-६ वर्षे गेली तरी सर्व विषयांच्या स्वतंत्र प्रयोगशाळा नव्हत्या, विद्यार्थ्यांना प्रयोग करण्यासाठी आवश्यक असणारे साहित्य नव्हते, मूलभूत अशा वाटणाऱ्या सुविधाही नसताना असे महाविद्यालय चालवणे अतिशय जिकिरीचे ठरत होते. सदर बाब लक्षात आल्यानंतर रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव आणि महाविद्यालयाचे त्यावेळचे प्राचार्य मा. जे. जी. जाधव साहेब यांनी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. शरदचंद्र पवार साहेब यांच्यापुढे अडचणी मांडल्या. तद्नंतर मा. शरद पवार साहेबांच्या सूचनेनुसार लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या योगदानामुळे महाविद्यालयाचा कायापालट सुरू झाला.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी दिलेल्या भरीव अशा आर्थिक योगदानामुळे नवीन भव्य अशी इमारत उभी राहिली. या अद्ययावत अशा इमारतीमध्ये प्रशस्त अशा वर्गखोल्या बनवण्यात आल्या, तसेच विज्ञान विभागासाठी अतिशय आवश्यक असणाऱ्या प्रयोगशाळा बनवल्या गेल्या. आज महाविद्यालयामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र या विषयांच्या अतिशय प्रशस्त आणि सुसज्ज अशा प्रयोगशाळा तयार झाल्या आहेत. या प्रयोगशाळेसाठीच्या फक्त खोल्या बांधून ठाकूर साहेब थांबले नाहीत, तर मुंबई येथील प्रयोगशाळेतील साहित्य वितरित करणाऱ्या एका मोठ्या कंपनीचे मालक गगन सोनिजा यांना मोखाडा येथे बोलवण्यात आले आणि त्यांना प्रत्येक प्रयोगशाळेमध्ये जाऊन मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार लागणारी सर्व वैज्ञानिक उपकरणे, यंत्रसामग्री याची यादी काढण्यास लावून ते सगळे साहित्य महाविद्यालयास पोहोच करण्याची जबाबदारी दिली. इतकेच नाही तर सर्व प्रयोगशाळेमध्ये आवश्यक असणारे फर्निचर ही बनवून घेण्यात आले. शिक्षकांस बसावयास स्टाफ रूम, परीक्षा विभाग, इन्क्युबेशन सेंटर (Incubation centre), भव्य असे सभागृह बांधण्यात आले.

या इमारतीमध्ये बनवण्यात आलेल्या प्रयोगशाळा सर्वदूर कौतुकाचा विषय झाल्या. भेट देण्यासाठी येणारे पाहुणे, इतर महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यापीठातील बाह्य परीक्षक म्हणून आलेले प्राध्यापक या सर्वांना आदिवासी भागातील महाविद्यालयामध्ये इतक्या अद्ययावत प्रयोगशाळा आहेत याचे कुतूहल वाटते आणि जेव्हा या सगळ्यांची नवल वाटणारी मुद्रा आणि कौतुक बघतो त्यावेळेस अभिमान वाटतो. आता ग्रामीण आणि आदिवासी भागातील गोरगरीब मुलांनाही शहरातील मुलांच्या सारख्या सुविधा उपलब्ध झाल्या. बऱ्याच जणांनी मायक्रोस्कोप (Microscope) सारखे साधे उपकरणही बघितलेले नव्हते, त्यांना ते हाताळायला मिळालं; यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये एक उत्साह बघायला मिळाला आणि त्याचमुळे जेव्हा इतर शहरी भागातील महाविद्यालयांमधील विद्यार्थी संख्या घटत आहे, त्याचवेळी मोखाडा येथील महाविद्यालयामधील विद्यार्थी संख्या दिवसें दिवस वाढत आहे.

या शताब्दी इमारतीबरोबरच प्रशासकीय इमारतही बांधण्यात आलेली आहे. सदर प्रशासकीय इमारतीमध्ये प्राचार्य केबिन, कार्यालय याची निर्मिती करण्यात आली. तसेच याच इमारतीच्या पहिल्या मजल्यावर भव्य असा मीटिंग हॉल उभारण्यात आला. याच इमारतीमध्ये अलीकडच्या काळात आधुनिक एआय लॅब (AI lab) उभारण्यात आली. या लॅबमध्ये विद्यार्थ्यांसाठी संगणक तसेच एआयचे कीट उपलब्ध करून दिले गेले. या विचाराने मन हरखून जाते की तीर्थरूप अण्णा जर का खरंच कुठून बघत असतील तर त्यांना हे वैभव बघून किती आनंद होत असेल. अतिशय दुर्गम भागातील गरीब आदिवासी मुलगा, आज जगातील सर्वात आधुनिक अशा एआय (AI) या संकल्पनेचा अभ्यास त्याच्या घराजवळील महाविद्यालयामध्ये आणि तेही अत्यंत कमी फी मध्ये करत आहे, हे चित्र नक्कीच कर्मवीर अण्णांचे स्वप्न पूर्ण करणारे आहे. आणि याचे सर्व श्रेय लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेबांना द्यावे लागेल.

यालाच जोड म्हणून कोणत्याही शहरी महाविद्यालयालाही जमणार नाही ती गोष्ट मोखाडा येथील महाविद्यालयामध्ये बघायला मिळते, ते म्हणजे महाविद्यालयातील सर्व वर्गखोल्या, प्रयोगशाळेमध्ये इंटरएक्टिव्ह पॅनेल बसवण्यात आलेले आहेत. आता मुलांना इंटरएक्टिव्ह पॅनेलचा वापर करून आधुनिक पद्धतीने शिक्षण देणे सोपे ठरत आहे. आदिवासी भागातील मुलांमध्ये आपसूकच कलेचा गुण असतो आणि अशा कलागुणांना वाव देण्यासाठी भव्य असे कलामंच उभारण्यात आले आहे. महाविद्यालयाचा परिसर विकास झाल्यामुळे एक वेगळे चैतन्य प्राध्यापकांबरोबरच विद्यार्थ्यांमध्येही दिसू लागलं, याचा परिणाम शैक्षणिक गुणवत्ता वाढीवर देखील झाला. गेल्या ६ वर्षांमध्ये महाविद्यालयातील ३०० हून अधिक विद्यार्थ्यांना खाजगी व सरकारी विभागांमध्ये नोकऱ्या मिळाल्या. वन विभाग, पोलीस खाते, पोस्ट ऑफिस अशा विभागांमध्येही महाविद्यालयामधील विद्यार्थी दिसू लागले. इतकेच नव्हे तर महाविद्यालयातील मुले संशोधन करू लागली; महाविद्यालयातील मुलांनी २०२५-२०२६ च्या मुंबई विद्यापीठाच्या अविष्कार संशोधन महोत्सवामध्ये चमकदार कामगिरी केली. महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी किडनी स्टोनसारख्या आजारावरील रानटी औषधावर संशोधन केले आहे. हे केवळ शक्य झाले आहे ते आधुनिक आणि सुसज्ज प्रयोगशाळेची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे.

महाविद्यालयाची प्रगती नॅक (नॅक) मूल्यांकनामध्येही अधोरेखित झालेली आहे. दुसऱ्या फेरीमध्ये झालेल्या नॅकच्या मूल्यांकनामध्ये महाविद्यालयाने ३.४३ सी.जी.पी.ए.सह A+ ग्रेड मिळवून सर्वांना चकित केले होते. त्याचबरोबर महाविद्यालयास मुंबई विद्यापीठाचा 'ग्रामीण भागातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' हा पुरस्कार मिळाला आहे. मा. ठाकूर साहेबांचा परिसस्पर्श झाल्यानंतर काहीच काळात या महाविद्यालयाने उत्तुंग अशी भरारी घेतली. महाविद्यालयाचा कायापालट होण्यामागे मा. रामशेठ ठाकूर साहेबांचा सिंहाचा वाटा असल्यामुळे महाविद्यालयाचे नामकरण 'लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा' असे करण्यात आले आहे.

जेष्ठांकडून नेहमी असं ऐकायला मिळतं आणि जे की खरेही आहे की, इतर भागाची केलेली सेवा आणि त्या तुलनेत आदिवासी भागात केलेली सेवा, याच्यात आदिवासी भागात केलेली सेवा ही जास्त पुण्याची आहे. पुण्य आणि पाप याचा अर्थ काहीही असो, पण आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या मागास समजल्या जाणाऱ्या लोकांसाठी केलेले काम हे नक्कीच श्रेष्ठ मानले जाईल. एका तालुक्यातील एक महाविद्यालय सुधारलं तर त्या भागाचा सर्वांगीण विकास होण्यास गती मिळते आणि त्यामुळेच लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या मदतीला विशेष महत्त्व प्राप्त होते. रयत शिक्षण संस्थेच्या महान परंपरेला साजेशी आणि कर्मवीरांच्या स्वप्नातील शिक्षण व्यवस्था आदिवासी भागामध्ये उभारण्यासाठी केलेल्या महान योगदानाबद्दल लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांना सलाम. ●●●

मोखाडा महाविद्यालयाचा आधारवड : लोकनेते मा. रामशेठ ठाकूर



प्रा. एस. ए. फुंदे

सहाय्यक प्राध्यापक,
विभाग प्रमुख भौतिकशास्त्र

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर हे जनसामान्यांशी घट्ट नाते जोडणारे, विकासाला सर्वोच्च प्राधान्य देणारे आणि शिक्षण, सामाजिक कार्य व लोकसेवा या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणारे नेतृत्व म्हणून परिचित आहेत. ग्रामीण व आदिवासी भागांचा विकास हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू राहिला आहे. कर्मवीर अण्णांच्या रयत शिक्षण संस्थेच्या शिवाजी कॉलेज येथे लेबर स्कीम मधून त्यांनी उच्च शिक्षण पूर्ण केले आहे. शिक्षण घेत असतानाच कर्मवीर अण्णांच्या विचारांचा ठसा त्यांच्या व्यक्तिमत्वावर उमटलेला आपल्याला जाणवतो. स्वतःची जनार्दन भगत ही शिक्षण संस्था असताना सुद्धा ठाकूर साहेबांचे रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीमध्ये मोलाचे योगदान आहे, हे त्यांच्या मनामध्ये कमवीर आण्णा व रयत शिक्षण संस्थेप्रती असलेली कृतज्ञता व मातृत्वाची भावना आपल्याला जाणवते. रयत शिक्षण संस्थेचे शिक्षण प्रसाराचे कार्य अनेक दशकांपासून कर्मवीर अण्णांच्या पावलावर पूल ठेवून गोरगरिबांच्या , आदिवासींच्या मुलांना शिक्षण प्रवाहात आणण्याचे कार्य अनेक दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने चालू आहे, या कार्यात आपल्या उद्दात्त दातृत्वाने महत्वाचे स्थान लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांनी निर्माण केले आहे.

ठाकूर साहेब यांचा परिचय मला, मोखाडा महाविद्यालयामध्ये २०२० मध्ये मी सहाय्यक प्राध्यापक म्हणून रुजू झाल्यावर झाला. मी रुजू झालो त्यावेळी महाविद्यालयाची परिस्थिती म्हणजे महाविद्यालयाचे कामकाज एका पत्र्याच्या इमारतीमध्ये चालत होते. छोट्या छोट्या खोल्या होत्या त्यामध्येच लेक्चर्स घ्यायचे त्यामध्येच प्रात्यक्षिक सुद्धा घ्यायचे अशी परीस्थिती महाविद्यालयाची होती. महाविद्यालयामध्ये ना इंटरनेट होते ना कॉम्पुटर होते. पावसाळ्यात महाविद्यालयात सलग तीन तीन दिवस लाईट सुद्धा नसायची, त्यावेळी महाविद्यालयासाठी नवीन इमारत बांधण्याचा प्रस्ताव संस्थेसमोर होता व त्या साठी वेगवेगळ्या शासकीय परवानग्या मिळवण्याचे काम चालू होते. याच इमारतीसाठी ठाकूर साहेबांनी एक कोटी रुपये देणगी देण्याचे जाहीर केले होते. हे होत असतानाचा भारतवार करोना महामारीचे संकट ओढावले होते, त्यामुळे मार्च मध्ये होणारी महाविद्यालय विकास समितीची बैठक पुढील शैक्षणिक वर्षात गेली. जून २०२० पर्यंत बांधकाम सुरु करण्याच्या सर्व शासकीय परवानग्या महाविद्यालयास मिळाल्या होत्या. ८ सप्टेंबर २०२० रोजी महाविद्यालयात महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीचे आयोजन केले होते व त्याच दिवशी

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या शुभहस्ते महाविद्यालयाच्या रयत शताब्दी इमारतीचे भूमिपूजन झाले व त्याच दिवसापासून मोखाडा महाविद्यालयाच्या विकासाचे सुद्धा भूमिपूजन झाले असे मला वाटते. त्याच दिवशी ठाकूर साहेबांनी ५० लाख रुपयांचा चेक प्रा. डॉ. जे. जी. जाधव यांच्या हातात सुपूर्द केला. त्यावेळी महाविद्यालयामध्ये आम्ही १७ प्राध्यापक नव्याने रुजू झालेलो होतो साहेबांनी आमच्याशी चर्चा केली व आमच्या अडचणी विचारल्या. त्यावेळी कोरोनामुळे सर्व शिक्षण हे ऑनलाइन पद्धतीने चालू होते, आमच्यापैकी सर्वच प्राध्यापकांनी इंटरनेट व कॉम्पुटर मिळावेत असे सांगितले त्यानंतर तीनच दिवसात महाविद्यालयास २ की.मी. अंतरावरून केबलद्वारे सर्व खोल्यामध्ये इंटरनेट दिले व सोबत ५ कॉम्पुटर महाविद्यालयास दिले. महाविद्यालयास नॅक पुनर्मुल्यांकनाला सामोरे जाण्यासाठी महाविद्यालयात वर्गखोल्यांची आवश्यकता होती लवकरच रयत शताब्दी इमारतीचे बांधकाम सुरु झाले, बांधकामाची प्रगती पाहण्यासाठी साहेब तीन महिन्यातून एकदा महाविद्यालयात भेट द्यायचे आवश्यक सूचना करायचे, आणि सांगायचे काम चालूच राहिले पाहिजे खर्चाचा विचार करू नका मी आहे असे करत इमारतीचे एक मजल्याचे बांधकाम पूर्ण झाले.

महाविद्यालयातील निधी तर आधीच संपला होता, आणि महाविद्यालयात फक्त आठच वर्गखोल्या तयार झाल्या होत्या, त्यातच प्रॅक्टिकल लॅब तयार केल्या तर अजून चार वर्गखोल्या कमी पडत होत्या याचा विचार करून तसेच मोखाडा परिसरात पावसाळ्यातील चार महिने सारखा पाऊस पडत असतो या सर्वांचा विचार करून प्रा. भोर सर यांनी साहेबांसमोर इमारतीचा अजून एक मजला वाढवण्याचा प्रस्ताव मांडला साहेबांनी लगेच होकार दिला आणि सांगितले काम सुरु करा खर्चा ची चिंता करू नका मी आहे. असे करत महाविद्यालयाची सुंदर रयत शताब्दी इमारत तयार झाली, इमारतीमध्ये प्रॅक्टिकल लॅब साठी साहित्य नव्हते साहेबांनी लगेच त्यांच्या जनार्दन भगत संस्थेच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर येथे फोन करून सांगितला माझ्या मोखाडा महाविद्यालयातील प्राध्यापक येतील त्यांना प्रॅक्टिकल लॅब साठी जे साहित्य लागेल ते घेऊन दया मग काय एका आठवड्यातच सर्व साहित्य येऊन लॅब तयार झाल्या. हे प्रश्न मार्गी लागले राहिले आता महाविद्यालयाच्या ऑफिस ला पण जागा नव्हती जुने ऑफिस गळत होते विद्यार्थी संख्येचा विचार केला तर अपुरे पडत होते. म्हणून साहेबांनी असेच एकदा रयत शताब्दी इमारतीचे काम पाहत असताना सांगितले ऑफिस ला देखील चांगली इमारत पाहिजे लगेच आर्किटेक निकम यांना सांगितले प्लॅन बनवा आणि दाखवा प्लॅन तयार झाला त्यामध्ये दुरुस्त्या होवून कामाला सुरुवात झाली अर्थात खर्च साहेबांनी सांगितले मी आहे काम सुरु करा, सोबतच नॅक साठीचा एसएसआर पूर्ण झाला होता नॅक ची तारीख घ्यायची होती पण त्या आधी नवीन इमारतींचे उद्घाटन करण्यासाठी मा. खा. शरदचंद्रजी पवार साहेब यांची तारीख घेण्याचे ठरले, या सोबतच मा. ॲड. भगीरथ शिंदे साहेबांनी महाविद्यालयाचे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय असे नामकरण करावे असा प्रस्ताव मांडला, सुरुवातील ठाकूर साहेबांनी नकार दिला परंतु सर्वांच्या आग्रहाखातर त्यांनी होकार दिला दि. ८ एप्रिल २०२३ रोजी मा. खा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या हस्ते इमारतीचे उद्घाटन व मा. दिलीप वळसे पाटील साहेब यांच्या हस्ते महाविद्यालयाचे नामकरण रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा असे झाले. त्यानंतर लगेच २६ आणि २७ एप्रिल २०२३ ला महाविद्यालयाची नॅक ची भेट पूर्ण झाली. या भेटीदरम्यान पियर टीमने जावेळी ठाकूर साहेबांची भेट घेतली त्यावेळी ठाकूर साहेबांनी आवर्जून असे सांगितले होते की हे सर्व यश महाविद्यालयाचे आहे, महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी यांचे प्रयत्न आहेत आम्ही फक्त खर्चाची मदत केली. या एका विधानामुळे पियर टीमच्या चेअरमन डॉ. विजयालक्ष्मी मुवा भारावून गेल्या. पुढील वर्ष २०२३-२४ मध्ये महाविद्यालयाने लगेच मुंबई विद्यापीठाच्या बेस्ट कॉलेज साठी प्रस्तवा केला, त्यामध्ये देखील महाविद्यालयास ग्रामीण भागातील मुंबई विद्यापीठाचा

बेस्ट कॉलेज प्रस्ताव महाविद्यालयास प्राप्त झाला. त्याच वर्षी महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवाचे आयोजन देखील महाविद्यालयात झाले, विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी तर ग्रामीण भागात असे महाविद्यालय व या व्यवस्था कुठेच पहिल्या नाहीत असे गौरवउदगार काढले.

पुढील वर्षात २०२४-२५ मध्ये साहेबांनी चांदवड येथील रयत च्या शाखेच्या इमारतीचे उद्घाटन होते तिथे आम्हाला बोलावले होते, त्यावेळी आम्ही भेटल्यावर आम्हाला साहेब गमतीने म्हटले तुम्हाला मी जे १५ लाख देणार होतो ते तुम्ही न मागितल्यामुळे गेले आता हे ऐकल्यावर आमचा चेहरा पाहण्यासारखा झाला होता, थोड्याच वेळात साहेब पुन्हा हसून म्हणाले काम सुरु करा मी आहे. महाविद्यालयातील प्रशासकीय इमारतीच्या वरच्या मजल्याचे बांधकाम करण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी आम्ही काही प्राध्यापक पनवेल येथे साहेबांची भेट घेण्यासाठी गेलो होतो. जाताना जास्त अंतर व गर्दीमुळे आम्हाला उशीर झाला त्यामुळे त्यांनी आम्हाला त्यांच्या उलव्यातील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे बोलवून घेतले, गेल्यावर तिथे शिक्षक भरतीच्या मुलाखती चालू होत्या दरम्यान मोखाडाहून कॉलेज चे प्राध्यापक आलेत असे त्यांना आतमध्ये कळवले परंतु त्यांनी मोहपाडा असे ऐकले आणि आम्हाला २ वाजेपर्यंत थांबावे लागले, नंतर आमची भेट झाल्यावर त्यांच्या लक्षात आले की मोखाड्यातील कॉलेज चे प्राध्यापक आलेले आहेत, नंतर त्यांनी खूप हळहळ व्यक्त केली आणि त्यांच्या स्वतः शेजारी बसून सर्वांना जेवू घातले यावरून असे जाणवते की माणूस खूप मोठा आहे परंत मोठेपणाचा कुठलाही गर्व अजून साहेबांना स्पर्श करू शकलेला नाही. असे कधी होत खासदार राहिलेली पूर्ण रायगड जिल्हा ज्यांचा शब्दावर चालतो ती व्यक्ती प्राध्यापकांना शेजारी बसवते उशीर झाला म्हणून हळहळ व्यक्त करते, जेवू घालते हे खूप मोठेपणाचे आणि जमिनीवरील माणसाचे लक्षण आहे. महाविद्यालयात रयत शिक्षण संस्थेच्या धोरणानुसार सर्व वर्ग खोल्यांमध्ये इंटरॲक्टीव पॅनल लावायचे होते त्यासाठी महाविद्यालयात निधी शिल्लक नव्हता हा विषय साहेबांसमोर गेल्यावर लगेचच साहेबांनी १२ लाख रुपयांचा चेक आमच्या हातात दिला आणि सांगितले सर्व वर्ग खोल्यामध्ये इंटरॲक्टीव पॅनल लावा.

वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ २०२४-२५ कार्यक्रमा दरम्यान साहेबांच्या लक्षात आले की रयत गीताचे रेकॉर्ड वाजवले जात आहे, त्यांनी त्यांच्या भाषणात लगेच संगीत साहित्य खरेदी करण्यासाठी २० लाख रुपये जाहीर केले व दिले आणि सांगितले पुढच्या वेळेस पासून विद्यार्थ्यांनी हे साहित्य वापरून रयत गीत गावे. पुढील शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये प्रशासकीय इमारतीच्या वरच्या मजल्याचे काम सुरु झाले सोबतच, कालामंचाचे देखील काम सुरु झाले, बांधकाम पाहिल्यानंतर साहेबांच्या लक्षात आले की कलामंच विद्यार्थ्यांसाठी लहान आकाराचा होईल लगेच त्यांनी काम थांबूवून त्याचा आकार वाढवण्यासंदर्भात सूचना केल्या व सांगितले खर्चा कडे पाहू नका वास्तू भव्य झाली पाहिजे मी आहे. प्रशासकीय इमारतीच्या वरच्या मजल्यावर एक AI लॅब तयार करण्याचे ठरले विषय साहेबांसमोर गेल्यावर लगेच साहेबांनी कॉम्पुटर, कॉम्पुटर टेबल, AI कीट खरेदी करण्यासाठी साडे आठ लाख रुपये दिले. काम पूर्ण झाल्यावर कलामंच, AI लॅब चे उद्घाटन करण्यासाठी ६ मार्च २०२६ ही तारीख ठरविण्यात आली. या वास्तूंचे रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. चंद्रकांत दळवी साहेबांच्या हस्ते उद्घाटन संपन्न झाले याच कार्यक्रमात मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी महाविद्यालयातील हंगामी सेवक पगार, बेंच खरेदी, बांधकामाच्या बिलांसाठी ३८ लाख रुपयांचे देणगी जाहीर केली व लगेच चेक दिला, माझ्यासमक्ष २०२० ते मार्च २०२६ पर्यंत लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी सुपारे सहा कोटी रुपयांची देणगी मोखाडा महाविद्यालयास दिली आहे कदाचित या पेक्षा जास्त पण दिलेली असू शकते. खरोखरच रामशेठ ठाकूर साहेब मोखाडा महाविद्यालयासाठी आधारवडच आहेत, महाविद्यालयाला कशाचीही गरज भासली की साहेब त्याच क्षणाला ती पूर्ण करतात. साहेबांनी शेठ नावाची व्याख्याच बदलून टाकली आहे

कारण शेठ म्हणले की डोळ्यासमोर नफा कमावणारी लोकांना अडवणारी व्यक्ती डोळ्यासमोर येते, परंतु रामशेठ म्हटले की लोकांचे प्रश्न सोडवणारी, लोकांच्या हाकेला धावून जाणारी, समाजातल्या लहानात लहान घटकांच्या, आदिवासींच्या प्रश्नाचा विचार करणारी व्यक्ती म्हणजे रामशेठ. त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांना उदंड, आनंददायी आयुष्य लाभो हीच प्रार्थना ! त्यांना मन: पूर्वक शुभेच्छा !



महाविद्यालय नवीन इमारतीचे उद्घाटन प्रसंगी, लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, ॲड. भगीरथ शिंदे साहेब व दिलीप वळसे-पाटील साहेब.



नॅकच्या पूर्व पाहणी भेटी दरम्यान दत्तक शाळेस भेट देताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व डॉ. अनिल पाटील साहेब



नॅक पूर्व पाहणी करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व डॉ. अनिल पाटील साहेब



महाविद्यालयातील कलामंच उद्घाटन प्रसंगी मा. चंद्रकांत दळवी साहेब, लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : शिक्षण क्षेत्रातील परिवर्तनाचे शिल्पकार



प्रा. टी. एम. पराडके

सहाय्यक प्राध्यापक,
इंग्रजी विभाग

"शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे." या विचाराचा स्वीकार करून अनेक थोर समाजसुधारकांनी भारतीय समाजाच्या उन्नतीसाठी आयुष्य वेचले. महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभारली. या महान परंपरेचा वारसा पुढे नेणाऱ्या समकालीन नेतृत्वामध्ये महाविद्यालय विकास समितीचे चेरअमन व रयत शिक्षण संस्थेचे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. खा. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे नाव आदराने घेतले जाते. मा. खा. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब हे महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध शिक्षणप्रेमी, समाजसेवक आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व म्हणून ओळखले जातात. सार्वजनिक जीवनात राजकारण, समाजकारण, उद्योग आणि शिक्षण या विविध क्षेत्रांत कार्य करताना त्यांनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यांच्या मते शिक्षण ही केवळ पदवी संपादन करण्याची प्रक्रिया नसून व्यक्तिमत्त्व विकास, चारित्र्यनिर्मिती, सामाजिक उत्तरदायित्व आणि राष्ट्रनिर्मितीचा भक्कम पाया आहे. मा. खा. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचा जन्म २ जून १९५१ रोजी पनवेल, जिल्हा रायगड येथे झाला. त्यांनी बी.ए. आणि बी.एड. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षक म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात करताना त्यांनी शिक्षणाचे महत्त्व जवळून अनुभवले. याच अनुभवातून समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा त्यांनी निर्धार केला. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि शैक्षणिक विकासामध्ये शिक्षण संस्थांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे हे आजच्या काळातील मोठे आव्हान आहे. मा.खा. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी या वास्तवाची जाणीव ठेवून शिक्षण क्षेत्रात विविध स्तरांवर योगदान दिले. त्यांनी शिक्षण हे समाजातील दुर्बल घटकांच्या प्रगतीचे प्रभावी माध्यम आहे, ही भूमिका सातत्याने मांडली आणि त्या विचाराला कृतीची जोड दिली. रयत शिक्षण संस्थेशी त्यांचे असलेले निकटचे नाते हे त्यांच्या शैक्षणिक कार्याचा महत्त्वाचा आधार आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या या संस्थेने "कमवा आणि शिका" या तत्त्वज्ञानाच्या आधारे लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. या महान परंपरेशी एकरूप

होत मा.खा. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी संस्थेच्या विकासासाठी सातत्याने योगदान दिले. संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी, पायाभूत सुविधांच्या विकासासाठी, विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी त्यांनी वेळोवेळी सहकार्य केले. शिक्षण संस्था केवळ इमारतींनी नव्हे तर दूरदृष्टी, गुणवत्ता आणि समाजाभिमुख विचारांनी मोठ्या होतात, हा त्यांचा दृष्टिकोन त्यांच्या कार्यातून दिसून येतो.

मा. खा. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या शैक्षणिक विचारांचा केंद्रबिंदू म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेत यश मिळवू नये, तर ते चांगले नागरिक, संवेदनशील व्यक्तिमत्त्व आणि राष्ट्राच्या विकासात योगदान देणारे जबाबदार युवक बनावेत, अशी त्यांची अपेक्षा आहे. म्हणूनच त्यांनी शिक्षणामध्ये नैतिक मूल्ये, शिस्त, प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन आणि राष्ट्रीय एकात्मता यांना विशेष महत्त्व दिले. त्यांच्या प्रेरणेने अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, वृक्षारोपण, रक्तदान आणि समाजोपयोगी उपक्रमांना प्रोत्साहन मिळाले. आजच्या ज्ञानाधिष्ठित युगामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाशिवाय शिक्षणाची गुणवत्ता वाढू शकत नाही, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. त्यामुळे संगणक शिक्षण, डिजिटल वर्ग, ई-लर्निंग, आधुनिक प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालये आणि माहिती-तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांना त्यांनी प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावरील स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी आधुनिक ज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करावीत, असे त्यांचे मत होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत असा कौशल्याधारित, विद्यार्थीकेंद्रित आणि संशोधनाभिमुख शिक्षणाचा त्यांनी पुरस्कार केला. ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबाबत त्यांची विशेष संवेदनशीलता दिसून येते. आर्थिक अडचणी, भौगोलिक मर्यादा, शैक्षणिक साधनांचा अभाव आणि भाषिक अडथळे यांमुळे अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध व्हावी, त्यांच्या गुणवत्तेला योग्य दिशा मिळावी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांचा सहभाग वाढावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. शिक्षणातील समता आणि सामाजिक न्याय या मूल्यांवर त्यांचा दृढ विश्वास होता. शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा आत्मा आहे, या विचारालाही त्यांनी महत्त्व दिले. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षक सतत अध्ययनशील, संशोधनाभिमुख आणि नाविन्यपूर्ण असणे आवश्यक आहे, असे त्यांचे मत होते. त्यामुळे शिक्षक प्रशिक्षण, संशोधन, कार्यशाळा, परिसंवाद आणि शैक्षणिक गुणवत्तावृद्धी यांसाठी त्यांनी नेहमी प्रोत्साहन दिले. शिक्षण संस्थेची खरी ओळख तिच्या शिक्षकांच्या गुणवत्तेमुळे निर्माण होते, हा त्यांचा विश्वास होता.

मा. खा. रामशेठ ठाकूर यांचे कार्य केवळ शिक्षणसंस्था उभारण्यापुरते मर्यादित नाही. शिक्षणाच्या माध्यमातून सुसंस्कृत, जबाबदार आणि सक्षम समाज घडविण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, कौशल्य, संस्कार आणि सामाजिक जाणीव यांचा समतोल विकास घडवून आणण्याची त्यांची भूमिका आजच्या काळात अधिक महत्त्वाची ठरते. त्यांच्या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळाली आणि अनेक शैक्षणिक संस्थांना विकासाची नवी दिशा मिळाली. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान हे समाजसेवा, दानशूरता, दूरदृष्टी आणि लोकहिताच्या भावनेचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांनी शिक्षणाला केवळ वैयक्तिक प्रगतीचे साधन न मानता सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले. त्यामुळे त्यांचे कार्य आजच्या आणि भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरते. समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचविण्याचा त्यांचा ध्यास, शिक्षण संस्थांप्रती असलेली निष्ठा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची तळमळ यांमुळे मा.खा. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे नाव महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात आदराने घेतले जाते.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान अत्यंत मोलाचे आणि प्रेरणादायी

आहे. त्यांनी शिक्षणाला समाजविकासाचे प्रभावी साधन मानून विविध स्तरांवर कार्य केले. शैक्षणिक संस्था उभारणे, गरीब विद्यार्थ्यांना मदत करणे, आधुनिक शिक्षणाला चालना देणे आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे या माध्यमातून त्यांनी समाजावर अमिट ठसा उमटविला आहे. त्यांचे कार्य भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी असून शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान सदैव स्मरणात राहील.



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभानिमित्त सन्मान करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, मा. चंद्रकांत दळवी साहेब व मा. ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



महाविद्यालयातील डिजिटल साक्षरता केंद्राचे उद्घाटन प्रसंगी लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, डॉ. अनिल पाटील साहेब व मा. ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



महाविद्यालय नवीन इमारतीचे भूमिपूजन करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



महाविद्यालय नवीन इमारतीचे उद्घाटन प्रसंगी मा. शरदचंद्रजी पवार साहेब, लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : शिक्षण, समाजकारण आणि विकासदृष्टीचे प्रेरणास्थान



प्रा. ए. डी. वरठा

सहाय्यक प्राध्यापक,
भौतिकशास्त्र विभाग

महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रात आपल्या दूरदृष्टी, कार्यतत्परता आणि समाजहिताच्या ध्यासाने अमिट ठसा उमटविणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ग्रामीण आणि आदिवासी भागातील शिक्षणाचा प्रसार, सामाजिक उन्नती, रोजगारनिर्मिती आणि विकासाभिमुख नेतृत्व या माध्यमातून त्यांनी हजारो कुटुंबांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणले आहे. बालपणापासूनच त्यांनी शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन असल्याची जाणीव ठेवली. आर्थिक अडचणी, ग्रामीण परिस्थिती आणि मर्यादित साधने असूनही त्यांनी शिक्षणाची कास सोडली नाही. त्याच संघर्षातून पुढे समाजातील वंचित, ग्रामीण आणि आदिवासी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, हा त्यांचा जीवनध्येय बनला.

याच विचारातून त्यांनी 'रयत शिक्षण संस्था' आणि इतर शैक्षणिक उपक्रमांद्वारे ग्रामीण भागात शाळा, महाविद्यालये आणि उच्च शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. आज या संस्थांमधून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असून अनेक विद्यार्थी प्रशासकीय सेवा, उद्योग, व्यवसाय, विज्ञान, तंत्रज्ञान आणि विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत. त्यांच्या मते शिक्षण हे केवळ पदवी मिळविण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याची आणि समाज घडविण्याची प्रक्रिया आहे. मा. रामशेठ ठाकूर यांनी शिक्षणासोबतच औद्योगिक विकासालाही चालना दिली. रोजगारनिर्मिती, स्थानिक युवकांना संधी, उद्योगांना प्रोत्साहन आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या कार्यामुळे रायगड, पनवेल, पालघर आणि परिसरातील विकासाला नवी दिशा मिळाली. त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ शिक्षण किंवा उद्योगापुरते मर्यादित नाही. सामाजिक बांधिलकी, गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, शैक्षणिक संस्थांना सहकार्य, आरोग्य, महिला सक्षमीकरण, युवक विकास आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. अनेक विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी गुप्तपणे आर्थिक मदत केली असून अनेक संस्थांना सक्षम करण्यासाठी त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे.

साधेपणा, प्रामाणिकपणा, लोकसंग्रह आणि कार्यातील सातत्य ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. कोणत्याही पदाचा किंवा प्रसिद्धीचा मोह न बाळगता त्यांनी समाजहितालाच सर्वोच्च स्थान दिले. प्रत्येक व्यक्तीमध्ये क्षमता आहे, तिला योग्य संधी

मिळाली पाहिजे, हा त्यांचा ठाम विश्वास त्यांच्या कार्यातून सतत दिसून येतो. मा. रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अनेक शैक्षणिक संस्था आधुनिक सुविधा, प्रयोगशाळा, ग्रंथालये, क्रीडा संकुले, संशोधन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या दिशेने प्रगत झाल्या. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानासोबतच संस्कार, सामाजिक जाणीव आणि राष्ट्रभक्तीची भावना विकसित करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून अनेक सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रांमध्ये तो आदर्श मानला जातो. त्यांनी उभारलेल्या संस्था आजही त्यांच्या मूल्यांची साक्ष देत आहेत. हजारो विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि समाजातील विविध घटक त्यांना प्रेरणास्थान मानतात.



महाविद्यालय नवीन इमारतीचे उद्घाटन प्रसंगी प्रास्ताविक करताना मा. ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



महाविद्यालय नवीन इमारतीचे उद्घाटन प्रसंगी लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे स्वागत करताना मा. शरदचंद्रजी पवार साहेब.



महाविद्यालय नवीन इमारतीचे उद्घाटन प्रसंगी मा. आ. प्रशांत ठाकूर साहेब यांचा सन्मान करताना ॲड. भगीरथ शिंदे साहेब. समवेत लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब.



महाविद्यालय नवीन इमारतीचे उद्घाटन प्रसंगी लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, ॲड. भगीरथ शिंदे साहेब व दिलीप वळसे-पाटील साहेब.

लोकसेवेचा दीपस्तंभ : लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर

सेवेतून घडले व्यक्तिमत्त्व महान,
कर्तृत्वाने वाढविला जनमान;
अमृतपर्वी वंदन करितो आज,
लोकनेते मा. रामशेठ ठाकूरांना शतशः प्रणाम.



प्रा. एस. आर. व्हंडे
सहाय्यक प्राध्यापक,
विभागप्रमुख रसायनशास्त्र

लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर हे महाराष्ट्रातील शिक्षण, समाजसेवा, ग्रामीण विकास आणि लोक-हितासाठी समर्पित असलेले प्रभावशाली व कृतीशील नेतृत्व म्हणून संपूर्ण राज्यभर व रयत परिवारामध्ये आदराने ओळखले जातात. ते केवळ शिक्षणप्रेमी नसून समाज-मन जपणारे एक कुतीशील व संवेदनशील लोकनेते आहेत. उत्कृष्ट उद्योजक, शिक्षणप्रेमी, समाजसेवक आणि दूरदृष्टी असलेले राजकीय नेते म्हणून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा महाराष्ट्राच्या सामाजिक, उद्योजिक व शैक्षणिक क्षेत्रावर उमटवला आहे. रायगड जिल्ह्यातील पनवेल येथून त्यांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय कार्याची सुरुवात केली. सर्व सामान्य जनतेच्या समस्या, ग्रामीण भागातील विकास आणि शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कार्यामुळे त्यांना "लोकनेते" ही उपाधी सर्व सामान्य जनतेकडून त्यांना लाभली आहे. समाजाचा प्रत्येक घटक हा सुखी आसला पाहिजे हि त्यांची मनोमन इच्छा सदेव आसते. त्यांचा जन्म २ जून १९५१ रोजी झाला असून हे वर्ष रयत शिक्षण संस्थेच्या वतीने त्याचे अमृत वर्ष म्हणून सर्व शाखे मध्ये साजरे होत आहे याचा सर्व रयत सेवकांना देखील मनस्वी खूप आनंद होत आहे . त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य हे ग्रामीण, गरीब शेतकरी, कामगार तसेच आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले व आज पण करत आहेत. मोखाडा या आदिवासी भागामध्ये त्यांनी अनेक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गेली अनेक वर्ष आर्थिक मदत केली आहे व आज देखील करत आहेत. एवढेच नव्हे तर आज मोखाडा येथील महाविद्यालय हे एक सर्व सोयीने सुसज्ज महाविद्यालय बनले आहे त्यामागे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे फार मोठे योगदान आहे.

आपल्या राजकीय जीवनामध्ये त्यांनी कुलाबा लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार म्हणून संसदेत जनतेचा आवाज प्रभावीपणे मांडला आणि मतदारसंघाच्या विकासासाठी विविध स्तरांवर महत्त्वपूर्ण कामे केली. एवढेच नाही तर कोरोना काळातील महामारीमध्ये अनेक गोरगरिबांच्या मदतीला त्याचे संपूर्ण कुटुंब धावून आले. त्यांच्या राजकीय प्रवासात त्यांनी शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस तसेच भारतीय जनता पक्षाशी संबंधित विविध सार्वजनिक कार्यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. मात्र

राजकारणापेक्षा शिक्षण आणि समाजसेवा हेच त्यांच्या जीवन कार्याचे मुख्य केंद्र राहिले. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे. शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, या विचारावर त्यांचा दृढ विश्वास होता. म्हणूनच ग्रामीण, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था, महाविद्यालये आणि सामाजिक उपक्रम उभारले. आज आपण पहिले तर संपूर्ण पनवेल, खारघर, नवी मुंबई याच्या विकासामध्ये त्यांचे खूप मोठे योगदान आहे व त्यांच्या प्रयत्नांमुळे हजारो विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले आणि अनेक विद्यार्थ्यांचे जीवन शिक्षणाच्या माध्यमातून उज्ज्वल झाले.

रयत शिक्षण संस्थेशी त्यांचे नाते अतिशय प्रेरणादायी व संवेदनशील राहिले आहे. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९१९ मध्ये स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या "स्वावलंबनातून शिक्षण" आणि "कमवा व शिका" या विचारसरणीचा त्यांच्या जीवनावर मोठा प्रभाव पडला. स्वतः रयत शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी असलेल्या रामशेठ ठाकूर साहेब यांनी "कमवा व शिका" योजनेतून आपले उच्च शिक्षण पूर्ण केले. त्यामुळे संघर्षातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणी त्यांनी जवळून अनुभवल्या आणि त्यातूनच शिक्षण क्षेत्रात कार्य करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली व हा घेतलेला वसा ते आज देखील तेवढ्याच प्रामणिकपणे सांभाळत आहेत. रयत शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी आणि व्यवस्थापन परिषदेचे जेष्ठ सदस्य म्हणून त्यांनी संस्थेच्या विस्तारासाठी, आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि वैचारिक सहकार्यामुळे अनेक शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक प्रकल्पांना नवी दिशा मिळाली आहे . सातारा येथील "लोकनेते मा. रामशेठ ठाकूर भवन" व मोखाडा येथील लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा हे त्यांच्या शैक्षणिक योगदानाचे प्रेरणादायी प्रतीक मानले जाते.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी केलेले त्यांचे कार्य विशेष गौरवास्पद आहे. मोखाडा आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळावी यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. आधुनिक वर्गखोल्या, विज्ञान प्रयोगशाळा, वाचनालये, संगणक सुविधा आणि डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाशी जोडण्याचे काम त्यांनी केले. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन आणि नेतृत्वगुण विकसित व्हावेत यासाठी विविध प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख उपक्रम राबविण्यास त्यांनी प्रथम प्राधान्य दिले आहे. आज मोठ्या अभिमानाने रयत शिक्षण संस्थेचे समृद्ध शैक्षणिक संकुल पालघर जिल्ह्यातील मोखाडा ह्या आदिवासी तालुक्यामध्ये मोठ्या दिमाखात कार्य करीत असल्याचे दिसून येते. यामध्ये आदरणीय रामशेठ ठाकूर साहेबांचे व भगीरथ काका शिंदे साहेब यांचे भरीव योगदान व कार्य आहे आणि आज रयत शिक्षण संस्थेचे, लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालय, मोखाडा हे पालघर जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचे महत्त्वपूर्ण केंद्र ठरले आहे. मोखाडा हा डोंगराळ आणि आदिवासी भाग असल्याने येथील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. अशा परिस्थितीत हे महाविद्यालय आज सर्व सुख सोयीने संपन्न झाले असून आदिवासी युवकासाठी शिक्षणाचे आशेची किरण ठरले.

या महाविद्यालयाच्या उभारणीसाठी आणि विकासासाठी मा. रामशेठ ठाकूर साहेब यांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि वैचारिक योगदान दिले. त्यांच्या दूरदृष्टी व सहकार्यामुळे आधुनिक शैक्षणिक सुविधा, प्रयोगशाळा, वाचनालये, शिष्यवृत्ती योजना आणि विविध विकासात्मक उपक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध झाले. त्यांनी केवळ शिक्षणापुरते मर्यादित न राहता आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासा करिता नेहमीच कार्य केले आहे. आरोग्य, पिण्याचे पाणी, रोजगार, सामाजिक जागृती आणि युवक विकास या क्षेत्रांत त्यांनी अनेक उपक्रम राबविले. "Earn and Learn",

Biofloc मत्स्यपालन, वारली कला-संवर्धन, कौशल्य विकास प्रशिक्षण यांसारख्या योजनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये रोजगाराभिमुख दृष्टीकोन निर्माण झाला. त्यांच्या योगदानामुळे अनेक विद्यार्थी शिक्षक, अधिकारी, उद्योजक आणि समाजाभिमुख नागरिक म्हणून घडले आहेत.

रामशेठ ठाकूर साहेब हे केवळ शिक्षणप्रेमी नसून समाज-मन जपणारे एक कृतीशील व संवेदनशील लोकनेते आहेत. युवक विकास, क्रीडा, सांस्कृतिक जतन, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेम यांना त्यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, प्रामाणिकपणा, नैतिकमूल्ये आणि सामाजिक जबाबदारी निर्माण व्हावी यासाठी ते सातत्याने मार्गदर्शन करत असतात. शिक्षणासोबत संस्कार आणि मूल्याधारित जीवनाचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रुजवले आहे. त्यांच्या दीर्घकालीन शैक्षणिक आणि सामाजिक योगदानाचा गौरव म्हणून शासकीय स्तरावर तसेच विविध संस्थांकडून त्यांना अनेक सन्मान व पुरस्कार देखील प्राप्त झाले आहेत. रयत शिक्षण संस्थेकडून प्रदान करण्यात आलेला **"इस्माईलसाहेब मुल्ला जीवन गौरव पुरस्कार"** हा त्यांच्या कार्याचा सर्वात मोठा सन्मान मानला जातो. शिक्षण, समाजसेवा, ग्रामीण विकास आणि मानवतावादी दृष्टिकोन यांचा सुंदर समन्वय घडवणारे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब हे आजही समाजासाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांचे कुटुंबही सार्वजनिक जीवनात सक्रिय असून समाजसेवेची परंपरा पुढे नेत आहे. त्यांचे पुत्र मा. श्री. प्रशांत ठाकूर हे पनवेलचे विधानसभा चे आमदार म्हणून कार्यरत आहेत, तर श्री. परेश ठाकूर यांनी समाजसेवक आणि नगरसेवक म्हणून कार्य करत आहेत. त्यांच्या कुटुंबानेही शिक्षण, समाजकार्य आणि विकासाची परंपरा जपली आहे.

आज महाराष्ट्रातील शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांच्या कार्यामुळे अनेक कुटुंबांचे जीवन बदलले, अनेक विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार झाली आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू लागला. त्यांचे कार्य हे केवळ संस्था उभारण्या पुरते मर्यादित नसून समाजातील वंचित घटकांना सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणारे आहे.

लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर साहेब हे शिक्षण, समाजसेवा, मानवता आणि लोक-कल्याण यांचे खरे उपासक आहेत.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब म्हणजे गोरगरीब लोकाचे संकट काळातील खरे सोबती आहेत त्यांनी आज वर अनेक लोकांची स्वभिमानाने कुटुंबे मजबूत करून शैक्षणिक प्रगतीच्या दिशेने नेण्यास मदत केली आहे. हा मदतीचा हात व वसा आपण सर्वांनी पुढे नेला पाहिजे व लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब याच्या सारखे दानत्व आपण देखील जपले पाहिजे व शेवटी एवढेच म्हणावे लागेल, देणार्याने देत जावे घेणार्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस देणार्याने रामशेठ व्हावे...

शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडविण्याचा त्यांनी निर्माण केलेला आदर्श पुढील पिढ्यांसाठी लोकसेवेचा प्रेरणादायी दीपस्तंभ ठरत राहील, यात कोणतीही शंका नाही. आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण आनंद, समाधान, उत्तम आरोग्य आणि यशाने उजळून निघो.

लोकसेवेचा दीप अखंड तेवत राहिला, शिक्षणातून समाजपरिवर्तनाचा मार्ग उजळला; अमृतपर्वी वंदन त्या महान व्यक्तिमत्त्वाला, अमृतपर्वी वंदन त्या थोर कर्तृत्वाला...! खरंच या लोकनेत्यांस त्रिवार वंदन!

कर्मवीर अण्णांच्या विचाराने प्रेरित झालेल्या मा. रामशेठ ठाकूर साहेबांच्या हातून हे समाजाभिमुख कार्य असेच निरंतर घडत जावो त्यांच्या कार्याला उत्तरोत्तर यश लाभो, समाजसेवेचा आणि प्रगतीचा अखंड प्रवास अधिक प्रेरणादायी ठरो, तसेच आपल्या कार्य-कर्तृत्वाने समाजात नवे आदर्श निर्माण होत राहोत याच अमृत महोत्सवानिमित्त दीर्घायुष्यसाठी मनःपूर्वक अभिष्टचिंतन शुभेच्छा!

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : शिक्षण, संशोधन आणि समाजपरिवर्तनाचे दूरदर्शी शिल्पकार



प्रा. डॉ. आर. ए. कवळे

सहाय्यक प्राध्यापक,
रसायनशास्त्र विभाग

"शिक्षण हीच समाजाच्या प्रगतीची खरी गुरुकिल्ली आहे." या विचारावर दृढ विश्वास ठेवून शिक्षण क्षेत्रात आयुष्यभर कार्य करणारे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर हे केवळ एक लोकनेते नसून हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण, आधुनिक सुविधा आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उदात्त हेतूने ते चालवत असलेल्या शैक्षणिक संस्थेत आज ज्ञान, संस्कार आणि संशोधनाची समृद्ध केंद्रे बनली आहेत. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा ही रयत शिक्षण संस्थेची शाखा त्यांच्या शैक्षणिक दूरदृष्टीची साक्ष देणारी आहे. आदिवासी व दुर्गम भागात असूनही या महाविद्यालयामध्ये आधुनिक प्रयोगशाळा, संशोधनासाठी आवश्यक अत्याधुनिक उपकरणे, रसायने, संशोधन साहित्य आणि विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे. या सुविधा केवळ विद्यार्थ्यांपुरत्या मर्यादित नसून शिक्षकांनाही संशोधनासाठी सातत्याने प्रेरणा देणाऱ्या ठरल्या आहेत.

एक शिक्षक आणि संशोधक म्हणून मला या महाविद्यालयात कार्य करण्याची संधी मिळाली, हे माझे भाग्य समजतो. संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा, प्रयोगशाळेतील अत्याधुनिक उपकरणे, आवश्यक रसायने आणि संशोधन साहित्य महाविद्यालयाने लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांनी केलेल्या आर्थिक मदतीमुळे वेळोवेळी उपलब्ध करून दिले. त्यामुळे माझ्या संशोधन कार्याला योग्य दिशा मिळाली आणि माझ्या शैक्षणिक वाटचालीत महत्त्वपूर्ण टप्पे गाठणे शक्य झाले. या महाविद्यालयातील संशोधनपूरक वातावरणामुळेच मला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची रसायनशास्त्र विषयात पीएच. डी. यशस्वीरीत्या पूर्ण करता आली. पीएच.डी. संशोधनासाठी आवश्यक असलेले अनेक प्रयोग, विश्लेषणे आणि संशोधनाचे काम महाविद्यालयातील प्रयोगशाळेमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधांच्या सहाय्याने पूर्ण करण्यात आले. त्यामुळे माझे संशोधन अधिक गुणवत्तापूर्ण झाले आणि वेळेत पूर्ण करणे शक्य झाले.

महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या संशोधन सुविधांच्या बळावर मी चार मायनर रिसर्च प्रोजेक्ट्स यशस्वीरित्या पूर्ण केले. तसेच वाशी येथील महाविद्यालयाने मंजूर केलेला एक मायनर रिसर्च प्रोजेक्ट

देखील याच प्रयोगशाळेतील सुविधांचा उपयोग करून पूर्ण करण्यात आला. संशोधनासाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या साहित्यामुळे आणि सकारात्मक वातावरणामुळे हे प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करता आले. याच संशोधनपर वातावरणाचा परिणाम म्हणून माझ्या नावावर दोन भारतीय पेटंट्स, सात आंतरराष्ट्रीय संशोधन लेख आणि विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदांमध्ये संशोधन सादर करण्याचा मान मिळाला. या सर्व संशोधन कार्यामागे महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या प्रयोगशाळा, उपकरणे आणि व्यवस्थापनाचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन यांचा सिंहाचा वाटा आहे.

महाविद्यालयातील प्रयोगशाळेचा लाभ केवळ शिक्षकांनाच नव्हे, तर विद्यार्थ्यांनाही मोठ्या प्रमाणावर होत आहे. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण व्हावी, त्यांना प्रत्यक्ष संशोधनाचा अनुभव मिळावा आणि समाजोपयोगी संशोधन करण्याची प्रेरणा मिळावी यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. याचाच एक भाग म्हणून "रानकेळी (Rock Banana) वनस्पतीच्या खोडाच्या रसाचा किडनी स्टोनवरील परिणाम" या विषयावर विद्यार्थ्यांकडून संशोधन प्रकल्प पूर्ण करून घेण्यात आला. महाविद्यालयातील प्रयोगशाळेतील उपलब्ध सुविधा, आवश्यक उपकरणे आणि संशोधन साहित्य यांच्या सहाय्याने हा प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण झाला. या संशोधनाला मुंबई विद्यापीठाच्या 'आविष्कार' संशोधन स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला. तसेच रयत शिक्षण संस्थेच्या आविष्कार स्पर्धेतही या संशोधन प्रकल्पाला तृतीय क्रमांक प्राप्त झाला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी केलेल्या संशोधनाला मिळालेली ही मानाची पावती असून महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे.

आज या महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी संशोधन प्रकल्प, आविष्कार स्पर्धा, राष्ट्रीय परिषद, उच्च शिक्षण आणि विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. या सर्व यशामागे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी उभारलेली दर्जेदार शैक्षणिक व्यवस्था, आधुनिक प्रयोगशाळा आणि संशोधनाला दिलेले प्रोत्साहन हेच प्रमुख कारण आहे. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी केवळ शिक्षणसंस्था उभारल्या नाहीत, तर संशोधनाची संस्कृती रुजवली, विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ दिले आणि शिक्षकांना नवनवीन संशोधन करण्यासाठी आवश्यक वातावरण निर्माण केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आज ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनाही महानगरांतील विद्यार्थ्यांप्रमाणे संशोधनाच्या काही संधी उपलब्ध झाल्या आहेत. आज मी अभिमानाने सांगू शकतो की, माझी पीएच.डी., चार मायनर रिसर्च प्रोजेक्ट्स, वाशी महाविद्यालयाचा मंजूर मायनर रिसर्च प्रोजेक्ट, दोन भारतीय पेटंट्स, सात आंतरराष्ट्रीय संशोधन लेख, तसेच विद्यार्थ्यांना आविष्कार स्पर्धेत मिळालेले राज्यस्तरीय यश या सर्व उपलब्धींच्या मागे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी निर्माण केलेले संशोधनपूरक वातावरण, आधुनिक प्रयोगशाळा, व्यवस्थापनाचे सहकार्य आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची त्यांची दूरदृष्टी हा भक्कम पाया आहे.

"आम्हाला शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याचे भाग्य लाभले नाही. मात्र लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे कार्य जवळून पाहण्याची, त्यांच्या शिक्षणविषयक दूरदृष्टीचा अनुभव घेण्याची आणि समाजासाठी त्यांनी केलेल्या निःस्वार्थ कार्याची साक्षीदार होण्याचे भाग्य आम्हाला लाभले. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी निर्माण केलेल्या शैक्षणिक संधी, संशोधनाला दिलेले प्रोत्साहन आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडविण्याचा त्यांचा ध्यास पाहताना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याची प्रेरणा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात जाणवते. अशा शिक्षणप्रेमी लोकनेत्यांच्या सहवासात कार्य करण्याची संधी मिळणे, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि प्रेरणादायी बाब आहे." लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे शिक्षण, संशोधन आणि समाजसेवेतील योगदान हे येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील. त्यांच्या कार्यामुळे हजारो विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार झाली असून भविष्यातही त्यांची प्रेरणा ज्ञानाचा दीप प्रज्वलित करत राहील. त्यांच्या महान कार्याला मनःपूर्वक अभिवादन!

मा. रामशेठ ठाकूर : शिक्षण विकासातील योगदानाचा अभ्यास



प्रा. पी. टी. भोये

सहाय्यक प्राध्यापक,
प्राणिशास्त्र विभाग

शिक्षण ही केवळ ज्ञान संपादनाची प्रक्रिया नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याची, सामाजिक जाणीव विकसित करण्याची आणि राष्ट्रनिर्मितीची प्रभावी शक्ती आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये आत्मविश्वास, कौशल्य, मूल्ये आणि जबाबदारीची भावना निर्माण होते. त्यामुळेच कोणत्याही समाजाच्या प्रगतीचा पाया शिक्षणातच दडलेला असतो. महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासात अनेक दूरदृष्टीच्या नेतृत्वांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्या परंपरेत लोकनेते तथा माजी खासदार मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे नाव विशेष आदराने घेतले जाते. शिक्षणाविषयीची त्यांची आस्था, समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि विकासाभिमुख दृष्टी यांमुळे त्यांनी शैक्षणिक संस्थांच्या प्रगतीला दिशा दिली. विशेषतः रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक आणि संघटनात्मक विकासात त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते.

रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या आणि प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांपैकी एक आहे. कर्मवीर पद्मभूषण डॉ. भाऊराव पाटील यांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी या संस्थेची स्थापना केली. ग्रामीण, शेतकरी, कामगार, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत शिक्षण पोहोचावे, या ध्येयातून त्यांनी "कमवा आणि शिका" ही अभिनव योजना सुरू केली. या योजनेने हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा दिली. आज ही संस्था प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षण, संशोधन आणि व्यावसायिक शिक्षणापर्यंत व्यापक कार्य करत असून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणून ओळखली जाते. शंभर वर्षांहून अधिक काळाच्या या प्रवासात अनेक शिक्षणप्रेमी व्यक्तींनी संस्थेच्या विकासात मोलाची भूमिका बजावली. त्यामध्ये मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. त्यांच्या दृष्टीने शिक्षण म्हणजे केवळ पदवी किंवा प्रमाणपत्र मिळविण्याचे साधन नव्हते; तर ते चांगला नागरिक, जबाबदार समाजघटक आणि मूल्यनिष्ठ व्यक्तिमत्त्व घडविण्याचे माध्यम होते. म्हणूनच त्यांनी शिक्षणाकडे नेहमी समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने पाहिले.

लोकप्रतिनिधी म्हणून कार्य करताना त्यांनी ग्रामीण विकास, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना सातत्याने प्राधान्य दिले. समाजाचा सर्वांगीण विकास शिक्षणातूनच शक्य आहे, या विश्वासामुळे त्यांनी विविध शैक्षणिक संस्थांना आवश्यक ते मार्गदर्शन आणि सहकार्य दिले.

त्यांची विकासदृष्टी ही केवळ भौतिक सुविधांपुरती मर्यादित नसून ती गुणवत्तापूर्ण शिक्षण, सामाजिक समता आणि विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोनावर आधारित आहे. रयत शिक्षण संस्थेशी त्यांचे नाते केवळ प्रशासकीय जबाबदारीचे नव्हते, तर ते संस्थेच्या विचारधारेशी जोडलेले होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी मांडलेली समान संधी, सामाजिक न्याय आणि सर्वांसाठी शिक्षण ही तत्त्वे त्यांनी आपल्या कार्यातून जपली. संस्थेच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि पायाभूत विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध उपक्रमांना त्यांनी सातत्याने पाठबळ दिले.

शिक्षण क्षेत्र झपाट्याने बदलत असताना गुणवत्ता, संशोधन, डिजिटल तंत्रज्ञान, कौशल्याधारित शिक्षण आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम यांचे महत्त्व वाढत आहे. या बदलांचा स्वीकार करून शिक्षण संस्था अधिक सक्षम आणि आधुनिक व्हाव्यात, विद्यार्थ्यांना नव्या तंत्रज्ञानाशी जोडले जावे आणि शिक्षकांनी संशोधनाला चालना द्यावी, असा त्यांचा ठाम दृष्टिकोन होता. त्यांच्या मते, महाविद्यालयाचा विकास केवळ नवीन इमारती उभारण्यात नसून विद्यार्थ्यांना सक्षम शिक्षक, आधुनिक प्रयोगशाळा, संशोधनाच्या संधी आणि दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यात आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांविषयी त्यांना विशेष आत्मीयता होती. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण खंडित होऊ नये, गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांना समान संधीने मिळावे आणि दुर्गम भागातील महाविद्यालयांनाही आधुनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचविण्याच्या ध्येयाशी ते कायम एकनिष्ठ राहिले. त्यांचा आणखी एक महत्त्वाचा विचार म्हणजे शिक्षण संस्थांच्या विकासात समाजाच्या सक्रिय सहभागाची आवश्यकता. समाज, उद्योग, माजी विद्यार्थी आणि शिक्षणप्रेमी नागरिक यांच्या सहकार्यामुळे संस्था अधिक सक्षम बनतात, असा त्यांचा विश्वास होता. या सहकार्यामुळे अनेक विकासात्मक उपक्रमांना गती मिळाली आणि विद्यार्थ्यांसाठी अधिक समृद्ध शैक्षणिक वातावरण निर्माण झाले.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा यांच्या विकासातही त्यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. कॉलेज डेव्हलपमेंट कमिटीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी महाविद्यालयाच्या गरजा ओळखून दूरदृष्टीने निर्णय घेतले. नवीन शैक्षणिक इमारतीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. परिणामी विद्यार्थ्यांसाठी अधिक प्रशस्त, सुसज्ज आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सुविधा निर्माण झाल्या. तंत्रज्ञानाधारित शिक्षणाची आवश्यकता लक्षात घेऊन त्यांनी महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence AI) प्रयोगशाळा उभारण्यास प्रोत्साहन दिले. या प्रयोगशाळेमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची आणि डिजिटल कौशल्ये विकसित करण्याची संधी उपलब्ध झाली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक विकासासाठी 'संस्कृती कलामंच' उभारण्यासही त्यांनी विशेष प्राधान्य दिले. या व्यासपीठामुळे नाट्य, संगीत, साहित्य, वक्तृत्व, लोककला आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला आहे.

मा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या दूरदर्शी मार्गदर्शनामुळे आणि विकासाभिमुख नेतृत्वामुळे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोकाडा यांनी शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, सामाजिक बांधिलकी, विद्यार्थी विकास आणि संस्थात्मक व्यवस्थापन या सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल घेत मुंबई विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी या महाविद्यालयाची ग्रामीण विभागातील '**सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार** (Best College Award -Rural Area)' म्हणून निवड केली. हा सन्मान केवळ महाविद्यालयासाठीच नव्हे, तर ग्रामीण व आदिवासी भागातील गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाच्या चळवळीचा गौरव मानला जातो. महाविद्यालयाने

अध्यापन, संशोधन, राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी, विस्तार सेवा, सामाजिक उत्तरदायित्व, नवोपक्रम आणि विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांच्या माध्यमातून उत्कृष्ट कार्य सिद्ध केले आहे. या यशामागे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, स्थानिक समाज तसेच मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे दूरदर्शी मार्गदर्शन आणि रयत शिक्षण संस्थेच्या मूल्याधिष्ठित परंपरेचे मोठे योगदान आहे. हा पुरस्कार महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण वाटचालीची आणि ग्रामीण शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची महत्त्वपूर्ण पावती ठरली आहे.

याशिवाय संशोधन, कौशल्य विकास, क्रीडा, समाजाभिमुख उपक्रम आणि व्यक्तिमत्त्व विकासाशी संबंधित विविध कार्यक्रम महाविद्यालयात सातत्याने राबविले जावेत, यासाठी त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यांच्या नेतृत्वामुळे हे महाविद्यालय ग्रामीण आणि आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षणाचे सक्षम केंद्र म्हणून विकसित होत आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर बहुविषयक शिक्षण, संशोधन, नवोपक्रम, कौशल्य विकास आणि डिजिटल शिक्षण यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या बदलत्या शैक्षणिक वातावरणातही रयत शिक्षण संस्थेने आपल्या सामाजिक बांधिलकीसह गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा अधिक सक्षमपणे पुढे न्यावी, अशी अपेक्षा मा. रामशेठ ठाकूर साहेब सातत्याने व्यक्त करीत आले आहेत. रयत शिक्षण संस्थेचा इतिहास हा केवळ एका शैक्षणिक संस्थेचा इतिहास नसून सामाजिक परिवर्तनाचा प्रेरणादायी प्रवास आहे. या प्रवासात अनेक शिक्षणप्रेमी व्यक्तींनी आपले योगदान दिले असून मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे कार्य शिक्षण, समाजसेवा आणि विकासदृष्टी यांचा समन्वय साधणारे म्हणून विशेष लक्षात राहते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे संस्थेतील अनेक विकासकामांना गती मिळाली आणि विद्यार्थ्यांसाठी अधिक आधुनिक, सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या.

आज रयत शिक्षण संस्था नव्या उमेदीने पुढे वाटचाल करत असताना मा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्यासारख्या शिक्षणप्रेमी नेतृत्वाची प्रेरणा संस्थेसाठी अत्यंत मोलाची आहे. शिक्षणावरील गुंतवणूक ही समाजाच्या भविष्यावरील गुंतवणूक असते, हा त्यांचा विचार आजही तितकाच समर्पक आणि प्रेरणादायी वाटतो. शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि विकास यांचा समतोल साधणारे त्यांचे कार्य रयत शिक्षण संस्थेच्या इतिहासात दीर्घकाळ स्मरणात राहील आणि पुढील पिढ्यांसाठी प्रेरणेचा स्रोत ठरेल.



महाविद्यालय नवीन इमारतीचे उद्घाटन प्रसंगी स्वागत स्वीकार करताना आमदार प्रशांत ठाकूर साहेब. समवेत मा. शरदचंद्रजी पवार साहेब व लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब.



महाविद्यालयातील विद्यार्थी देवराज लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांना वारली पेटींग भेट देताना. समवेत मा. शरदचंद्रजी पवार साहेब.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे शिक्षण क्षेत्रातील अतुलनीय योगदान



प्रा. एच. एम. महाले

सहाय्यक प्राध्यापक,
व्यवसाय अभ्यासक्रम विभाग

"शिक्षण हेच समाजपरीवर्तनाचे सर्वात प्रभावशाली असे साधन आहे. या विचारांना कृतीत उतरविणारे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान अत्यंत उल्लेखनीय आणि प्रेरणा देणारे आहे. समाजातील प्रत्येक गरजू विद्यार्थ्याला दर्जेदार उत्तम शिक्षण मिळावे तसेच ग्रामिण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्याना प्रगती करण्यासाठी समान संधी मिळावी आणि शिक्षणाच्या माध्यमातून कार्यक्षम समाज घडावा, या उद्देशाने त्यांनी आयुष्यभर कार्य केलेले आहे. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. त्यासाठी त्यांनी शाळा महाविद्यालये शिक्षण संस्था उभारणीच्या कमी व विकासासाठी खूप मोलाचे योगदान दिलेले आहे.वशेषकरून ग्रामिण भागातील मुलांना शहरातील विद्यार्थ्या प्रमाणे दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी ते सतत प्रयत्न करीत असतात.

ज्या रयत शिक्षण संस्थेने त्यांना घडविले आहे, त्या रयत शिक्षण संथेबद्दल त्यांनी कायमच कृतज्ञत व्यक्त केली. संस्थेच्या विवध कामासाठी, विकासासाठीमोठ्या उदारतेने आर्थिक मदत केली आहे. शाळा, महाविद्यालये यांच्या इमारती विद्यार्थ्यासाठी आवश्यक सुविधा, ग्रंथालये आणि इतर विकासकामांसाठी त्यांनी केलेल्या आर्थिक मदतीमुळे हजारो विद्यार्थ्यासाठी आधुनिक शैक्षणिक वातावरण उपलब्ध झालेले आहे. मोखाडा परिसरातील आदिवासी आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्याच्या शिक्षणासाठीही विशेष लक्ष दिलेले आहे.शिक्षणाच्या सुविधा ग्रामिण भागापर्यंत पोहचाव्यात, गुणवत्तापूर्ण शिक्षण चांगले शिक्षक मिळावेत आणि विद्यार्थ्याना उच्च शिक्षणाची प्रेरणा मिळाव, यासाठी त्यांना विविध स्तरांवर आर्थिक मदत देऊन सहकार्य केलेले आहे.अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक मदत शैक्षणिक साहित्य आणि इतर आवश्यक मदत मिळवून देण्यात त्यांची महत्वपूर्ण भूमिका आहे.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब मोखाडा महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीत सहभागी झाल्यापसून मोखाडा महाविद्यालयाचा चेहरा मोहराच बदलून टाकला आहे, साहेब व्यवस्थापन समितीवर येण्याअगोदर मोखाडा महाविद्यालयाच्या दोन इमारती त्याही पुरेशा नव्हत्या सर्व वर्गांसाठी वर्ग खोल्या अपु या पडत होत्या, त्यांतर संस्थेने नवीन इमारत बांधायचे ठरविल्यानतर या नवीन इमारतीचा दुसरा मजला तिसरा व्हावा यासाठी साहेबांनी आग्रह धरला आणि त्यासाठीची सर्व आर्थिक मदत देऊन

महाविद्यालयाची भव्य टोलेजंग अशी इमारत उभी करण्यात मोलाचे योगदान आहे.साहेबानी इमारत बांधल्या नंतर थांबले नाहीत, तर नवीन इमारतीतील सर्व वर्ग खोल्या सुसज्य सर्व सोयियुक्त आसाठी आग्रही राहिले.त्यासाठी लागेल तेवढी आर्थिक मदत देऊन ते काम पूर्ण करून घेतले, तसेच इमारतीतील प्रयोगशाळा यासठी फर्निचर सर्व साहित्य खरेदी करण्यासाठी आर्थिक मदत देऊन ते काम परिपूर्ण करून घेतले महाविद्यालयाची इमारत झाल्यानतर साहेबांचे लक्ष गेले ते कार्यालयाकडे, कार्यालयाला इमारत नाही, मग कार्यालय बांधण्यासाठी सर्व आर्थिक मदत देऊन महाविद्यालयाच्या कार्यालयाचीही भव्य इमारत उभी करून दिली, अशा प्रकारे महाविद्यालयात कोणतही कमतरता रहाणार नाही याकडे साहेबांचे बारीक लक्ष असते.

साहेब महाविद्यालयाला भेट देतात तेव्हा महाविद्यालयाचे काम कसे चाललेय, काही अडचणी आहेत काय याची बारकाईने चौकशी करतात आणि त्या दूर करण्यासाठी सर्व काही मदत करतात, कोणत्याही कामाची उणीव राहून देत नाहीत. रामशेठ ठाकूर साहेब यांनी शिक्षणासोबत संस्कार,शिस्त, राष्ट्रप्रेम आणि सामाजिक बांधिलकी यांनाही तेवढेच महत्व दिले आहे. त्यांच्या मते शिक्षण हे केवळ पदवी मिळण्याचे साधन नसून चांगला नागरिक घडविण्याची प्रक्रिया आहे. त्यामुळे विद्यार्थ्यामध्ये नैतिक मुल्ये, सामाजिक उत्तरदायित्व आणि नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी विविध उपक्रमांना महत्व दिले आहे.

त्यांच्या शैक्षणिक कार्याचा लाभ हजारो कुटुंबाना झाला आहे. अनेक विद्यार्थ्यानी शिक्षणाच्या बळावर आपले आणि आपल्या परिवाराचे जीवनमान उंचावले आहे. त्यांच्या या कार्यामुळे शिक्षणाचा प्रकाश अतिशय दुर्गम भागापर्यंत पोहचला आहे. आणि समाज्याच्या विकासाला चालना मिळाली. त्यांची दूरदृष्टी, समाजसेवेची तळमळ आणि शिक्षणावरील विश्वासभावी पिढ्यासाठी सदैव प्रेरणादायी राहील. ज्ञानाचा दीपतेवत ठेवणारा समाजसेवक, शिक्षणाला जीवनधर्म मानणारा लोकनेता आणि हजारो विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचा शिल्पकार म्हणून रामशेठ रामशेठ ठाकूर साहेब यांचे नाव सदैव आदराने स्मरणात राहील.



महाविद्यालय नवीन इमारतीचे उद्घाटन प्रसंगी मा. शरदचंद्रजी पवार साहेब व लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब.



महाविद्यालय नवीन इमारतीचे उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब.

करुणाशील व दातृत्ववान : लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर



प्रा. पी. आर. हवाले

सहाय्यक प्राध्यापक,
प्राणिशास्त्र विभाग

शनिवार दिनांक ६ जुलै २०२४ चा तो दिवस. मुसळधार पाऊस पडत होता. मोखाडा महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची सभा होती. पाऊस असल्या कारणाने सभा व्हायला उशीर झालेला होता. सर्व मान्यवर आल्यानंतर सभा सुरू झाली. सभेनंतर इतर सर्व नियोजित कार्यक्रम पार पडले. त्या दिवशी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विविध कामांची जबाबदारी दिली होती. प्रत्येकजण आपापली जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडून सभा व इतर सर्व कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी हातभार लावत होता. माझ्या खांद्यावर त्या दिवशी छायाचित्रणाची धुरा असल्याने सर्व पाहुणे व मान्यवरांचे आगमन झाल्यापासून ते त्यांनी निरोप घेईपर्यंतचे छायाचित्रण करणे क्रमप्राप्त होते. मुळातच छायाचित्रणाची आवड असल्या कारणाने ते काम मन लावून करीत होतो. पण दुसऱ्या दिवशी म्हणजेच ७ जुलै ला असलेल्या C-TET (Central Teachers Eligibility Test) परीक्षेचा विचार मनात येत होता. परीक्षा केंद्र मुंबई मिळाले होते. उशीर झाला असल्या कारणाने सर्व कार्यक्रम संपन्न होईपर्यंत सायंकाळचे ५:३० वाजत आले होते. सर्व मान्यवरांचा निरोप होईपर्यंत ६:३० वाजणार होते. परीक्षा दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता असल्याने ६ जुलै लाच रात्रीपर्यंत मुंबईत पोहोचणे गरजेचे होते. मोखाडयाहून निघणारी ३:३० वाजताची शेवटची कसारा बस केव्हाच निघून गेली होती. खाजगी वाहनाने जाणेही शक्य नव्हते. त्यामुळे उद्याची परीक्षा देता येणार नाही अशी मनाची समजूत मी करून घेतली होती. पण एका क्षणी अचानक मनात विचार आला. मा. रामशेठ ठाकूर साहेब पनवेल ला जाणार आहेतच. त्यांच्यासोबत असलेल्या एखाद्या गाडीत कसारा पर्यंत जाता आले तर रात्री भावाकडे खडवली येथे मुक्काम करून उद्याची परीक्षा देता येईल. त्यासाठी कुणाला विचारावे काही समजत नव्हते. तितक्यात सर्व मान्यवर चहापान करण्यासाठी गेले. कामातून थोडी उसंत मिळाली. मी लगेचच महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. यशवंत उलवेकर यांना भेटलो.

ते मुळचे पनवेल भागातील असल्याने त्यांची साहेबांच्या सहायकांसोबत ओळख असल्याचे माहीत होते. त्यांना माझी अडचण सांगून साहेबांसोबतच्या एखाद्या गाडीत मला जाता येईल का अशी विचारणा केली. त्यांनी साहेबांचे स्वीय सहाय्यक श्री. अमितदादा जाधव यांना भेटून माझी अडचण सांगितली

व त्यांना विनंती करून माझी त्यांच्यासोबत जाण्याची व्यवस्था केली. सरतेशेवटी सर्व कार्यक्रम संपल्यानंतर अमितदादांसोबत गाडीत बसलो आणि मला हायसे वाटले. मार्गस्थ झाल्यानंतर नेहमीच्या कसारा मार्गाने न जाता सर्व गाड्या जव्हार कडून जाऊ लागल्या. मी अमितदादांना विचारल्यानंतर कळाले की, साहेबांना या मार्गाने जायची इच्छा आहे. विक्रमगडहून महामार्ग क्र. ४८ ने जाऊन ठाण्यामार्गे पनवेलला जायचे नियोजन झाले होते. मी थोडासा चिंतित झालो. अमितदादांशी बोलणे चालूच होते. मी बोललो कि मला ठाण्यापर्यंत सोडा मी तिथून खडवली येथे जाईन. पण खूपच जास्त उशीर झाला होता. ठाण्यापर्यंत पोहोचायला रात्रीचे १२ वाजणार होते. मला ठाण्याहून खडवली येथे येण्यासाठी रात्री १ वाजताची शेवटची लोकल होती. अशा प्रकारे मी खडवली येथे रात्री २ वाजता पोहोचणार होतो. मुसळधार पाऊस होता आणि एवढ्या रात्री लोकलचा एकट्याने प्रवास धोकादायक आहे हे अमित दादांच्या लक्षात आले. मधे रस्त्याची विचारणा करण्यासाठी गाड्या थांबल्या. अमित दादांनी साहेबांना भेटून आपल्यासोबत एक प्राध्यापक आहेत आणि त्यांची उद्या परीक्षा आहे हे सांगून सर्व परिस्थितीची कल्पना साहेबांना दिली. उदार मनाच्या साहेबांनी ज्या मार्गाने जाऊन मला जास्तीत जास्त जवळ आणि लवकर पोहोचवता येईल त्या मार्गाने गाड्या घेण्याचा निर्णय घेतला. अशा प्रकारे गाड्यांचा ताफा वाडा-कुडूस-भिवंडी मार्गे कल्याणहून पनवेल जायचे ठरले. मी त्या मार्गाने खूप वर्षानंतर जात असल्याने मला त्या रस्त्याच्या अवस्थेबद्दल माहिती नव्हती. प्रवास सुरु झाल्यानंतर काही अंतरा नंतर कळाले की रस्ता अत्यंत खराब असून त्यात खूपच खड्डे आहेत. त्याच रस्त्याने मार्गक्रमण करीत गाड्या चालल्या होत्या. माझ्या मनाची मात्र घालमेल होत होती. आपल्यामुळे साहेबांना आणि सर्वांनाच खड्ड्यांमधून प्रवास करावा लागत आहे आणि हा सर्व त्रास आपण सोबत आहोत म्हणून सर्वांना होत आहे याची जाणीव येणाऱ्या प्रत्येक खड्डयागणिक मला होत होती. आपण आलोच नसतो तर बरं झालं असत, परीक्षा देणं टाळता आलं असत असं मनोमन वाटत होत. शेवटी कसेतरी या खड्ड्यांच्या रस्त्यांमधुन बाहेर येऊन भिवंडी -कल्याण रस्त्याच्या एका हॉटेलला सर्व गाड्या थांबल्या. रात्रीच्या जेवणालाही उशीर झाला होता.

सर्वजण प्रवासामुळे थकले होते. तिथे जेवण करायचं ठरलं. मी मात्र अत्यंत अपराधीपणाची भावना मनात असल्याने मोठ्या दु:खी मनाने गाडीतून उतरलो. साहेबांनी नेहमीप्रमाणे सर्वांना भेटून पोटभर जेवण करण्याविषयी सांगितले. त्याचक्षणी साहेबांची अन माझी नजरानजर झाली. मी साहेबांना नमस्कार केला. त्याक्षणी मी इतका व्यथित झालो होतो की साहेबांशी बोलून त्यांची क्षमा मागण्याची हिंमत देखील मला झाली नाही. साहेबांनी मात्र अत्यंत आस्थेने माझी विचारपूस केली. मला पोटभर जेवायला सांगितले व अमित दादांशी बोलून मला योग्य ठिकाणी सोडायला सांगितले. त्याक्षणी मी अवाक झालो. मी फक्त ऐकून होतो. पण साहेबांच मन किती मोठं आणि निर्मळ आहे; पण त्याची प्रत्यक्ष प्रचिती मला त्याक्षणी झाली. माझ्यामुळे एवढा खडतर आणि त्रासदायक प्रवास होऊनसुद्धा साहेब माझ्याशी अत्यंत प्रेमळपणे वागले हे बघून माझ्या डोळ्यांत अक्षरशः अश्रू तरळले. जेवण झाल्यानंतर कल्याण स्टेशन जवळच्या च्या एका चौकात सोडून अमित दादांनी माझा निरोप घेतला व परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

मी सुखरूप आणि लवकर भावाच्या घरी पोहोचलो. त्या दिवशी मला मदत करण्यासाठी डॉ. उलवेकर आणि अमितदादा हे तर होतेच, त्यांचा मी सदैव ऋणी राहीनच. पण प्रत्यक्ष की अप्रत्यक्षरीत्या माहीत नाही, रामशेठ ठाकूर साहेबांमुळेच मला दुसऱ्या दिवशी असणारी परीक्षा देता आली, त्यात चांगल्या गुणांनी उत्तीर्ण ही झालो. निकाल लागल्यानंतर मी अमितदादांना कळवून साहेबांचे आणि त्यांचे मन:पूर्वक आभार मानले. त्या दिवशीचा तो प्रवास अत्यंत त्रासदायक होता, पण साहेबांचे प्रेमळ शब्द अजूनही आठवतात. तो प्रवास आणि तो प्रसंग एक अविस्मरणीय आठवण म्हणून नेहमीच माझ्या सोबत राहील. ठाकूर साहेबांसारखी माणसं आभाळाएवढी मोठी कशी असतात, स्वत:ला त्रास होऊन सुद्धा

दुसऱ्यांच भल व्हावं, त्यांना मदत व्हावी म्हणून मोठ्या मनाने त्याग करत असतात, याचा प्रत्यक्ष अनुभव मला मिळाला. त्यानंतर साहेब अनेकदा महाविद्यालय विकास समितीच्या सभेसाठी तसेच इतर प्रसंगीही मोखाडा महाविद्यालयात आले, जेव्हा जेव्हा येतात, त्यांना नमस्कार केला कि स्मित हास्य करतात. कदाचित त्यांना त्या दिवसाची आठवणही नसेल. पण त्यांना पाहीले की तो संपूर्ण प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर साक्षात उभा राहतो. मन कृतज्ञतेने भरून येते. अमित दादा तर भेटल्यानंतर आवर्जून त्या दिवसाची आठवण काढतात.

साहेब दरवेळी असाच त्रासदायक प्रवास करून दुर्गम असलेल्या मोखाडा भागात येतात. येथे शिकत असणाऱ्या गोरगरीब आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य देतात. जास्तीत जास्त सुधारणा होऊन येथील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे त्यातून त्यांची प्रगती व्हावी यासाठी अविरत झटत असतात. एवढेच नाही तर इथे काम करणाऱ्या सर्व शिक्षकांना त्यांच्या मेहनतीसाठी आवर्जून शाबासकी देऊन कौतुक करत असतात. त्यांनीही एके काळी शिक्षक म्हणून काम केले असल्यामुळे शिक्षकांच्या अडचणींची जाण त्यांना नक्कीच आहे. साहेबांनी महाविद्यालयातील हंगामी स्वरुपात काम करणाऱ्या प्राध्यापकांच्या मानधनात दुपटीने वाढ करून त्या प्राध्यापकांच्या मेहनतीला मोल मिळेल आणि त्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त होईल याची तजवीज महाविद्यालय विकास समितीच्या माध्यमातून केली, त्यासाठी सर्व प्राध्यापक त्यांचे ऋणी असतील. वंदनीय कर्मवीर अण्णांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या माध्यमातून समाजासाठी पर्यायाने लोकांसाठी रामशेठ ठाकूर साहेब करत असलेले शैक्षणिक आणि सामाजिक सत्कार्य किती मोठे आहे याची जाणीव त्यांच्याशी जोडल्या गेलेल्या आणि ज्यांना ज्ञात आहे अशा सर्वांनाच आहे. आणि त्यातूनच त्यांना मिळालेली 'लोकनेते' ही उपाधी किती समर्पक आहे हे ही लक्षात येते.

अत्यंत गरीब कुटुंबात जन्माला येऊन, "कमवा आणि शिका" सारख्या कर्मवीरांनी पाया रचलेल्या विद्यार्थीहितपर योजनेत काम करता करता शिक्षण घेऊन, व्यवसाय, राजकारण, समाजकारण आणि शैक्षणिक क्षेत्रात योगदान देऊन आज साहेबांनी जी उंची गाठली आहे, ती सदैव प्रेरणा देणारी आहे. साहेब या वर्षी त्यांच्या वयाची ७५ म्हणजेच 'अमृतमहोत्सवी' वर्षे पूर्ण करीत आहेत, त्यासाठी साहेबांना त्यांच्या कार्यकर्तृत्वाएवढ्याच आभाळभर शुभेच्छा. त्यांचे शुभाशीर्वाद मोखाडा भागातील आम्हा सर्वांवर असेच राहोत, त्यांना दीर्घायुष्य लाभो हीच निसर्गदेवतेचरणी प्रार्थना. सरतेशेवटी एवढेच म्हणावेसे वाटते, की आम्ही कर्मवीर भाऊराव पाटलांनी स्थापन केलेल्या "रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील रयत सेवक" आहोत ही आमच्यासाठी अत्यंत कृतज्ञतेची आणि अभिमानाची गोष्ट आहे. जय महाराष्ट्र ! जय कर्मवीर !

शैक्षणिक क्षेत्रातील 'निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू' लोकनेते मा. रामशेठ ठाकूर



प्रा. डी. आर. भोये

सहाय्यक प्राध्यापक,
इतिहास विभाग

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर हे रायगड जिल्ह्यातील पनवेल परिसरातील एक ज्येष्ठ समाजसेवक, शिक्षणप्रेमी, उद्योजक आणि माजी खासदार म्हणून ओळखले जातात. त्यांनी राजकारणाबरोबरच शिक्षण, समाजसेवा, आरोग्य, क्रीडा आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिले आहे. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर हे रायगड जिल्ह्यातील पनवेल परिसरातील एक प्रभावी राजकीय नेते, शिक्षणतज्ज्ञ, उद्योजक आणि समाजसेवक म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात शिक्षण, सामाजिक विकास, पायाभूत सुविधा, क्रीडा आणि जनकल्याण या क्षेत्रांत मोठे योगदान दिले आहे. ते १९९८ ते २००४ या कालावधीत कोलाबा (सध्याचा रायगड) लोकसभा मतदारसंघाचे खासदार होते.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचा जन्म २ मे १९५१ रोजी महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील शिवाजीनगर येथे झाला. आईचे नांव श्रीमती भागुबाई व वडिलांचे नांव श्री चांगु ठाकूर ठाकूर होते. बालपणापासूनच त्यांच्यामध्ये नेतृत्वाची नैसर्गिक क्षमता आणि लोकांशी आत्मीयतेने संवाद साधण्याची वृत्ती दिसून येत होती. मित्रपरिवारात सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची सवय, कोणतीही जबाबदारी आनंदाने स्वीकारण्याची तयारी आणि समस्यांवर शांतपणे उपाय शोधण्याची प्रवृत्ती यांमुळे ते लहान वयातच सर्वांचे लाडके बनले. त्यांचे बालपण ग्रामीण संस्कृतीच्या सान्निध्यात गेले. गावातील सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांमध्ये ते उत्साहाने सहभागी होत असत. या अनुभवांमुळे समाजजीवनाची ओळख झाली आणि सामान्य माणसांच्या अडचणी, गरजा आणि अपेक्षा समजून घेण्याची दृष्टी त्यांच्यामध्ये विकसित झाली.

आयुष्याची सुरुवात शिक्षक म्हणून करणारा हा माणूस रयत शिक्षण संस्थेत (कमवा आणि शिका) या योजनेतून सन १९७२ साली पदवीधर झाले. पुढच्या वर्षी बी.एड. पूर्ण केले. पनवेलमध्ये प्रसिद्ध असलेल्या 'विठोबा खंडप्पा' या माध्यमिक शाळेत २०० रुपये महिना शिक्षक म्हणून सुरुवात केलेल्या रामशेठ यांनी १९७६ साली आपल्या जीवनाची सुरुवात केली.१

शिक्षणाबद्दलची ओढही त्यांच्यामध्ये लहानपणापासूनच होती. परिस्थिती कितीही आव्हानात्मक असली तरी ज्ञान हेच जीवनातील यशाचे खरे साधन आहे, ही जाणीव त्यांनी बालवयातच आत्मसात केली. अभ्यासाबरोबरच वाचन, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम आणि सामाजिक कार्य यांमध्येही

ते सक्रिय सहभाग घेत असत. त्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास झाला. कुटुंबातील संस्कार, समाजाशी असलेली नाळ आणि शिक्षणाबद्दलची तळमळ यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची मजबूत पायाभरणी केली. बालपणीचे हे संस्कार आणि अनुभवच पुढे त्यांच्या सार्वजनिक जीवनात, समाजसेवेत आणि शिक्षण क्षेत्रातील कार्यात प्रेरणादायी ठरले. सामान्य कुटुंबातून सुरू झालेला त्यांचा जीवनप्रवास पुढे लोकहितासाठी समर्पित नेतृत्वाच्या उंचीवर पोहोचला, त्याची बीजे त्यांच्या बालपणातच रोवली गेली होती.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण केवळ राजकारणातून झालेली नाही, तर उद्योग, समाजसेवा आणि व्यापक लोकसंपर्क या त्रिसूत्रीवर त्यांचे संपूर्ण सार्वजनिक जीवन उभे आहे. उद्योगक्षेत्रातील अनुभव, समाजाप्रती असलेली संवेदनशीलता आणि सर्वसामान्यांशी जपलेले आत्मीय संबंध यांमुळे त्यांनी जनतेच्या मनात विश्वासार्ह नेतृत्वाची प्रतिमा निर्माण केली. उद्योग क्षेत्रात कार्य करताना त्यांनी प्रामाणिकपणा, दूरदृष्टी, व्यवस्थापन कौशल्य आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा समतोल साधला. उद्योग हा केवळ आर्थिक प्रगतीचा मार्ग नसून समाजाच्या विकासाचे साधन आहे, या विचारातून त्यांनी रोजगारनिर्मिती, स्थानिक विकास आणि सामाजिक बांधिलकी यांना नेहमीच प्राधान्य दिले. त्यांच्या कार्यामुळे अनेकांना रोजगाराच्या आणि आर्थिक स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध झाल्या.

समाजसेवा हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग राहिला आहे. समाजातील गरजू, वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मदतीचा हात देणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहाय्य उपलब्ध करून देणे, आरोग्यविषयक उपक्रम, नैसर्गिक आपत्तीच्या काळात मदतकार्य, सामाजिक संस्थांना सहकार्य आणि लोकहिताचे विविध उपक्रम राबविणे, अशा अनेक माध्यमांतून त्यांनी समाजाप्रती आपली बांधिलकी जपली. समाजातील प्रत्येक घटकाचा विकास हा आपल्या प्रगतीचा आधार आहे, या विचारातून त्यांनी सेवा कार्याला सातत्य दिले.

लोकसंपर्क हे त्यांच्या नेतृत्वाचे सर्वात प्रभावी वैशिष्ट्य मानले जाते. सामान्य नागरिकांशी सहज संवाद साधणे, त्यांच्या समस्या संयमाने ऐकून घेणे आणि त्यावर सकारात्मक मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करणे, ही त्यांची कार्यशैली होती. कोणत्याही स्तरातील व्यक्तीशी समान आत्मीयतेने वागण्याच्या स्वभावामुळे त्यांनी समाजातील सर्व स्तरांतील लोकांचा विश्वास संपादन केला. त्यांच्या कार्यालयाचे आणि निवासस्थानाचे दरवाजे सर्वसामान्यांसाठी सदैव खुले असल्याची भावना जनतेमध्ये निर्माण झाली होती.

त्यांच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीमुळे विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि धार्मिक संस्थांशी त्यांचे दृढ संबंध निर्माण झाले. समाजातील विविध घटकांना एकत्र आणून विकासकामांना लोकसहभाग मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या अनेक उपक्रमांना जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, यामागे त्यांचा व्यापक लोकसंपर्क आणि विश्वासार्ह व्यक्तिमत्त्व हेच प्रमुख कारण होते.

उद्योगातील यश, समाजसेवेची निःस्वार्थ वृत्ती आणि जनतेशी जपलेले आत्मीय नाते या त्रिसूत्रीच्या बळावर लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी केवळ एक यशस्वी सार्वजनिक जीवन घडविले नाही, तर समाजात सेवाभावी, विकासाभिमुख आणि लोककेंद्री नेतृत्वाचा आदर्शही निर्माण केला.

मा. रामशेठ ठाकूर यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमधून सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. पुढे ते राज्य आणि राष्ट्रीय राजकारणात सक्रिय झाले. १९९८ व १९९९ मध्ये कोलाबा लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून त्यांची निवड झाली. संसद सदस्य म्हणून रायगडच्या रस्ते, बंदरे, रेल्वे, पाणीपुरवठा आणि ग्रामीण विकासाच्या प्रश्नांवर त्यांनी पाठपुरावा केला. तसेच त्यांनी जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट च्या विश्वस्त मंडळावरही काम केले.

राजकीय कार्याबरोबरच त्यांनी गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शैक्षणिक साहित्य वाटप, गरजू रुग्णांना

वैद्यकीय मदत, स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य, महिलांच्या सक्षमीकरणासाठी उपक्रम, आपत्तीग्रस्तांना मदत इ. समाजसेवेची कास धरून लोककल्याणकारी सेवा करत आहेत.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या प्रारंभीच्या शैक्षणिक कार्याची सुरुवात समाजसेवेच्या ध्येयातून झाली. राजकारणात सक्रिय होण्यापूर्वी आणि त्याचबरोबरही त्यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानून काम केले. रामशेठ ठाकूर यांनी शिक्षण हे केवळ शहरांपुरते मर्यादित न राहता ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे, या विचाराला प्राधान्य दिले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या "कमवा आणि शिका" या तत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर प्रभाव होता. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य म्हणून त्यांनी संस्थेच्या विस्तारासाठी काम करण्यास सुरुवात केली. विशेषतः नवी मुंबई, पनवेल आणि रायगड परिसरात रयत शिक्षण संस्थेच्या शाखा वाढविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. कामोठे येथे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज व सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल, उलवे सुरू करण्यामागे त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. २००९ मध्ये या शाळेच्या इमारतीची पायाभरणी त्यांच्या हस्ते झाली आणि त्याच वर्षी शाळा सुरू झाली. या संस्थेचा उद्देश गुणवत्तापूर्ण व मूल्याधिष्ठित शिक्षण सर्वसामान्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे हा होता. प्रारंभीच्या काळात त्यांनी आधुनिक वर्गखोल्या, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक शिक्षण, ग्रंथालये आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा उभारण्यावर भर दिला. शिक्षणासोबत व्यक्तिमत्त्व विकास आणि संस्कार यांनाही त्यांनी तितकेच महत्त्व दिले. रामशेठ ठाकूर यांनी शिक्षण क्षेत्रात लोकसहभाग वाढविण्यासाठी उद्योगपती, सामाजिक संस्था आणि दानशूर व्यक्तींना शिक्षणासाठी योगदान देण्याचे आवाहन केले. या माध्यमातून अनेक शैक्षणिक प्रकल्पांना आर्थिक पाठबळ मिळाले. त्यांच्या विषयीच्या संस्थात्मक माहितीनुसार, ते विद्यार्थ्यांमध्ये जाऊन त्यांना प्रामाणिकपणा, शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रप्रेम यांविषयी मार्गदर्शन करत असत. त्यामुळे ते केवळ प्रशासक नव्हे तर विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे शिक्षणप्रेमी म्हणूनही ओळखले गेले.

रयत शिक्षण संस्था आणि लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे संबंध दीर्घकाळापासून अत्यंत जवळचे आणि महत्त्वपूर्ण आहेत. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर हे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य म्हणून कार्यरत राहिले आहेत. त्यांनी संस्थेच्या शैक्षणिक विकासासाठी सातत्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक देणग्या दिल्या आहेत. विविध वृत्तांनुसार त्यांच्या दातृत्वातून संस्थेला शंभर कोटी रुपयांहून अधिक मदत मिळाल्याचा उल्लेख आहे. त्यांच्या योगदानाचा गौरव म्हणून रयत शिक्षण संस्थेने अनेक वेळा त्यांचा सत्कार केला आहे. २०२६ मध्ये त्यांच्या अमृत महोत्सवानिमित्त संस्थेने भव्य सत्कार समारंभ आयोजित केला होता. रायगड जिल्ह्याचे माजी खासदार, रयत शिक्षण संस्थेचे संचालक रामशेठ ठाकूर म्हणजे महाराष्ट्रातील एक दानशूर व्यक्तिमत्त्व. ज्या संस्थेत ते शिकले, त्या रयत शिक्षण संस्थेला त्यांनी ७ कोटी रुपये खर्च करून इमारत बांधून दिली. तसेच मोखाडा येथे मोडकळीस आलेल्या शाळेच्या बांधकामासाठी ५ कोटीचा निधी दिला. पालघर जिल्ह्यातील रयत शिक्षण संस्थेच्या एका महाविद्यालयाला "लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय" असे नाव देण्यात आले आहे. वयापासून ७२ व्या वर्षात पोहोचेपर्यंत एका ध्येयाने झपाटून रामशेठ गेल्या ३ वर्षांत ७३ वेळा पनवेल वरून मोखाड्याला गेले. संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांनीही रामशेठ ठाकूर यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि जनकल्याणकारी कार्याचे कौतुक करत, त्यांनी रयत शिक्षण संस्थेसाठी मोठे योगदान दिल्याचे नमूद केले आहे. रयत शिक्षण संस्था आणि लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे संबंध हे केवळ पदापुरते मर्यादित नसून, शिक्षण, समाजकारण आणि संस्थेच्या विकासासाठी दीर्घकाळ दिलेल्या योगदानावर आधारित आहेत. रयत शिक्षण संस्थेची स्थापना कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९१९ मध्ये ग्रामीण आणि वंचित समाजाला शिक्षण उपलब्ध

करून देण्यासाठी केली. आज ही संस्था महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या शैक्षणिक संस्थांपैकी एक असून शेकडो शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहे चालवते. रामशेठ ठाकूर हे रयत शिक्षण संस्थेचे दीर्घकाळ पदाधिकारी व व्यवस्थापनाशी संबंधित राहिले आहेत. त्यांनी संस्थेच्या विविध शैक्षणिक प्रकल्पांना आर्थिक आणि प्रशासकीय पाठबळ दिले. गरजेच्या वेळी संस्थेला निधी उपलब्ध करून देण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे संस्थेच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी सार्वजनिकरीत्या नमूद केले आहे. विविध वृत्तांनुसार त्यांनी रयत शिक्षण संस्थेला अनेक वेळा मोठ्या देणग्या दिल्या. संस्थेच्या विकासासाठी शाळा, महाविद्यालये, इमारती, वसतिगृहे आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी त्यांनी आर्थिक मदत केली. काही वृत्तांत त्यांच्या एकूण योगदानाचा आकडा शंभर कोटी रुपयांपेक्षा म्हणजेच जवळ जवळ १३५ कोटीहून अधिक असल्याचा उल्लेख आहे; रयत शिक्षण संस्थेला आर्थिक अडचण निर्माण झालेल्या काळात त्यांनी वेळोवेळी उदार आर्थिक मदत केली. रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी डॉ. अनिल पाटील यांनी सार्वजनिक कार्यक्रमात नमूद केले की, "जेव्हा जेव्हा रयत शिक्षण संस्थेला पैशांची गरज पडली, तेव्हा तेव्हा रामशेठ ठाकूर यांनी मदत केली." त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाला त्यांनी "मौलिक आणि महत्त्वपूर्ण" असे संबोधले. ३ मात्र या आकड्याची स्वतंत्र अधिकृत आर्थिक नोंद सार्वजनिकरीत्या उपलब्ध नाही.

थोडक्यात, रामशेठ ठाकूर यांचे रयत शिक्षण संस्थेशी नाते हे केवळ पदाधिकारी म्हणून नसून, दानशूर, शिक्षणप्रेमी आणि संस्थेच्या विकासात सक्रिय योगदान देणारे सहकारी असे मानले जाते. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य वाखाणण्याजोग आहे. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे सर्वात मोठे आणि चिरस्थायी योगदान म्हणजे शिक्षण क्षेत्रातील त्यांचे दूरदर्शी कार्य होय. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हेच सर्वात प्रभावी माध्यम आहे, या दृढ विश्वासातून त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोठी चळवळ उभी केली. त्यांच्या नेतृत्वाखाली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था ही रायगड आणि नवी मुंबई परिसरातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था म्हणून विकसित झाली.

या संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार, आधुनिक आणि मूल्याधिष्ठित शिक्षण उपलब्ध करून देण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात आला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ग्रामीण तसेच मध्यमवर्गीय कुटुंबांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळावी, हा संस्थेच्या कार्याचा प्रमुख उद्देश राहिला आहे. या संस्थेमार्फत कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये, अभियांत्रिकी व व्यवस्थापन शिक्षण, इंग्रजी व मराठी माध्यमाच्या शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, व्यावसायिक अभ्यासक्रम अशा २० हून अधिक शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. हजारो विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे.

सामाजिक बांधिलकी, सकारात्मक विचारसारणी, शैक्षणिक कार्य आणि रयत शिक्षण क्षेत्रातील दिलेलेले योगदान या सर्वांची दखल घेवून माननीय लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांना दि. १७ डिसेंबर, २०१८ रोजी 'इस्माईलसाहेब मुल्ला' जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

देणाऱ्याने देत जावे...



प्रा. के. के. पारधी

सहाय्यक प्राध्यापक,
प्राणिशास्त्र विभाग

माणूस म्हणून जन्माला आल्यानंतर माणूस म्हणवून घेण्यासाठी प्रथमदर्शी माणसासारख काहीतरी कार्य कराव लागत, तेव्हा तो माणूस माणूस म्हणण्यास पात्र ठरतो अस म्हणतात. हे ज्यांनी आपल्या कार्यातून करून दाखवले ते अर्थातच लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब. "देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे..." ही मराठीतील प्रसिद्ध ओळ केवळ एक काव्यपंक्ती नाही, तर ती समाजजीवनासाठी एक मूल्यव्यवस्था आहे. माणूस म्हणून जगताना आपण कसे जगावे हे या कवितेच्या ओळी सांगून जातात. या तत्त्वाचा अवलंब करून आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समाजाच्या उन्नतीसाठी आणि समाज हितासाठी अर्पण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात केलेले कार्य हे या ओळींचे जिवंत उदाहरण आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे की, शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. अगदी त्याच पद्धतीने शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, यावर ठाकूर साहेबांचा दृढ विश्वास होता. त्यामुळे त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था उभारून विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शिक्षणाची दारे खुली केली. अगदी मोखाड्यासारख्या अतीदुर्गम भागामध्ये त्यांनी आदिवासी मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी व त्यांना यशाचे शिखर पार करता यावे यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. शिक्षण प्रवाहाच्या बाहेर राहिलेल्या ग्रामीण भागात शाळा आणि महाविद्यालयांची स्थापना केली. गरीब विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती आणि वसतिगृह सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यांनी मुलींच्या शिक्षणाला विशेष प्रोत्साहन दिले. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन समाजात सक्षम स्थान मिळवू शकले. शिक्षणाद्वारे व्यक्ती आणि समाज दोन्ही सशक्त होतात, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले.

मा. रामशेठ ठाकूर साहेब यांनी आपल्या कार्याचा केंद्रबिंदू म्हणून "समाज" निवडला. ग्रामीण भागातील गरजू, वंचित आणि आदिवासी समाजासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबवले. आरोग्य शिबिरे, पाणीपुरवठा योजना, रस्ते बांधकाम तसेच गरिबांसाठी निवारा यांसारख्या मूलभूत गरजांवर त्यांनी भर दिला. आपल्या वाट्याला आलेल्या अडचणी माझ्या विद्यार्थ्यांच्या वाट्याला यायला नको हीच त्यांची प्रामाणिक भूमिका होती. या निसर्गापासून माणसाला घेण्यासारख्या खूप गोष्टी आहेत मात्र आपण फक्त घेणारे न होता समाजाला

काहीतरी देणारे होण अधिक महत्वाचे हा त्यांचा विचार नक्कीच मोलाचा आहे.

त्यांच्या सामाजिक कार्याची खास वैशिष्ट्ये म्हणजे निस्वार्थता आणि सातत्य. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचवला. आपत्तीच्या काळातही ते नेहमी पुढे राहून मदत करताना दिसतात. **"देणाऱ्याने देत जावे..."** या विचाराला त्यांनी कृतीत उतरवले.

राजकारणात प्रवेश केल्यानंतरही रामशेठ ठाकूर साहेब यांनी सत्तेला सेवा मानले. त्यांनी लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना विकासकामांवर विशेष भर दिला. त्यामध्ये त्यांनी पायाभूत सुविधांचा विकास जसे कि रस्ते, वीज, पाणी यांवर आपले लक्ष केंद्रित केले. रोजगारनिर्मितीचे प्रयत्न करून स्थानिक समस्यांचे तातडीने निराकरण केले. त्यांचे नेतृत्व हे जनतेशी थेट जोडलेले आणि पारदर्शक होते. त्यांनी राजकारणाला समाजसेवेचे माध्यम बनवले, ही त्यांची सर्वात मोठी देणगी आहे. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या जीवनात देण्याची वृत्ती ठळकपणे दिसते. त्यांनी कधीही परतफेडीची अपेक्षा न ठेवता समाजासाठी काम केले. त्यांच्या कार्यातून आपल्याला हेच शिकायला मिळते की समाजाला दिलेले योगदानच खरे समाधान देते. ज्ञान, वेळ आणि संसाधने यांचे वाटप केल्याने समाज समृद्ध होतो व्यक्तीपेक्षा समाज मोठा आहे आणि हा समाज मोठा करण्याचे काम रामशेठ ठाकूर साहेब यांनी आपल्या कार्यातून करून दाखवले. समाजासाठी लढताना त्यांच्या कृतीतून ते नेहमी हेच सांगत राहिले, " देणाऱ्याने देत जावे..."



महाविद्यालय नवीन इमारतीचे उद्घाटन समारंभ प्रसंगी मा. शरदचंद्रजी पवार साहेब व लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब.



महाविद्यालय नवीन इमारतीचे उद्घाटन समारंभ प्रसंगी मनोगत व्यक्त करताना मा. शरदचंद्रजी पवार साहेब.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या दूरदृष्टीचे प्रेरणादायी योगदान



प्रा. एस. के. डामसे

सहाय्यक प्राध्यापक,
वाणिज्य विभाग

मोखाडा महाविद्यालय म्हटलं की एक जिव्हाळा, आपुलकीच नातं, एक चांगले ऋणानुबंध मला सहज आठवतात. ज्याप्रमाणे काळ बदलत जातो त्याचप्रमाणे तेथील परिस्थिती, वातावरण सर्व गोष्टी यामध्ये सातत्याने बदल होत असतो. असेच एका बदलाबद्दल मी आपणास संबोधित करू इच्छितो. मी मोखाडा महाविद्यालयात सन २०१७ -१८ या वर्षी तृतीय वर्ष वाणिज्य शाखेतील शिक्षण पूर्ण झाले. मी सध्या याच महाविद्यालयात सहा. प्राध्यापक वाणिज्य विभागात काम करत असून, मला काम करत असताना आतापर्यंत आलेले अनुभव हे मी आपणा सोबत व्यक्त करत आहे. पूर्वीचे रयत शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा आणि आत्ताचे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा या कालावधीमध्ये मला जे बदल पहायला, अनुभवायला मिळाले. यामध्ये मला नेहमीच असे वाटायचे की ज्याप्रमाणे इतर शहरांमधील नाशिक, ठाणे, मुंबई, पालघर, पुणे या शहरांमध्ये ज्याप्रमाणे सुसज्ज, सुंदर महाविद्यालय आहेत. त्याचप्रमाणे आपले महाविद्यालय असावे असं मनामध्ये नेहमी वाटायचे. आज आमचे महाविद्यालय बघताना खूप आनंद होतो. रयत शिक्षण संस्था म्हटली की आपणास गोरगरीब दिन दुबळ्या दलित घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण पुरविण्याचे काम अविरतपणे करण्याचं कार्य या ठिकाणी संस्था करत असते.

लोकनेते मा. रामशेठ चांगू ठाकूर साहेब यांचा जीवनप्रवास अत्यंत संघर्षातून यशाकडे गेलेला एक प्रेरणादायी प्रवास आहे. २ मे १९५१ रोजी रायगड जिल्ह्यात जन्मलेल्या रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेत 'कमवा आणि शिका' या योजनेअंतर्गत शारीरिक कष्टाची कामे करत आपले शिक्षण पूर्ण केले. सुरुवातीला अवघ्या २०० रुपये पगारावर नोकरी आणि शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे काम केल्यानंतर, त्यांनी घरचे दागिने गहाण ठेवून १० हजार रुपयांच्या पहिल्या कंत्राटातून व्यवसायात पाऊल ठेवले. एका जुन्या डंपरपासून सुरू झालेल्या त्यांच्या संघर्षाचे रूपांतर पुढे 'ठाकूर इन्फ्रास्ट्रक्चर' या भव्य उद्योगसमूहात झाले, ज्याने नवी मुंबई व जेएनपीटी परिसराच्या विकासात मोलाचे योगदान दिले. राजकारणातही त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. रायगड लोकसभा मतदारसंघातून दोन वेळा खासदार म्हणून निवडून येताना त्यांनी दि. बा. पाटील आणि बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांसारख्या दिग्गज नेत्यांचा पराभव केला. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक

संस्थेच्या माध्यमातून शाळा-महाविद्यालयांचे जाळे विणले, तसेच ज्या रयत संस्थेने त्यांना घडवले तिला १३५ कोटींहून अधिक रुपयांची देणगी देऊन कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या या दातृत्वामुळे आणि संघर्षातून उभ्या राहिलेल्या व्यक्तिमत्वामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा गौरव 'आधुनिक काळातील एकलव्य' असा केला. आज श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून आरोग्य आणि जनकल्याणाची कामे करून ते खऱ्या अर्थाने लोकनेते म्हणून जनसेवेत कार्यरत आहेत.

मोखाडा हा आदिवासीबहुल आणि दुर्गम तालुका असल्याने अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी दूरच्या शहरांत जावे लागत असे. मोखाड्यातील आदिवासी दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना आपले शिक्षण पूर्ण करता यावे या उद्देशाने रयत शिक्षण संस्थेने १९८४ साली या महाविद्यालयाची स्थापना केली. पूर्वी मर्यादित वर्ग खोल्यांची संख्या, कमी प्रमाणात शिक्षक वर्ग व विविध समस्या महाविद्यालयात असत. त्यानंतर महाविद्यालय हळू हळू आपली प्रगती करत होते. पुढे त्याला अधिक गती देण्याचे काम हे प्रामुख्याने लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांनी केलेले मला जाणवते. त्यांच्या सहकार्यामुळे आधुनिक, सुसज्ज आणि प्रशस्त इमारत उभी राहिली. या माध्यमातून ग्रामीण व आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरातच उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. त्यांच्या प्रेरणेने महाविद्यालयात गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच आधुनिक सुविधा, संशोधनाला प्रोत्साहन, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रम, तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कार्यक्रम राबविण्यात आले. महाविद्यालयाच्या इतिहासात सर्वात जास्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संख्या सन २०२५-२६ मध्ये कार्यरत होती. हे सर्व बदल घडत असताना महाविद्यालयासाठी वेळोवेळी व जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा आर्थिक मदत अविरतपणे देण्याचे कार्य मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी केलेलं जाणवतं.

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण कसं उपलब्ध होईल यासाठी अविरत प्रयत्न करणारे ठाकूर साहेब त्यांनी विद्यार्थ्यांना विविध सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या विज्ञान विभागासाठी सुसज्ज लॅब, इंटरॅक्टिव पॅनेल, इंटरनेट सह स्मार्ट क्लासरूमची निर्मिती, कृत्रिम बुद्धिमत्ता अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र वर्गखोली, महाविद्यालयासाठी आवश्यक शिक्षक वर्ग, पायाभूत मूलभूत सुविधांची उपलब्धता विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी सुसज्ज अभ्यासिका, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र उभारणी, कॅफेटेरिया, विविध प्रकारच्या झाडांचे वृक्षारोपण साहेबांच्या हस्ते झाले. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमासाठी विविध साधने व कला मंच उभारण्याचे काम, विविध विषयांमध्ये संशोधन कार्य करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले.

मा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या या अभूतपूर्व सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक योगदानाचा आदर करण्यासाठी आणि त्यांच्या दातृत्वाची गौरवशाली पावती म्हणून रयत शिक्षण संस्थेने मोखाडा येथील महाविद्यालयाला 'लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा' असे नाव देण्याचा अधिकृत निर्णय घेतला. रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या हस्ते या नूतन इमारतीचे उद्घाटन व नामकरण करण्यात आले. हा भव्य नामकरण आणि उद्घाटन सोहळा शनिवार, दिनांक ८ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ९.३० वा. महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडला. सर्वप्रथम मा. शरद पवार साहेब आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या भव्य, सुसज्ज व अत्याधुनिक सोयीसुविधा युक्त नूतन इमारतीचा उद्घाटन व नामकरण सोहळा मोठ्या उत्साहपूर्वक पार पडला.

महाविद्यालयाने राष्ट्रीय मूल्यांकन आणि मानांकन परिषद (नॅक) कडून 'A+' ३.४३ श्रेणी प्राप्त केली असून, ही गुणवत्ता टिकविण्यामागे संस्थेच्या विकासासाठी केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न महत्त्वाचे ठरले आहेत. मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी केवळ इमारत उभारून आपले कार्य थांबविले नाही, तर महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी मार्गदर्शन, विकासकामांना पाठबळ आणि

आधुनिक अभ्यासक्रम उपलब्ध व्हावेत यासाठीही प्रयत्न केले. त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालय विकास समितीच्या माध्यमातून शैक्षणिक गुणवत्ता आणि पायाभूत सुविधांवर सातत्याने भर देण्यात आला. आज हे महाविद्यालय केवळ शिक्षण देणारी संस्था नसून सामाजिक परिवर्तनाचे केंद्र बनले आहे. ग्रामीण आणि आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा, रोजगार आणि समाजसेवेच्या दिशेने प्रेरित करण्याचे कार्य या संस्थेमार्फत होत आहे. महाविद्यालयाला सन २०२३-२४ या वर्षी मुंबई विद्यापीठाचा ग्रामीण भागातील "सर्वोत्कृष्ट महाविद्यालय" पुरस्कार मिळणे. ही त्यांच्या गुणवत्तेची पावती आहे. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे मोखाडा महाविद्यालयासाठीचे योगदान हे केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित नसून, ते शिक्षण, समाजसेवा आणि ग्रामीण विकासाच्या व्यापक दृष्टीकोनाचे प्रतीक आहे. त्यांच्या कार्यामुळे हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा मिळाली असून, त्यांच्या या शैक्षणिक योगदानाची प्रेरणा पुढील अनेक पिढ्यांना मिळत राहील. शून्यातून विश्व निर्माण करणे व समाज सेवेसाठी संपूर्ण आयुष वाहून घेण. केलेल्या कार्याचा कोणताही गर्व व अभिमान न बाळगता समाजाच्या विकासासाठी आपले कार्य सुरू ठेवणे. या त्यांच्या सामाजिक व दात्तृत्व व्यक्तिमत्वाचा परिचय होतो.

शून्यातून विश्व उभारुनी, कष्टाचा मार्ग दाखवला, रामशेठ ठाकूर साहेबांनी, उद्योग क्षेत्रात ठसा उमटवला; मिळवून वैभव संपत्तीचे, जनसेवेचा वसा नाही सोडला, दानशूर अशा या लोकनेत्याला, अवघ्या महाराष्ट्राने वंदिला!



महाविद्यालय नॅक मानांकन समिती भेटी दरम्यान स्वागत करताना महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब.



महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपण करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब

शिक्षण क्षेत्राला नवसंजीवनी देणारे आधुनिक काळातील 'एकलव्य': लोकनेते रामशेठ ठाकूर

ज्ञानदीप तेवत राहो, हीच तुमची वाट,
विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिली नवजीवनाची साथ.
सेवा, संस्कार, शिक्षणाचा उंचावला मान,
लोकनेते मा. रामशेठ ठाकूर, तुम्हाला शतशः प्रणाम.

रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा हे आदिवासी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील एक आदर्श विकास मॉडेल म्हणून विकसित झाले आहे. सन १९८४ मधील मर्यादित सुविधांच्या महाविद्यालयापासून आजच्या नॅक A+ मानांकन प्राप्त, आधुनिक पायाभूत सुविधा, कौशल्याधारित शिक्षण आणि संशोधनाभिमुख संस्थेपर्यंतचा प्रवास हा उल्लेखनीय आहे. या परिवर्तनामध्ये लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आदिवासी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण, आधुनिक सुविधा आणि सर्वांगीण विकासाच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या असून हे महाविद्यालय आदिवासी शिक्षणाच्या क्षेत्रातील एक प्रेरणादायी केंद्र म्हणून उदयास आले आहे.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असून ग्रामीण व आदिवासी भागाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. अशा दुर्गम भागात उच्च शिक्षणाची गुणवत्ता टिकवून ठेवणे आणि काळानुरूप त्यामध्ये सुधारणा घडवून आणणे हे मोठे आव्हान असते. पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुका हा आदिवासीबहुल व भौगोलिकदृष्ट्या दुर्गम भाग म्हणून ओळखला जातो. या भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध



प्रा. डॉ. एम. आर. खंबाईत

सहाय्यक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग

करून देण्याचे कार्य लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने सातत्याने केले आहे. महाविद्यालयाच्या विकासाच्या प्रवासात लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, शैक्षणिक बांधिलकी आणि विकासाभिमुख दृष्टीकोन यामुळे या संस्थेला नवे बळ मिळाले. त्यामुळेच त्यांना आधुनिक काळातील "एकलव्य" असे संबोधणे सार्थ ठरते.

मा. रामशेठ ठाकूर यांच्या दानशूरतेचा केंद्रबिंदू शिक्षण हा राहिला आहे. त्यांनी सातारा येथील रयत शिक्षण संस्थेसाठी ₹७ कोटी खर्चून आधुनिक शैक्षणिक इमारत उभारली. त्याचप्रमाणे पालघर जिल्ह्यातील मोखाडा येथे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी ₹५ कोटी खर्चून आधुनिक शैक्षणिक संकुल उभारले. या संकुलामध्ये सुमारे ९८% विद्यार्थी आदिवासी समाजातील असून

२८ प्राध्यापक कार्यरत आहेत. संपूर्ण प्रकल्पाच्या उभारणीदरम्यान त्यांनी तीन वर्षांत ७३ वेळा पनवेल–मोखाडा प्रवास करून प्रत्यक्ष देखरेख केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भाषणानुसार त्यांनी रयत शिक्षण संस्थेला ₹१३५ कोटींपेक्षा अधिक आर्थिक योगदान दिले असून हे शिक्षण क्षेत्रातील अत्यंत उल्लेखनीय दान मानले जाते.

प्रमुख आकडेवारी

बाब / तपशील	आकडेवारी
शिक्षक म्हणून प्रारंभिक वेतन	₹२०० प्रतिमाह
रयत शिक्षण संस्थेसाठी इमारत	₹ ७ कोटी
मोखाडा आदिवासी शैक्षणिक संकुल	₹ ५ कोटी
रयत शिक्षण संस्थेला एकूण योगदान	₹१३५ कोटींपेक्षा अधिक
संस्थांमधील विद्यार्थी	२०,००० पेक्षा अधिक
मोखाडा संकुलातील आदिवासी विद्यार्थी	९८%
मोखाडा संकुलातील प्राध्यापक	२८
पनवेल–मोखाडा पाहणी दौरे	७३
शिक्षक कारकीर्द प्रारंभ	१९७३

महाविद्यालयाच्या उपलब्ध दस्तऐवजांवरून असे दिसून येते की, नॅक मूल्यांकनाच्या प्रारंभीच्या काळात महाविद्यालय मूलभूत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणारी संस्था होती. मात्र, पायाभूत सुविधा, संशोधन, तंत्रज्ञानाधारित अध्यापन, गुणवत्ता हमी व्यवस्था आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रम यांमध्ये मर्यादा होत्या. संस्थेने पहिल्या नॅक मूल्यांकनात 'B' श्रेणी प्राप्त केली होती. ही श्रेणी महाविद्यालयाच्या कार्यक्षमतेची साक्ष देत असली तरी राष्ट्रीय गुणवत्तेच्या निकषांनुसार आणखी प्रगतीची आवश्यकता स्पष्ट करत होती.

१९८४ ते २०२५ विकासाचा कालक्रम

कालावधी	प्रमुख विकास
१९८४	महाविद्यालयाची स्थापना
१९८५–१९९५	कला व वाणिज्य शिक्षणाचा विस्तार
१९९६–२००५	विज्ञान शाखा व प्रयोगशाळांचा विकास
२००६–२०१५	ग्रंथालय, संगणक केंद्र, विद्यार्थी सुविधा वाढ
२०१६–२०२०	लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे आर्थिक योगदान, नवीन इमारतींचा विकास
२०२१–२०२५	नॅक A+ मानांकन, NSQF अभ्यासक्रम, ICT आधारित शिक्षण, संशोधन व कौशल्य विकास

या पार्श्वभूमीवर लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष पुढाकार घेतला. त्यांनी केवळ आर्थिक सहाय्यच केले नाही, तर गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संकल्पना संस्थेमध्ये रुजविण्यासाठी व्यवस्थापनाला दिशा दिली. आधुनिक शैक्षणिक इमारती, सुसज्ज प्रयोगशाळा, डिजिटल ग्रंथालय, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) आधारित अध्यापन व्यवस्था, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा आणि गुणवत्ता वृद्धीच्या उपक्रमांना त्यांनी सातत्याने प्रोत्साहन दिले.

पूर्वीचे महाविद्यालय व सध्याची तुलनात्मक स्थिती

घटक	पूर्वी	सध्या
महाविद्यालयाचे नाव	रयत शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय	लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
पायाभूत सुविधा	मर्यादित	आधुनिक व सुसज्ज
ग्रंथालय	पारंपरिक	डिजिटल व समृद्ध
प्रयोगशाळा	मर्यादित	आधुनिक उपकरणांनी सुसज्ज
ICT सुविधा	अत्यल्प	स्मार्ट वर्गखोल्या व संगणक केंद्र
अभ्यासक्रम	पारंपरिक	पदवी, पदव्युत्तर, NSQF, प्रमाणपत्र अभ्यासक्रम
गुणवत्ता	प्रारंभिक अवस्था	नॅक A+ (CGPA ३.४३)
विद्यार्थी विकास	मर्यादित	कौशल्य विकास, NSS, प्लेसमेंट, करिअर मार्गदर्शन

महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) अधिक प्रभावीपणे कार्यरत झाला. अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत Outcome Based Education, विद्यार्थी अभिप्राय प्रणाली, Academic Audit, Green Audit, Energy Audit, ICT आधारित अध्यापन, डिजिटल ग्रंथालय आणि आधुनिक प्रयोगशाळा यांसारख्या गुणवत्ता प्रक्रियांचा अवलंब करण्यात आला. शिक्षकांना संशोधनासाठी प्रोत्साहन देण्यात आले तसेच विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम, कौशल्याधारित कार्यक्रम, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, करिअर मार्गदर्शन, प्लेसमेंट उपक्रम आणि विद्यार्थी विकास कार्यक्रम सुरू करण्यात आले. या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला नवी दिशा मिळाली.

विशेषतः आदिवासी विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची उपलब्धता वाढविणे हे या परिवर्तनाचे सर्वात मोठे यश मानावे लागेल. आधुनिक प्रयोगशाळा, संगणक सुविधा, ई-लर्निंग, डिजिटल ग्रंथालय आणि संशोधनाभिमुख वातावरणामुळे ग्रामीण व आदिवासी विद्यार्थ्यांना महानगरांतील संस्थांप्रमाणे शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या. मुलींच्या शिक्षणात वाढ, रोजगारक्षम कौशल्यांचा विकास आणि उच्च शिक्षणाबद्दलची जागरूकता यामध्येही लक्षणीय वाढ झाल्याचे संस्थेच्या दस्तऐवजांवरून स्पष्ट होते.

गुणवत्तावृद्धीचे निर्देशक

निर्देशक	२०१४	२०२३
नॅक श्रेणी	B	A+
CGPA	२.२१	३.४३
गुणवत्ता सुधारणा	—	+१.२२ CGPA
IQAC उपक्रम	प्रारंभिक	अधिक प्रभावी
ICT सुविधा	मर्यादित	व्यापक
संशोधन उपक्रम	मर्यादित	वाढलेले
कौशल्य अभ्यासक्रम	मर्यादित	NSQF व प्रमाणपत्र अभ्यासक्रम
विद्यार्थी सहाय्य सेवा	मूलभूत	बहुआयामी

या सर्व प्रयत्नांचे फलित म्हणून महाविद्यालयाने नॅक च्या पुनर्मूल्यांकनात उल्लेखनीय प्रगती साधली. पूर्वीच्या 'B' श्रेणीतून संस्थेने 'A+' हा उच्च दर्जा

प्राप्त केला. ही केवळ श्रेणीतील वाढ नसून संस्थेच्या गुणवत्ता संस्कृतीचा, नियोजनबद्ध व्यवस्थापनाचा आणि दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा परिणाम आहे. संस्थेच्या सर्व घटकांनी सामूहिक प्रयत्न केले असले तरी लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांची प्रेरणा, मार्गदर्शन आणि विकासाभिमुख दृष्टी ही या परिवर्तनामागील प्रमुख शक्ती ठरली.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी शिक्षणाकडे समाजसेवेचे माध्यम म्हणून पाहिले. त्यांनी आदिवासी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने कार्य केले. त्यांच्या योगदानामुळे मोखाडा महाविद्यालयाने केवळ पायाभूत सुविधांमध्येच नव्हे, तर शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, प्रशासन, विद्यार्थी विकास आणि सामाजिक उत्तरदायित्व या सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती साधली. त्यामुळे ते आधुनिक काळातील "एकलव्य" म्हणून ओळखले जातात, ही उपाधी त्यांच्या कार्याला न्याय देणारी आहे.

मोखाडा महाविद्यालयाचा २०१४ ते २०२३ दरम्यानचा प्रवास हा नॅक 'B' ते 'A+' या श्रेणीपर्यंतचा केवळ गुणवत्तेतील बदल नसून संस्थात्मक पुनर्जागरणाचा इतिहास आहे. या परिवर्तनामध्ये लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे आर्थिक सहकार्य, विकासाभिमुख दृष्टीकोन, शैक्षणिक बांधिलकी आणि आदिवासी समाजाविषयीची संवेदनशीलता यांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे त्यांना "मोखाडा महाविद्यालयाला नवसंजीवनी देणारे आधुनिक काळातील 'एकलव्य'" असे संबोधणे सार्थ ठरते. त्यांच्या योगदानामुळे महाविद्यालयाने आधुनिक पायाभूत सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थी-केंद्रित विकास या माध्यमातून आदिवासी समाजाच्या शैक्षणिक सक्षमीकरणात मोलाची भूमिका बजावली आहे. अशा प्रकारे मोखाडा महाविद्यालयाचा विकास हा केवळ एका शैक्षणिक संस्थेचा इतिहास नसून आदिवासी समाजाच्या शैक्षणिक उन्नतीचा प्रेरणादायी प्रवास आहे. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वामुळे या संस्थेला नवसंजीवनी मिळाली आणि गुणवत्ता, समर्पण व सामाजिक बांधिलकी यांचा आदर्श निर्माण झाला. भविष्यातही हा आदर्श इतर ग्रामीण व आदिवासी उच्च शिक्षण संस्थांसाठी दिशादर्शक ठरेल.

कर्तृत्वाची उंच शिखरे, सेवाभावाची ओळख, शिक्षणातून घडविली समाजाच्या प्रगतीची वाटचाल. ज्ञानयज्ञाचे यज्ञकर्ता, प्रेरणेचा तुम्ही दीपस्तंभ, लोकनेते मा. रामशेठ ठाकूर, स्वीकारा आमचा मानाचा नम्र प्रणाम.




प्राचार्य डॉ. एल. डी. भोर यांच्या सेवापूर्ती समारंभानिमित्त वृक्षारोपण करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



मुंबई विद्यापीठाचा 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' स्विकारताना संस्थेचे सचिव मा. विकास देशमुख, प्र. प्राचार्य ए. एन. चांदोरे व प्राध्यापक.

आदिवासी लोकांच्या जीवनातील ध्रुवतारा- मा. खा. रामशेठ ठाकूर



प्रा. डॉ. व्ही. एम. डोंगरदिवे

सहाय्यक प्राध्यापक,
इतिहास विभाग

रयत शिक्षण संस्थेचे शैक्षणिक कार्य अतुलनीय असे आहे. भारतीय समाज मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागामध्ये वसलेला आहे. येथील संस्कृति व समाज रचना पूर्णता निसर्गाच्या लहरीपनावर अवलंबून आहे त्याप्रमाणे सामाजिक विकासाची गरज व्यक्तीच्या विवेकबुद्धी नुसार मार्गक्रमण करीत असते. अशात कर्मवीर भाउराव पाटील यांच्या वैचारिक दिशेमध्ये सामाजिक प्रगती साध्य करून समाजमन विकसित करून समाजाचा विकास कसा करता येईल? या भूमिकेतून शैक्षणिक जीवनाच्या प्रगतीला महत्व दिले तर मनुष्य त्या परिस्थितीला बदलण्यास क्रियाशील होउ शकतो, हे गृहीत धरून कर्मवीर अण्णा यांनी १९१९ मध्ये रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या विकासामध्ये बऱ्याच व्यक्तीमत्वांचा हातभार लागलेला आहे. शहरी तसेच ग्रामीण भागामध्ये संस्थेच्या बऱ्याच शाखा अस्तित्वात आल्यात. मोठ्या कष्टाने कर्मवीर यांनी ह्या संस्थेच्या माध्यमातून दुर्गम, आदिवासी भागांमध्ये सुद्धा आपल्या शैक्षणिक कार्याचे भरीव कार्य केले आहे.

महाराष्ट्रातील पालघर जिल्हयामध्ये रयत शिक्षण संस्थेचा विस्तार मोठ्या नेटाने करण्यात आला. आदिवासी बहुल दुर्गम भागामध्ये गरीब, आदिवासी समजाचा शैक्षणिक विकास करून त्यांच्या जीवनास नवा आयाम, नावे बळ देण्याचे भरीव कार्य सुरू झाले. अशात काळानुसार विविध शैक्षणिक संस्था सर्वत्र निर्माण होउ लागल्यात. मात्र आदिवासी भागामध्ये कोणत्याही शिक्षण संस्थेने कार्य करण्यास समाजाच्या व आदिवासी बांधवांच्या जीवनात आमूलाग्र बदल करण्यास कुणीही फारसे लक्ष दिले नाही. मात्र या संस्थेमध्ये शिकून सवरून जीवनात मोठे कार्य करण्याची उपलब्धी मोजक्याच लोकांना प्राप्त झालेली दिसून येते ज्यामध्ये रामशेठ ठाकूर साहेबांचे नाव आपणास अग्रक्रमाने घ्यावे लागते. आदिवासी भागाच्या प्रगतीसाठी आज कोणतीही संस्था, कोणतीही संघटना, कोणीही व्यक्ति समोर येऊन आपले योगदान देण्यास तत्पर दिसत नाही अशा दुर्मिळ कार्यास आपले जीवित कार्य वेचण्याची भूमिका आदरणीय रामशेठ ठाकूर साहेबांना प्राप्त झाली आहे, एक प्रकारे हे त्यांना लाभलेले 'कर्माविरांच्या विचारांचे वरदान' म्हणता येईल.

आज मोठ्या अभिमानाने रयत शिक्षण संस्थेचे समृद्ध शैक्षणिक संकुल पालघर जिल्ह्यातील मोखाडा ह्या आदिवासी तालुक्यामध्ये मोठ्या दिमाखात कार्य

करीत असल्याचे दिसून येते. यामध्ये आदरणीय रामशेठ ठाकूर साहेबांचे कार्य व त्यांचे संस्थेप्रती असणारे भरीव योगदान हेच जबाबदार असल्याचे सांगता येईल. आज महाविद्यालय सर्व सुविधांनी परिपूर्ण असल्याचे दिसून येते याच त्यांच्या विकासामध्ये शैक्षणिक गुणवत्ता संपादन करण्याचा संधी उपलब्ध करून दिली आहे. यामुळे सध्याच्या विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक प्रयत्न सातत्याने चालू असतो. त्याचाच एक प्रत्यक्ष स्वरूपात साकारलेला प्रत्यय म्हणजे मोखाडा महाविद्यालयास केंद्रीय मूल्यमापन समितीने दिलेली मोठ्या यशाची पावती होय. यातून ३.४३ एवढे उत्तुंग गुणानुक्रमांकाचे महाविद्यालयास यश संपादन करणे शक्य झाले. याबरोबरच महाविद्यालयाच्या एकूण सोई-सुविधा, प्रवेश प्रक्रिया, परीक्षा पद्धती, पदवी व पदव्युत्तर वर्ग कला शाखेबरोबरच विज्ञान व वाणिज्य शाखा सर्व सोयी-सुविधांनी परिपूर्ण असल्याचे दिसून येते. मुंबई विद्यापीठ मुंबई यांच्या विस्तारानुसार आठशे ते नऊशे महाविद्यालयांचा विस्तार आज मुंबई विद्यापीठाचा झाला आहे. यासर्वमध्ये ग्रामीण भागातील 'उत्कृष्ट महाविद्यालय २०२३-२४' हा पुरस्कार संपादन करण्यात आला. यासर्वांचे श्रेय खऱ्या अर्थाने आदरणीय रामशेठ ठाकूर साहेबांना जाते, यात कोणतीही शंका नाही.

आदरणीय रामशेठ ठाकूर साहेब यांना जनसामान्यांचा मोठा पाठिंबा आहे. जनतेच्या प्रश्नांना समजून घेऊन समाजाच्या प्रगतीला कसा हातभार लावणे शक्य होईल याचे रामशेठ ठाकूर साहेबांना अचूक माहीत आहे. कर्मवीर अण्णांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या रामशेठ ठाकूर साहेबांना या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे एक प्रकारे वरदान लाभले आहे असेच आपणास म्हणावे लागते. कर्मवीर अण्णाच्या आशीर्वादाने व विचारांनी प्रेरित होऊन आज रामशेठ ठाकूर साहेबांनी हया आदिवासी बांधवांच्या जीवनात नविन प्रकाशाची वाट प्रशस्त करून दिली. आज मोखाडा तालुक्यातील तरुण विद्यार्थी एकमात्र रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक प्रवाहामध्ये समाविष्ट झाल्याचे सांगता येईल. त्यांचे खरे कारण म्हणजे रामशेठ ठाकूर साहेबांनी महाविद्यालयास जे परिपूर्णतेचे स्वरूप प्रदान करून दिले त्यामध्ये ह्या प्रवाहाची गती सामावलेली दिसून येते. अशाप्रकारे दूरदृष्टिकोनातून ह्या सामाजिक कार्याचा वसा खऱ्या अर्थाने त्यांना कर्मवीर अण्णा यांच्या विचारासणीमधून प्राप्त झाला आहे याचा प्रत्यय आपणासयेतो कमालीचा निर्गविपाना -

वेगवेगळ्या ठिकाणी रयत शिक्षण संस्थेचे कार्यक्रम तसेच लहान-मोठे उपक्रम चालू असतात. यापैकी काही कार्यक्रमांना रामशेठ ठाकूर साहेब आपली उपस्थिती दर्शवितात त्यावेळी त्या कार्यक्रमात त्यांच्या कार्याचा परिचय आपणास घडतो. शहरी भाग असो किंवा ग्रामीण भाग असो, तसेच मोखडा शहरपरिसर असो, वा मुंबई तसेच मुंबईचा उपनगरीय भाग असो, तेथील व्यासपीठावर जेंव्हा रामशेठ ठाकूर साहेब येतात, तेंव्हा त्यांचे खरे दर्शन आपणास घडते. अत्यंत शांत, संयमी, समजदार, आपलेपणा जोपासणारे असे हे व्यक्तिमत्व ईश्वराने केवळ जनसामान्यांच्या मदतीस, सेवेस सतत धावून जातात. म्हणजे ईश्वराचे साक्षात दर्शन झाल्यासारखे होते. एवढे सर्व दातृत्वभाव एकाच मनुष्याकडे का असावेत? व कसे असावे? असा कधी कधी सामान्य माणसास प्रश्न पडतो. मानवी उदात्त विचारांनी जीवनात ओतपोत भरलेल्या सामाजिक प्रेमापोटी हा प्रपंच कसा बरे रामशेठ ठाकूर साहेब यांना शक्य आहे? हा सुद्धा पाठोपाठ दूसरा प्रश्न पडतो. एवढे सर्व प्रेम, दया, करुणा, सहनशिलवृत्ती, समानतावादी, सामाजिक न्याय अशा बहुमूल्य वैचारिक मोत्यांची माळ सतत पूजणारे रामशेठ मात्र जनतेमध्ये केवळ आणि केवळ सामान्य वर्गासाठीच अधिक शोभून दिसतात. कुठल्याही व्यासपीठावरून बोलतांना त्यांच्या बोलण्यामध्ये, विचारांमध्ये कोणताही गर्व, किंवा दर्प, अथवा कोणतीही दरपोक्ती चा कुठलाही लवलेश आपणास दिसून येत नाही. रामशेठ ठाकूर साहेब म्हणजे कमालीची शांतता, निर्गवि वृत्तीचा सागर, अमाप दातरुतवभाव जोपासणारे व्यक्तिमत्व होय. आपले विचार जाहीर मांडतांना कोणतीही आडमुठी भूमिका ते घेत नाहीत. कोणताही आग्रही भूमिका मांडत नाहीत, सर्व समावेशक विचार असतील त्यांनाच ते पसंत करतात.

महाविद्यालयांमध्ये आवश्यक सोयी-सुविधापुरीपूर्ण असाव्यात यावर त्यांचा फार कटाक्ष आहे. त्यांचे कारण म्हणजे शहरी महाविद्यालयांच्या तुलनेत माझ्या महाविद्यालयास कोणतीही समसी उदभवू नये हेच त्यांना अपेक्षित असते. सहाजिकच मजा ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थी किंवा आदिवासी समाज बांधव जीवनाच्या प्रवाहात तेवढ्याच अधिक क्षमतेने जगण्यास साक्षण असावा हा त्यांचा त्यामागील दुरदृष्टिकोण होय असेच आपणास सांगता येईल. रामशेठ ठाकूर साहेबांना या सर्व गुण वैशिष्ट्य मुळे आज लोकांनी त्यांना विविध प्रेमळ नावांची ओळख दिली आहे ज्यामध्ये काही भागातील जनतेने त्यांना 'राम' म्हटले आहे काही जिल्ह्यांमध्ये त्यांना 'शेठ' म्हटले जाते, तसेच काही भागामध्ये प्रेमाने त्यांना 'लोकनेते' ह्या उपाधीनेही ओळखल्या जाते. साधी राहणीमान, बहुतांश वेळी त्यांच्या ठिकाणी पांढरा पोषाख असतो. त्यामध्ये मात्र कमालीचा साधेपणा दडलेला दिसून येतो. चाळण्यांमध्ये थोडी लचक असली तरी त्यांच्या जीवन जगण्याच्या दिशेमध्ये केवळ आणि केवळ जन सामान्यांचे कल्याण साधने, हीच तळमळ त्यांच्या चालण्याच्या शांत संयमी लयीमध्ये असल्याचे जाणवते. त्यांच्या सामाजिक कार्यातून झालेले योगदान हे अमाप आहे, की ज्याची मोजदाद करता येणार नाही. आज समाजाला अशा उदात्त विचार असणाऱ्य जन नायकाची, गरज आहे समाजाला कष्टाटन कसे बाहेर पडता येईल यांचा विचार फक्त रामशेठ ठाकूर साहेबांकडे असतो हा विचार अंजघडीला आटीदुर्लभ झाला आहे असे मोठ्या आश्चर्याने म्हणावे लागते.

अशाप्रकारे, जीवन प्रवाहात केवळ वैयक्तिक प्रपंचास महत्व न देता सामजिक देणे गरजेचे हे किती आवश्यक आहे? हे रामशेठ ठाकूर साहेबांच्या जीवनातून दिसून येते. आदिवासींची सेवा हीच खरी ईश्वर सेवा होय या उक्तीप्रमाणे रामशेठ ठाकूर साहेबांनी ह्या दलित, वंचित, दुर्लक्षित शोषित, आदिवासी बांधवांचे जीवन साधण्याचे पुण्यकर्म केले आहे. आजच्या परिस्थितीचा वेध घेतल्यास असे दिसून येते की, दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्य जीवनात नवा प्रकाश पसराविण्याचे भरीव कार्य रामशेठ ठाकूर साहेबांनी केले आहे. अंधकार युगावर मात करण्याचे नव बळ ह्या समाज बांधवांना मिळाले आहे निसर्गाच्या सानिध्यात केवळ आहे त्या परिस्थितीशी मार्गक्रमण करून जगणाऱ्या समाजास नव संजीवन देणारे शैक्षणिक बळ रामशेठ ठाकूर साहेबांनी दिले आहे. या योगदानाची तुलना कशातही करता येणार नाही. या दलित, आदिवासी बांधवांच्या जीवनाला कलाटणी देणारे कार्य करण्यात आले आहे पार्यायाने एक लुकलुकता तारा प्रत्यक्षात हा परिसरात व आदिवासी समाजाच्या जीवनात अवतीर्ण झाल्याचे सांगता येईल, असेच अंतिमता म्हणता येईल. आदरणीय रामशेठ ठाकूर साहेबांचे हे कार्य सातत्याने त्यांच्या पवित्र हातून घडत जावे. कर्मवीर अण्णांच्या विचाराने प्रेरित झालेल्या आ. रामशेठ ठाकूर साहेबांचे हातून हे समाजाभिमुख कार्य असेच निरंतर घडत जावो, ह्या शुभेच्छा सह...

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : सेवाभावी नेतृत्व



प्रा. पी. एल. नाडेकर

सहाय्यक प्राध्यापक,
मानसशास्त्र विभाग

कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या विकासासाठी आर्थिक पाठबळ अत्यंत आवश्यक असते. मा. रामशेठ ठाकूर यांनी ही गरज ओळखून महाविद्यालयाच्या विकासासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेतला. विविध विकासकामांसाठी निधी उभारणे, शासकीय व इतर संस्थांकडून सहकार्य मिळवून देणे, या आर्थिक सहाय्यामुळे महाविद्यालयातील पायाभूत सुविधा मजबूत होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांसाठी अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्या आणि शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास हातभार लागला.

विद्यार्थीकेंद्रित दृष्टीकोन: मा. रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा केंद्रबिंदू विद्यार्थी हा होता. ग्रामीण, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. शिक्षणाबरोबरच व्यक्तिमत्त्व विकास, रोजगाराभिमुख कौशल्ये, सामाजिक मूल्ये आणि राष्ट्रीय भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

समाजसेवा आणि शिक्षणाचा संगम: लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी विकासकामे केली; परंतु शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान समाजसेवेच्या व्यापक दृष्टिकोनातून प्रेरित होते. शिक्षणामुळेच समाजाचा विकास होतो, गरिबी कमी होते आणि नव्या संधी निर्माण होतात, या विश्वासातून त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या कार्याला सातत्याने सहकार्य केले. त्यांच्या कार्यातून समाजातील सक्षम घटकांनी शिक्षणासाठी पुढाकार घेण्याची प्रेरणा मिळते. त्यांनी दाखवून दिले की, लोकप्रतिनिधीची खरी ओळख केवळ राजकारणात नसून समाजाच्या भविष्याची घडण घडविणाऱ्या शिक्षण क्षेत्रातही असते.

हंगामी प्राध्यापकांच्या पगाराबाबत संवेदनशील लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचा दृष्टिकोन: रयत शिक्षण संस्थेच्या कार्यपद्धतीत शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा केंद्रबिंदू मानला जातो. संस्थेच्या विविध महाविद्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या हंगामी प्राध्यापकांनी अनेक वर्षे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अध्यापनाची जबाबदारी सांभाळली आहे. मर्यादित मानधन, पगारातील विलंब आणि आर्थिक असुरक्षितता अशा अनेक अडचणी असूनही त्यांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणतीही तडजोड होऊ दिली नाही. या

वास्तवाची जाणीव ठेवून माजी खासदार आणि रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा. रामशेठ ठाकूर यांनी हंगामी प्राध्यापकांच्या प्रश्नांकडे अत्यंत संवेदनशीलतेने पाहिले. त्यांच्या मते, "शिक्षक आर्थिकदृष्ट्या सक्षम असेल तरच तो विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊ शकतो." त्यामुळे हंगामी प्राध्यापकांच्या मानधनाचा प्रश्न हा केवळ आर्थिक नसून शिक्षणाच्या गुणवत्तेशी निगडित आहे, अशी त्यांची ठाम भूमिका होती.

रयत शिक्षण संस्थेच्या बैठकींमध्ये हंगामी प्राध्यापकांच्या पगाराचा विषय त्यांनी गांभीर्याने मांडला. प्राध्यापकांना वेळेवर मानधन मिळावे, त्यांच्या आर्थिक अडचणी कमी व्हाव्यात आणि संस्थेच्या आर्थिक नियोजनात त्यांच्या हिताचा प्राधान्याने विचार व्हावा, यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. शिक्षकांचा आत्मसन्मान जपणे ही शिक्षण संस्थेची नैतिक जबाबदारी आहे, यावर त्यांनी नेहमी भर दिला.

मा. रामशेठ ठाकूर यांचा दृष्टिकोन केवळ प्रशासकीय नव्हता; तो मानवी मूल्यांवर आधारित होता. शिक्षकांच्या अडचणी समजून घेणे, त्यांचे म्हणणे संयमाने ऐकून घेणे आणि शक्य त्या मर्यादेत त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणे, ही त्यांची कार्यशैली होती. त्यामुळे हंगामी प्राध्यापकांमध्ये त्यांच्याविषयी विश्वास आणि आपुलकीची भावना निर्माण झाली. त्यांच्या मते, संस्थेच्या विकासाचा पाया भक्कम करायचा असेल तर शिक्षकांचे मनोबल उंचावणे आवश्यक आहे. शिक्षकांना आर्थिक सुरक्षितता, सन्मान आणि प्रोत्साहन मिळाल्यास त्याचा थेट सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर आणि संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीवर होतो.

आजही हंगामी प्राध्यापकांच्या प्रश्नांचा विचार करताना मा. रामशेठ ठाकूर यांनी मांडलेला संवेदनशील, मानवतावादी आणि शिक्षक-केंद्रित दृष्टिकोन मार्गदर्शक ठरतो. शिक्षण क्षेत्रातील त्यांची ही भूमिका केवळ लोकप्रतिनिधी म्हणून नव्हे, तर शिक्षणावर नितांत प्रेम करणाऱ्या समाजाभिमुख नेतृत्वाचे प्रतीक आहे.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे मोखाडा महाविद्यालयावरील विशेष प्रेम: लोकप्रतिनिधी म्हणून विकासकामे करणे ही प्रत्येक नेत्याची जबाबदारी असते; परंतु एखाद्या शैक्षणिक संस्थेशी आत्मीयतेचे नाते जोडून तिच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने कार्य करणारे नेते विरळाच आढळतात. माजी खासदार तथा रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा. रामशेठ ठाकूर यांनी मोखाडा महाविद्यालयाशी असेच जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले. हे नाते केवळ औपचारिक पालकत्वापुरते मर्यादित नव्हते, तर विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याच्या ध्यासातून निर्माण झालेली सामाजिक बांधिलकी होती. पालघर जिल्ह्यातील मोखाडा हा आदिवासीबहुल आणि भौगोलिकदृष्ट्या दुर्गम तालुका आहे. या भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, त्यांना शिक्षणासाठी दूरवर जावे लागू नये आणि त्यांच्या आयुष्याला नवी दिशा मिळावी, या उद्देशाने कार्य करणाऱ्या महाविद्यालयावर मा. रामशेठ ठाकूर यांचे विशेष प्रेम होते. महाविद्यालयाचे पालकत्व स्वीकारल्यानंतर त्यांनी तेथील शैक्षणिक, भौतिक आणि प्रशासकीय गरजांचा सातत्याने आढावा घेतला. महाविद्यालयाच्या प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांशी नियमित संवाद साधून त्यांनी विकासाच्या विविध योजना पुढे नेण्यास प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाबरोबरच आधुनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

महाविद्यालयाच्या विकास समितीचे सदस्य म्हणून त्यांनी पायाभूत सुविधा वाढविणे, नवीन शैक्षणिक संधी निर्माण करणे, ग्रंथालय, प्रयोगशाळा, संगणक सुविधा आणि विद्यार्थी कल्याणाशी संबंधित उपक्रमांना चालना देण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रत्येक निर्णयामध्ये विद्यार्थीहित हा केंद्रबिंदू होता. मा. रामशेठ ठाकूर यांचे मोखाडा महाविद्यालयावरील प्रेम केवळ शब्दांत नव्हते; ते कृतीतूनही दिसून आले. महाविद्यालयाच्या विकासासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य मिळावे, विविध विकासकामांना गती मिळावी

आणि शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम व्हावे यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. शिक्षण क्षेत्रात केलेली गुंतवणूक ही समाजाच्या भविष्याची गुंतवणूक आहे, या विचारावर त्यांचा दृढ विश्वास होता. विशेषतः आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबाबत त्यांना अपार आस्था होती. आर्थिक, सामाजिक आणि भौगोलिक अडचणींवर मात करून विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण करावे, आत्मविश्वासाने पुढे जावे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात यावे, अशी त्यांची अपेक्षा होती. त्यामुळे मोखाडा महाविद्यालयाच्या प्रगतीकडे ते नेहमीच आत्मीयतेने पाहत असत.

आज मोखाडा महाविद्यालयाची होत असलेली प्रगती, वाढत असलेली शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला आत्मविश्वास पाहताना मा. रामशेठ ठाकूर यांचे प्रेम, मार्गदर्शन आणि सहकार्य यांची आठवण आवर्जून होते. त्यांच्या या योगदानामुळे मोखाडा महाविद्यालयाची वाटचाल अधिक सक्षम झाली असून त्यांचे कार्य शिक्षणसेवेतील प्रेरणादायी आदर्श म्हणून सदैव स्मरणात राहील.



तारपा नृत्य सादर करताना महाविद्यालयातील विद्यार्थी.



दीपप्रज्वलन करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, मा. चंद्रकांत दळवी साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



नवीन इमारतीचे उद्घाटन प्रसंगी लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचा सन्मान करताना शरदचंद्रजी पवार साहेब व इतर मान्यवर.



महाविद्यालय नॅक समितीच्या भेटी दरम्यान पूर्व पाहणी करताना मा. रामशेठ ठाकूर साहेब, ॲड. भगीरथ शिंदे साहेब व डॉ. अनिल पाटील साहेब.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : समाजसेवा, शिक्षण आणि विकासाचे प्रेरणास्थान



प्रा. पी. एस. राऊत

सहाय्यक प्राध्यापक,
वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख

"नेतृत्व म्हणजे केवळ पद नव्हे, तर समाजाच्या प्रगतीसाठी अखंड झटणारी वृत्ती होय." या विचाराला आपल्या कार्यातून साकार करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर. समाजकारण, शिक्षण, विकास आणि लोकहित या चारही क्षेत्रांमध्ये त्यांनी केलेले योगदान उल्लेखनीय असून त्यांच्या कार्याने रायगड जिल्हा, नवी मुंबई आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. साधेपणा, लोकाभिमुखता आणि दूरदृष्टी या गुणांमुळे ते जनमानसात आदराचे स्थान प्राप्त करून आहेत. माझा लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्याशी संबंध हा रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा येथे आला. मला त्यांच्याविषयी आलेले अनुभव मी थोडक्यात मांडत आहे.

शिक्षणाचा दीप प्रज्वलित करणारे नेतृत्व: "शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे" या विचारावर दृढ विश्वास ठेवून रामशेठ ठाकूर यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचावे, आधुनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि विद्यार्थ्यांना प्रगतीची समान संधी मिळावी यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. अनेक शैक्षणिक संस्थांच्या उभारणीत, विकासात आणि बळकटीकरणात त्यांचे योगदान मोलाचे राहिले आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शैक्षणिक मदत आणि प्रोत्साहन देण्याच्या उपक्रमांमुळे हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा मिळाली.

समाजसेवेचा अखंड वसा: रामशेठ ठाकूर यांचे व्यक्तिमत्त्व समाजसेवेशी घट्ट जोडलेले आहे. गरीब, गरजू आणि वंचित घटकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी विविध सामाजिक उपक्रम राबविले. आरोग्य सेवा, शैक्षणिक मदत, आपत्तीग्रस्तांना सहाय्य, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन आणि सामाजिक संस्थांना सहकार्य या माध्यमातून त्यांनी लोकहिताचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील प्रत्येक व्यक्तीचा विकास हा राष्ट्रविकासाचा पाया आहे. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकापर्यंत विकासाची फळे पोहोचावीत यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

विकासाभिमुख लोकनेते: लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले. रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, नागरी सुविधा आणि ग्रामीण विकास यांसारख्या अनेक क्षेत्रांत त्यांनी

महत्त्वपूर्ण कामे केली. विकास हा केवळ घोषणांमध्ये नसून तो प्रत्यक्ष लोकांच्या जीवनात दिसला पाहिजे, या भूमिकेतून त्यांनी कार्य केले.

जनतेशी सतत संपर्क ठेवणे, त्यांच्या अडचणी जाणून घेणे आणि प्रशासनाकडून त्यावर प्रभावी उपाययोजना करून घेणे, ही त्यांच्या नेतृत्वाची वैशिष्ट्ये आहेत.

दानशूर आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्वः दान ही केवळ आर्थिक मदत नसून समाजाप्रती असलेली जबाबदारी आहे, हा संदेश त्यांच्या कार्यातून दिसून येतो. शिक्षण, आरोग्य, धार्मिक आणि सामाजिक संस्थांना त्यांनी उदारहस्ते मदत केली. अनेक गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करून त्यांनी त्यांच्या स्वप्नांना बळ दिले. त्यांच्या दातृत्वामुळे अनेक सामाजिक उपक्रमांना चालना मिळाली असून समाजात परोपकाराची प्रेरणा निर्माण झाली आहे.

युवकांसाठी प्रेरणादायी नेतृत्वः आजच्या युवकांसाठी रामशेठ ठाकूर यांचे जीवन हे प्रेरणेचा दीपस्तंभ आहे. प्रामाणिकपणा, समाजाप्रती असलेली निष्ठा, विकासाची दृष्टी आणि लोकसेवेची अखंड तळमळ या गुणांमुळे त्यांनी नेतृत्वाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. समाजासाठी कार्य करताना संयम, समर्पण आणि सातत्य किती महत्त्वाचे असते, याचे उत्कृष्ट उदाहरण त्यांच्या जीवनातून पाहायला मिळते.

उपसंहारः लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे संपूर्ण कार्य हे समाजहित, शिक्षणप्रेम, विकासदृष्टी आणि लोकसेवा या मूल्यांवर आधारित आहे. त्यांनी केलेले कार्य केवळ एका पिढीसाठी नसून भावी पिढ्यांसाठीही प्रेरणादायी ठरणारे आहे. विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर समाजाला सोबत घेऊन जाण्याची त्यांची भूमिका हीच त्यांच्या नेतृत्वाची खरी ओळख आहे. त्यांच्या कार्याचा वारसा समाजात सेवा, समर्पण आणि विकासाची प्रेरणा जागवत राहील. म्हणूनच लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे व्यक्तिमत्त्व महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील एक प्रेरणादायी पर्व आहे. "लोकसेवा हीच ईश्वरसेवा" या विचाराला आपल्या कार्यातून मूर्त स्वरूप देणाऱ्या लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या उदंड आयुष्यासाठी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो!



महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेची स्मरणिका प्रकाशित करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, ॲड. भगीरथ शिंदे साहेब, मा.आ. सुनील भुसारा, प्र.प्राचार्य डॉ. ए. एन. चांदोरे व मा.प्राचार्य डॉ. एल. डी. भोर.



मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्या वतीने देण्यात येणारा 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या हस्ते स्विकारताना प्र. प्राचार्य डॉ. ए. एन. चांदोरे व प्राध्यापक.

एक कल्पतरू: लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर



प्रा. एस. आर. झुगरे

सहाय्यक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग

भारतीय संस्कृतीमध्ये "कल्पतरू" हे पूर्ती करणारे, आश्रय देणारे आणि समाज कल्याणासाठी सतत कार्यरत असलेल्या वृक्षाचे प्रतीक मानले जाते. म्हणून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आयुष्य समर्पित करणारी माणसे ही समाजासाठी "कल्पतरू" ठरतात. कल्पतरू म्हणजे लोकांच्या गरजा पूर्ण करणारा, आशा-आकांक्षा फुलवणारा आणि समाजहितासाठी सतत कार्यरत राहणारा वृक्ष म्हणून मा. खा. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, हे असेच एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे.जे प्रत्येकाच्या जीवनात शिक्षणाचा प्रकाश, मदतीचा हात आणि विकासाची फळे देतात. त्यांनी शिक्षण, समाजकारण, जनकल्याण, दातृत्व आणि ग्रामीण विकास त्यातल्यात्यात आमच्या मोखाडा सारखा डोंगर-दऱ्या असलेला आदिवासी बहुल भागांमध्ये विविध उपक्रमांना चालना दिली. त्यामुळे त्यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी तसेच अतुलनीय आहे, अर्थात सर्वांच्या गराजांच्या पूर्ततेचा एक "**कल्पतरू**" म्हणून नावारूपास आलेले मा. रामशेठ ठाकूर साहेब.

रायगड, पनवेल, पालघर आणि मोखाडा परिसरातील ग्रामीण व आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक संधी निर्माण करण्याच्या कार्यामुळे त्यांचे नाव नेहमीक अग्रस्थानी येते आणि भविष्यातही येतच राहील. उच्च शिक्षणाची दारे सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी खुली व्हावीत, या उद्देशाने त्यांनी विविध शैक्षणिक संस्थांच्या उभारणीस व विकासास सहकार्य केले. त्यामुळे अनेक ग्रामीण व आदिवासी युवक-युवतींना आपल्या परिसरातच उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या गेल्या असल्यामुळे याचं सर्वस्वी श्रेय जण्याच मुख्य कारण म्हणजे कल्पतरू मा.रामशेठ ठाकूर साहेब.

शिक्षणाचा कल्पवृक्ष: रामशेठ ठाकूर साहेबांचा ठाम विश्वास आहे की समाजाचा विकास शिक्षणातूनच शक्य आहे. त्यामुळे त्यांनी रयत शिक्षण संस्थेसह अनेक शैक्षणिक उपक्रमांना आर्थिक व नैतिक पाठबळ दिले. ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी त्यांनी शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक इमारती, वसतिगृहे आणि विविध सुविधा उभारण्यासाठी उदार हस्ते मदत केली.

ग्रामीण व आदिवासी भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शैक्षणिक

संस्थांना प्रोत्साहन.गरीब विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, शैक्षणिक सुविधा आणि आवश्यक ती मदत वेळेत करून, त्यांच्या या योगदानामुळे हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षणाची नवी दारे खुली झाली ती पुढीलप्रमाणे काव्य पकटीतून स्पष्ट होतात.

ज्ञानाचा हा दीप उजळूनी, गावोगावी शाळा केल्या,
अंधाराच्या वाटांवरती, लाखो ज्योती जळूनी नेल्या.॥
मायेचा हात फिरवून, पुसले त्याने कितीतरी अश्रू,
संकटात धावून येई, जसा स्वर्गातून कल्पतरू॥

आदिवासी समाजाचा आधारवड: रायगड, पनवेल, पालघर आणि मोखाडा सारख्या परिसरातील ग्रामीण व आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक संधी निर्माण करून साहेबांचे कार्य जणू काही कल्पवृक्षा प्रमाणे आहे. त्या तरु प्रमाणे साहेबांनी डोंगर दऱ्या-खोऱ्यामध्ये वसलेल्या मोखाडा सारख्या आदिवासी ग्रामीण बहुल भागामध्ये साहेबांनी प्रगत महाविद्यालय उभारून ग्रामीण आदिवासी विद्यार्थ्याच्या स्वप्नांना जणू काही गवसणी घातली. त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'कमवा आणि शिका' विचारांची/ शिक्षणाची शिकवण ग्रामीण व दुर्गम भागात होतकरू विद्यार्थ्यांसाठी चालू ठेवून तिचा विस्तार केला. दुर्गम भागातील शाळा, वसतिगृहे आणि मूलभूत सुविधांच्या विकासासाठी योग्य उपाययोजना आखल्या व आदिवासी विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. आदिवासींच्या सामाजिक आणि शैक्षणिक सक्षमीकरणावर भर ही दुरदृष्टही ठेवून आदिवासी क्षेत्रात कार्य चिरंतन ठेवले.

समाजकारणातील कल्पतरू आणि लोकसेवेतून लोकनेते: राजकारणात सक्रिय असतानाही त्यांनी लोकसेवेला सर्वोच्च प्राधान्य दिले. पाणीपुरवठा, रस्ते, शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण विकास यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर त्यांनी सातत्याने काम केले. सामान्य माणसाच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी ते सदैव तत्पर राहिले. त्यामुळे जनतेमध्ये त्यांना "लोकनेते" म्हणून त्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

दानशूर कल्पतरू : रामशेठ ठाकूर साहेब यांना अनेकजण "दानशेठ" म्हणूनही ओळखतात. त्यांनी समाजोपयोगी कार्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली आहे. शिक्षणसंस्था, आरोग्यसेवा, सामाजिक संस्था,धार्मिक व सांस्कृतिक उपक्रम, तसेच गरजू विद्यार्थ्यांना त्यांनी सातत्याने सहाय्य केले आहे. त्यांचे दान हे केवळ आर्थिक नसून समाजाच्या प्रगतीसाठी असलेली त्यांची बांधिलकी दर्शवणारे आहे.

जनसामान्याचे कल्पतरू: जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणे हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य राहिले आहे. सामान्य नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. पिण्याचे पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि सामाजिक न्याय यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर त्यांनी विधायक भूमिका घेतली. त्यामुळे सर्वसामान्यांमध्ये त्यांच्याविषयी विश्वास आणि आपुलकी निर्माण झाली. त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू केवळ विकास नव्हे, तर माणूस घडविणे हा होता. शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम समाज निर्माण करण्याची त्यांची भूमिका अनेक व्यक्ति व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ग्रामीण आणि आदिवासी समाजातील युवकांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

उत्तम नेतृत्वगुण आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व : रामशेठ ठाकुर साहेब यांनी शिक्षणाला केवळ पदवी मिळविण्याचे साधन न मानता, उत्तम नागरिक घडविण्याचे प्रभावी माध्यम मानले. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे, त्यांना आधुनिक सुविधा मिळाव्यात आणि आर्थिक अडचणीमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्याची दिशा मिळाली. त्यांचे नेतृत्व हे दूरदृष्टी, प्रामाणिकपणा, कार्यतत्परता आणि लोकाभिमुख विचारांनी परिपूर्ण आहे. प्रत्येक निर्णयामध्ये समाजहित, विद्यार्थ्यांचे कल्याण आणि शैक्षणिक गुणवत्तेला त्यांनी सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक

शैक्षणिक संस्था प्रगतीच्या नव्या उंचीवर पोहोचल्या. त्यांनी शिक्षणाबरोबरच संस्कार, शिस्त, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा सातत्याने प्रयत्न केला.

उपसंहार: मा. खा. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब हे समाजाच्या प्रगतीसाठी अखंड कार्य करणारे एक "**कल्पतरू**" आहेत. त्यांच्या कार्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी, अनेक कुटुंबांना आधार आणि समाजाला विकासाची दिशा मिळाली आहे. त्यांचे जीवन समाजसेवा, शिक्षणप्रेम आणि दानशूरतेचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श भावी पिढ्यांसाठी सदैव मार्गदर्शक राहील.



कलामंच उद्घाटन प्रसंगी लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, मा. चंद्रकांत दळवी साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



महाविद्यालयातील डिजीटल साक्षरता केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी स्वागत करताना मा. रामशेठ ठाकूर साहेब व इतर मान्यवर.



महाविद्यालयातील डिजीटल साक्षरता केंद्राचे उद्घाटन करताना मा. रामशेठ ठाकूर साहेब व इतर पदाधिकारी.



महाविद्यालय नवीन प्रशासकीय इमारतीच्या आराखड्याविषयी मार्गदर्शन करताना मा. रामशेठ ठाकूर साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.

शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तन: लोकनेते मा. रामशेठ ठाकूर



प्रा. बी. पी. कनोजा

सहाय्यक प्राध्यापक,
गणित विभाग प्रमुख

"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते पिणारा गुरगुरल्याशिवाय राहणार नाही," असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. शिक्षण ही केवळ पदवी प्राप्त करण्याची प्रक्रिया नसून ती व्यक्ती, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीचा भक्कम पाया आहे. शिक्षणामुळे विचारांना चालना मिळते, व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडून येते. शिक्षणाच्या या परिवर्तनशील शक्तीची जाणीव ठेवून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणारे मा. श्री. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी शिक्षण हे समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले. ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, त्यांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पोहोचावा आणि ते समाजाच्या मुख्य प्रवाहात यावेत, हा त्यांचा ध्यास होता. शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी केलेले कार्य हे केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित नसून सामाजिक परिवर्तनाचे एक प्रभावी आंदोलन आहे.

समाजातील आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक विषमता दूर करण्यासाठी शिक्षण हे अत्यंत आवश्यक आहे. आजही अनेक विद्यार्थी आर्थिक अडचणी, सुविधांचा अभाव किंवा सामाजिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहतात. अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य मा. श्री. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी सातत्याने केले आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. शिक्षण हेच व्यक्तीला स्वाभिमान, आत्मविश्वास आणि आत्मनिर्भरता प्रदान करते, हा त्यांचा दृढ विश्वास त्यांच्या कार्यातून दिसून येतो. शिक्षणामुळे केवळ व्यक्ती सुशिक्षित होत नाही, तर समाजही सुसंस्कृत आणि प्रगतिशील बनतो. सुशिक्षित समाज हा अंधश्रद्धा, विषमता आणि सामाजिक अन्यायाला विरोध करण्याची क्षमता बाळगतो. वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना शिक्षणातूनच विकसित होते. त्यामुळे समाज परिवर्तनासाठी शिक्षणाचा प्रसार करणे ही काळाची गरज आहे. मा. श्री. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानासोबतच मूल्यशिक्षण, सामाजिक जाणीव आणि राष्ट्रप्रेमाची भावना रुजविण्याचे कार्य केले आहे.

आजचे युग हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि

नवोपक्रमाचे युग आहे. जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांकडे ज्ञानाबरोबरच कौशल्ये, नेतृत्वगुण आणि संशोधनाची वृत्ती असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या अपेक्षेने शिक्षण घेऊ नये, तर त्यांनी रोजगारनिर्माते बनण्याचा प्रयत्न करावा, समाजासाठी कार्य करावे आणि राष्ट्राच्या प्रगतीत आपले योगदान द्यावे, हा संदेश लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या कार्यातून मिळतो. समाज परिवर्तनासाठी शिक्षणाबरोबरच संस्कारांचे महत्त्वही अनन्यसाधारण आहे. मूल्यांशिवाय शिक्षण अपूर्ण आहे. प्रामाणिकपणा, शिस्त, परिश्रम, सामाजिक जबाबदारी आणि सेवाभाव हे गुण विद्यार्थ्यांमध्ये रुजले तरच शिक्षणाचे खरे उद्दिष्ट साध्य होईल. ज्ञान आणि संस्कार यांचा सुंदर मिलाफ घडवून समाजाला सक्षम आणि सशक्त बनविण्याचा प्रयत्न हा त्यांच्या कार्याचा महत्त्वपूर्ण पैलू आहे. आज आपण डिजिटल युगात जगत आहोत. कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती-तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या नव्या वाटा विद्यार्थ्यांसाठी खुल्या झाल्या आहेत. या बदलत्या काळाशी सुसंगत शिक्षण विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे. त्यासाठी शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थीकेंद्रित, कौशल्याधारित आणि संशोधनाभिमुख शिक्षण देणे आवश्यक आहे. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा संकल्प आपण केला तरच खऱ्या अर्थाने समाज परिवर्तन घडेल.

मा. श्री. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे कार्य हे शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तन कसे घडवून आणता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांनी दाखवून दिलेला मार्ग हा भावी पिढ्यांसाठी दिशादर्शक आहे. शिक्षण हे केवळ करिअर घडविण्याचे साधन नसून ते समाज घडविण्याची आणि राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया आहे, ही जाणीव प्रत्येक विद्यार्थ्याने आणि नागरिकाने ठेवणे आवश्यक आहे. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, "एक विद्यार्थी सुशिक्षित झाला तर एक कुटुंब घडते आणि एक पिढी सुशिक्षित झाली तर संपूर्ण समाज बदलतो." शिक्षणाच्या या परिवर्तनकारी शक्तीचा उपयोग समाजहितासाठी करण्याचा संदेश लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या कार्यातून आपल्याला मिळतो. त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन ज्ञान, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांच्या आधारे आपण सशक्त, समृद्ध आणि प्रगत समाज निर्माण करण्याचा संकल्प करूया. "शिक्षणाचा प्रकाश प्रत्येक घरापर्यंत पोहोचला, तर समाज परिवर्तनाचा सूर्योदय निश्चितच होईल."



महाविद्यालय नवीन इमारतीच्या बांधकामासंदर्भात मार्गदर्शन करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



महाविद्यालयातर्फे शाळेतील विद्यार्थ्यांना सोया मिल्क मशीनची पाहणी करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व डॉ. अनिल पाटील साहेब.

लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर : शिक्षण, समाजसेवा आणि लोककल्याणाचे खरे उपासक



प्रा. के. व्ही. धनेश्वर

सहाय्यक प्राध्यापक,
गणित विभाग

"शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे." या विचाराला प्रत्यक्ष कृतीत उतरवणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांनी शिक्षण, सामाजिक विकास आणि ग्रामीण भागातील जनतेच्या प्रगतीसाठी अनेक उपक्रम राबविले. विशेषतः पालघर जिल्ह्यातील आदिवासी व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, या उद्देशाने त्यांनी विविध शैक्षणिक संस्थांना मोलाचे सहकार्य केले. मोखाडा येथील लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या विकासामध्ये त्यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे.मोखाडा हा पालघर जिल्ह्यातील आदिवासीबहुल आणि डोंगराळ तालुका आहे. आर्थिक अडचणी, वाहतुकीची कमतरता आणि शैक्षणिक सुविधांचा अभाव यामुळे अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे कठीण जात होते. या परिस्थितीची जाणीव ठेवून लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी ग्रामीण व आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरातच उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या प्रेरणेमुळे आणि सहकार्यामुळे मोखाडा परिसरात उच्च शिक्षणाचा प्रसार झाला. शिक्षण हे केवळ पदवी मिळविण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक परिवर्तन आणि आर्थिक प्रगतीचा पाया आहे, हा विचार त्यांनी समाजात रुजविण्याचा प्रयत्न केला.

मोखाडा येथील लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी त्यांनी उदार आर्थिक मदत केली. महाविद्यालयाच्या नवीन इमारतीसाठी त्यांनी ₹ १ कोटींची देणगी दिली. या मदतीमुळे प्रशस्त वर्गखोल्या, आधुनिक प्रयोगशाळा, ग्रंथालय, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा आणि चांगले शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यास मदत झाली. महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले आणि शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक सहकार्य दिले. त्यामुळे आज हे महाविद्यालय पालघर जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र बनले आहे.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचा विश्वास होता की ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे. योग्य संधी आणि मार्गदर्शन मिळाल्यास ते कोणत्याही क्षेत्रात यश मिळवू शकतात. त्यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारे

अनेक उपक्रम प्रोत्साहित केले. महाविद्यालयात शैक्षणिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, व्यक्तिमत्त्व विकास, कौशल्य विकास, करिअर मार्गदर्शन आणि सामाजिक उपक्रम यांना प्रोत्साहन मिळाले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकापुरते मर्यादित न राहता समाजासाठी जबाबदार नागरिक बनावे, हा त्यांचा उद्देश होता.मोखाडा तालुक्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज राहतो. या समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळाल्यास त्यांच्या कुटुंबाचा आणि संपूर्ण समाजाचा विकास होऊ शकतो, याची लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांना पूर्ण जाणीव होती. त्यांच्या योगदानामुळे अनेक विद्यार्थ्यांनी पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. अनेक विद्यार्थी शिक्षक, प्राध्यापक, सरकारी अधिकारी, पोलीस, बँक कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील यशस्वी व्यावसायिक बनले. त्यामुळे शिक्षणाद्वारे समाजात सकारात्मक परिवर्तन घडून आले.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी शिक्षणासोबतच समाजसेवेलाही मोठे महत्त्व दिले. ग्रामीण विकास, आरोग्य, पिण्याचे पाणी, रोजगार, पायाभूत सुविधा आणि सामाजिक एकात्मता यांसाठी त्यांनी विविध उपक्रमांना सहकार्य केले. त्यांच्या कार्यामुळे समाजात शिक्षणाबद्दल जागृती निर्माण झाली आणि पालकांनी आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. आज मोखाडा महाविद्यालयात कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखांमध्ये अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयात विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, संशोधन आणि समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. राष्ट्रीय सेवा योजना, विविध स्पर्धा, व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम आणि कौशल्यविकास उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत आहे. या प्रगतीमागे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे दूरदृष्टीपूर्ण योगदान महत्त्वाचे आहे.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी मोखाडा महाविद्यालयासाठी केलेले योगदान हे केवळ आर्थिक मदत नसून ग्रामीण आणि आदिवासी समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेली एक मोठी सामाजिक गुंतवणूक आहे. त्यांनी शिक्षणाचा दीप दुर्गम भागात पोहोचवून हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण केला. त्यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे आणि भावी पिढ्यांना शिक्षण, समाजसेवा आणि राष्ट्रनिर्मितीची प्रेरणा देणारे आहे.

शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडविण्याचा त्यांचा विचार आणि मोखाडा महाविद्यालयासाठी दिलेले योगदान सदैव स्मरणात राहील. त्यांच्या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांची स्वप्ने पूर्ण झाली असून भविष्यातही त्यांचा आदर्श शिक्षण क्षेत्राला प्रेरणा देत राहील.



महाविद्यालयास 'नॅक'मध्ये A+ दर्जा प्राप्त झाल्याबद्दल लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना प्राचार्य डॉ. एल. डी. भोर व प्राध्यापक.



महाविद्यालय नवीन इमारत बांधकाम पाहणी करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.

शिक्षण आणि मानवतेचा दीपस्तंभ : लोकनेते मा. रामशेठ ठाकूर



प्रा. बी. एल. बोंड

सहाय्यक प्राध्यापक,
भौतिकशास्त्र विभाग

पालघर जिल्ह्याच्या विकासकार्यात जर काही मुद्दे लक्षात घेतले की लक्षात येते ते म्हणजे जव्हार, मोखाडा तालुका आणि त्यातही मोखाडा विभाग म्हणजे दुष्काळप्रवण,डोंगराळ,आदिवासी वस्ती यामध्ये नवचैतन्याची लहर येण्यासाठी विशेष कार्याची जाणीव जनमाणसातपसरणे गरजेचे होते.हि गरज ओळखून या भागात शिक्षणाने क्रांती होते ध्यास मनाशी बाळगून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी त्यांच्या झोपडीपर्यंत उपलब्ध करून देण्यासाठी पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारातून प्रेरित होऊन जून १९८४ मध्ये मोखाडा सारख्या दुर्लक्षित भागामध्ये रयत शिक्षण संस्थेची पायाभरणी झाली.

रयत शिक्षण संस्था हि सामाजिक बदल स्वीकारून, तंत्रज्ञानाची कास धरून आधुनिक तंत्रज्ञान शिक्षणपद्धती, डिजिटल शिक्षण,बदलते शैक्षणिक ध्येयधोरण यांच्याशी सुसंगत,कौशल्याधारित ,रोजगारभिन्मुख कार्य संस्था करीत आहे. संस्थेच्या या व्यापक दृष्टीकोनातून वेगवेगळे उपक्रम राबवले जातात.तेव्हा गरज असते ते म्हणजे सामाजीक तळमळ असणाऱ्या व्यक्तीची, दानशूर व्यक्तीची. शिक्षणाला समाजहित आणि राष्ट्रहित मानणाऱ्या संवेदनशील माणसांची.या कार्यासाठी ग्रामीण शिक्षणाचा कायापालट होण्यासाठी जे प्रामुख्याने कार्यकर्तुत्व केले ते म्हणजे मा.रामशेठ ठाकूर साहेबांचे.त्यामुळे संस्थेमध्ये अत्यंत आदराने नाव घेतले जाते.

भौगोलिक दुर्गमतेमुळे मोखाडा तालुका काही दशकात तीव्र कुपोषण,बालमृत्यू, अपुरी आरोग्य सुविधा यामुळे चर्चेत राहिला आहे.तसेच डोंगराळ भाग आणि दुष्काळप्रवनामुळे येथील लोकांच्या उदरनिर्वाहाची सुविधा नसल्यामुळे नेहमीच स्थलांतर होत राहिले.या सर्व परीस्थितीचा अभ्यास करताना लक्षात येते की, फक्त शिक्षणामुळेच येथील परीस्थिती बदलू शकते आणि यासाठी या ग्रामीण विकाससाठी खंबीर नेतृत्व, दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व पाहिजे होते. ते रयतच्या माध्यमातून उभा आधारस्तंभ म्हणजे मा.लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब. १९८४ साली स्थापन झालेल्या महाविद्यालयामध्ये कला आणि वाणिज्य शाखा होत्या , त्यानंतर पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांची वैज्ञानिक गरज लक्षात घेऊन २०१३ मध्ये विज्ञान विभाग सुरु करण्यात आले. मोखाडा तालुक्यातील एकमेव प्रमुख महाविद्यालय असल्याकारणाने दूरवरच्या गाव-पाड्यातील वस्त्यावरून दुर्गम भागातून, आदिवासी समूहातील विद्यार्थी महाविद्यालयामध्ये प्रवेश घेऊ लागले आहेत. वाढत्या विद्यार्थ्यांच्या संख्येमुळे

भौतिक सोयीसुविधा अपुऱ्या पडू लागल्या त्यावेळी महाविद्यालयाच्या व्यवस्थापन कमिटीवर कार्य करत होते. साहेबांनी स्वतः ६ कोटी रुपये खर्च करून महाविद्यालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी मदत केली आणि खऱ्या अर्थाने महाविद्यालयाचे सौदर्य अधिकच खुलून दिसू लागले.महाविद्यालय भव्य,दिव्य,प्रशस्त आणि दिमाखात उभी राहिली. याची दाखल म्हणून नॅक A+ महाविद्यालय गणले गेले.

जे शिक्षण महानगरामध्ये महागडे शुल्क भरून दिले जाते तेच शिक्षण मोफत,गुणवत्तापूर्वक विद्यार्थ्यांच्या भविष्याचा वेध घेवून दुर्गम खेडोपाडी त्यांच्या दारापर्यंत मिळायला पाहिजे अशी त्यांची भावना होती.हि समाजहिताची भावना फक्त त्यांच्यापर्यंत मर्यादित न ठेवता,रंजल्या गांजल्या आदिवासी बांधावा शिक्षणप्रवाहात आणण्यासाठी स्वतः वयक्तिक लक्ष दिले.आज मोखाडा सारख्या खेड्यावर उच्च शिक्षणाची दारे खुली करण्याचे श्रेय मा.साहेबाना जाते. तसेच महाविद्यालयातील शिक्षकांवर नितांत प्रेम केले. हे ते बोलून दाखवत नाहीत तर त्यांच्या कृतीतून दिसून येते.हंगामी प्राध्यापकांचे अनेक प्रश्न हे मा. साहेबांनी गांभीर्याने सोडवले.

येणारा काळ हा तंत्रज्ञान आधारित असणार आहे.त्या दृष्टीने आपला ग्रामीण भागातील विद्यार्थी हा जगाच्या ,स्पर्धेच्या युगात मागे राहू नये म्हणून त्यांनी कृत्रिम बुद्धीमतेवर भर दिला.त्यामुळे वैद्यानिक दृष्टीकोन आणि कृत्रिम बुद्धिमता यांचा समन्वय साधत महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता प्रयोगशाळा आणि प्रशस्त विज्ञान आणि तंत्रज्ञान आधारित प्रयोगशाळा विद्यार्थ्यांच्या नव्या भविष्याचा वेध घेत आहे ते साहेबांच्या दूरदृष्टीमुळेच शक्य झाले आहे. मा.साहेबांनी समाजातील प्रत्येक घटकांना शिक्षण मिळावे यासाठी नेहमीच गांभीर्याने लक्ष दिले. एवढेच नव्हे तर त्या पुत्रवत काळजी सुद्धा घेतली. उद्योजाकामधील समाजकारण,शैक्षणिक गुणवत्तेचे जाहीर प्रकटन करणाऱ्या या महान व्यक्तिमत्वास माझा त्रिवार वंदन करतो.



महाविद्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीचा आराखडा तयार करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



महाविद्यालय विकास समिती बैठकीस उपस्थित लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या समवेत सेवकवृंद.

लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर यांचे सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान



प्रा. एम. के. खादे

सहाय्यक प्राध्यापक,
गणित विभाग

समाजाच्या विकासासाठी दूरदृष्टी, निस्वार्थ सेवा आणि लोकहिताची तळमळ असलेले नेतृत्व समाजाला योग्य दिशा देत असते. अशा नेतृत्वामुळे समाजात शिक्षण, संस्कृती, सामाजिक ऐक्य आणि विकासाची नवी दृष्टी निर्माण होते. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर हे अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. त्यांनी शिक्षण, समाजसेवा, सांस्कृतिक जतन, ग्रामीण विकास, युवकांचे सक्षमीकरण आणि लोककल्याण या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्या कार्यामुळे अनेक सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांना चालना मिळाली असून समाजात सकारात्मक परिवर्तन घडून आले. रामशेठ ठाकूर यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केल्यानंतर समाजाच्या सर्व घटकांचा विकास हेच आपले ध्येय मानले. सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. समाजातील वंचित, गरीब, शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि युवक यांच्या गरजा ओळखून त्यांच्यासाठी विविध विकासात्मक उपक्रम राबविण्याचा प्रयत्न केला.

समाजातील दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी अनेक सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन दिले. आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, पाणी संवर्धन आणि सामाजिक जनजागृती यांसारख्या कार्यक्रमांत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. समाजात बंधुभाव, समानता आणि सामाजिक सलोखा वाढावा यासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले. गरजू कुटुंबांना मदत, आपत्तीग्रस्तांना सहकार्य, सामाजिक संस्थांना पाठबळ आणि लोकहिताच्या विविध योजनांना प्रोत्साहन देऊन त्यांनी समाजसेवेचे उत्तम उदाहरण घालून दिले. शिक्षणाशिवाय समाजाचा विकास शक्य नाही, या विचारातून त्यांनी शैक्षणिक क्षेत्राला विशेष प्राधान्य दिले. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि शिक्षण सर्वांसाठी सुलभ व्हावे यासाठी त्यांनी विविध शैक्षणिक संस्थांच्या उभारणीस आणि विकासास सहकार्य केले. ग्रंथालये, प्रयोगशाळा, संगणक शिक्षण, क्रीडा सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या उपक्रमांना त्यांनी प्रोत्साहन दिले. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, फी सवलत, पुस्तके, इतर शैक्षणिक मदत आणि शिक्षणात गुणवत्ता वाढविण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

भारतीय संस्कृती, परंपरा आणि लोककलेचे जतन हे समाजाच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे, असा त्यांचा विश्वास होता. त्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, साहित्य संमेलने, संगीत, नृत्य, नाटक, लोककला महोत्सव आणि पारंपरिक उत्सवांना प्रोत्साहन दिले. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, लोककलेचे संवर्धन करणे आणि नव्या पिढीला आपल्या सांस्कृतिक वारशाची ओळख करून देणे यासाठी त्यांनी मोलाचे कार्य केले. त्यामुळे सांस्कृतिक क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाले.

युवकांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास, सामाजिक जाणीव आणि राष्ट्रप्रेम निर्माण करण्यासाठी त्यांनी विविध युवक विकास कार्यक्रमांना चालना दिली. कौशल्य विकास, रोजगाराभिमुख प्रशिक्षण, क्रीडा स्पर्धा आणि सामाजिक उपक्रमांत युवकांचा सहभाग वाढविण्यावर त्यांनी भर दिला. ग्रामीण भागातील रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, शिक्षण आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास हा देशाच्या प्रगतीचा पाया आहे, या विचारातून त्यांनी अनेक विकासकामांना गती दिली. महिलांनी शिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार आणि सामाजिक क्षेत्रात पुढे यावे यासाठी त्यांनी महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन दिले. महिला बचत गट, प्रशिक्षण कार्यक्रम आणि सामाजिक जागृती उपक्रमांद्वारे महिलांना सक्षम करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कार्यामुळे शिक्षणाचा प्रसार, सामाजिक एकोपा, सांस्कृतिक जतन आणि विकासाभिमुख विचारांना चालना मिळाली. अनेक युवक समाजकार्यात सहभागी झाले, विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळाली आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडून आले. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे सामाजिक आणि सांस्कृतिक योगदान हे समाजासाठी प्रेरणादायी आणि अनुकरणीय आहे. त्यांनी शिक्षण, समाजसेवा, संस्कृती, युवक विकास, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण विकास या सर्व क्षेत्रांत केलेले कार्य समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांचे जीवन हे लोकसेवा, कर्तव्यनिष्ठा आणि विकासाभिमुख विचारांचे उत्कृष्ट उदाहरण आहे. समाजहितासाठी केलेले त्यांचे कार्य भावी पिढ्यांना प्रेरणा देत राहील आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शक ठरेल.



महाविद्यालयातील कृत्रिम बुद्धिमत्ता लॅब उद्घाटन प्रसंगी मा. चंद्रकांत दळवी साहेब, लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



महाविद्यालयातील कलामंच उद्घाटन प्रसंगी मा. चंद्रकांत दळवी साहेब, लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.

लोकहितासाठी आयुष्य वेचलेले शिक्षणमहर्षी व समाजसेवक : लोकनेते मा. रामशेठ ठाकूर



प्रा. टी. एस. जाबर

सहाय्यक प्राध्यापक,
वनस्पतीशास्त्र विभाग

लोकनेते माजी खासदार रामशेठ चांगू ठाकूर हे रायगड जिल्हा, पनवेल परिसरातील एक ज्येष्ठ राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि उद्योजकीय व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. जनतेशी असलेले निकटचे नाते, विकासाची दूरदृष्टी आणि शिक्षणाविषयी असलेली प्रखर आस्था यामुळे त्यांनी महाराष्ट्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांनी राजकारणाला समाजसेवेचे माध्यम मानत शिक्षण, सामाजिक विकास, ग्रामीण प्रगती आणि लोककल्याणासाठी दीर्घकाळ कार्य केले आहे. सामान्य कुटुंबात जन्मलेल्या रामशेठ ठाकूर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण केले. त्यांनी सातारा येथील रयत शिक्षण संस्थेत "कमवा आणि शिका" या योजनेअंतर्गत शिक्षण घेतले. त्यानंतर बी.एड. पूर्ण करून शिक्षक म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. पुढे त्यांनी व्यवसाय क्षेत्रात प्रवेश करून आपल्या कष्ट, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टीच्या बळावर यशस्वी उद्योजक म्हणून स्थान निर्माण केले. रामशेठ ठाकूर यांनी जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत सार्वजनिक जीवनात प्रवेश केला. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी रायगड आणि नवी मुंबई परिसरातील रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, वाहतूक आणि नागरी सुविधांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले. संसदेतही त्यांनी मतदारसंघाच्या विविध प्रश्नांवर आवाज उठविला आणि विकासाभिमुख नेतृत्वाची ओळख निर्माण केली.

शिक्षणाचा प्रसार, गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सुविधा, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन तसेच ग्रामीण आणि शहरी भागातील विकासकामांवर त्यांनी विशेष भर दिला आहे. आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावी, यासाठी विविध उपक्रमांना त्यांनी पाठबळ दिले. सामाजिक बांधिलकी जपत अनेक गरजू कुटुंबांना मदतीचा हात देण्याचे कार्यही त्यांनी सातत्याने केले आहे. लोकप्रतिनिधी म्हणून विकासकामांना गती देणे, पायाभूत सुविधांचा विस्तार करणे आणि नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे, ही त्यांची कार्यपद्धती राहिली आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे अनेक विकासकामांना चालना मिळाली असून विविध क्षेत्रांमध्ये सकारात्मक बदल घडून आले आहेत. रामशेठ ठाकूर यांचे सर्वात मोठे योगदान शिक्षण क्षेत्रात मानले जाते. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या माध्यमातून अनेक शाळा, महाविद्यालये, विधी महाविद्यालये, विज्ञान-वाणिज्य महाविद्यालये, इंग्रजी माध्यमाच्या शाळा तसेच क्रीडा आणि शैक्षणिक संकुलांच्या उभारणीत त्यांचा मोलाचा सहभाग राहिला

आहे. पनवेल, खारघर, कामोठे, उलवे, द्रोणागिरी आणि परिसरातील हजारो विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात त्यांनी मोठी भूमिका बजावली.

रयत शिक्षण संस्थेने घडविलेल्या विद्यार्थ्यांपैकी रामशेठ ठाकूर हे एक उल्लेखनीय माजी विद्यार्थी मानले जातात. त्यांनी आपल्या मातृसंस्थेसाठी उदार आर्थिक मदत केली असून सातारा येथील संस्थेसाठी इमारतीचे बांधकाम करून दिले. त्यांच्या या दातृत्वाबद्दल विविध स्तरांतून त्यांचा गौरव करण्यात आला आहे. शिक्षणाबरोबरच आरोग्य, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम, गरीब विद्यार्थ्यांना मदत, सामाजिक संस्थांना आर्थिक सहकार्य, आपत्तीग्रस्तांना सहाय्य आणि ग्रामीण विकासासाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळावी हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू राहिला आहे. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि लोकहिताच्या कार्यामुळे विविध संस्था आणि मान्यवरांनी त्यांचा गौरव केला आहे. विशेषतः शिक्षणासाठी केलेल्या उदार योगदानामुळे त्यांना दानशूर आणि लोकाभिमुख नेतृत्व म्हणून ओळख मिळाली आहे.

लोकनेते माजी खासदार रामशेठ चांगू ठाकूर यांचे व्यक्तिमत्त्व हे संघर्ष, परिश्रम, सामाजिक बांधिलकी आणि शिक्षणसेवा यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांनी राजकारणासोबतच समाजकारणाला समान महत्त्व देत हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याला दिशा दिली. विकास, शिक्षण आणि जनसेवा या त्रिसूत्रीवर उभे असलेले त्यांचे कार्य पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.



महाविद्यालयातील 'कलामंच' चे उद्घाटन करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, मा. चंद्रकांत दळवी साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



कर्मवीर जयंतीनिमित्त महाविद्यालयातील रांगोळी प्रदर्शन पाहणी करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : दानशूर व्यक्तिमत्त्व, शिक्षणप्रेमी आणि समाजसेवेचा आधारवड



प्रा. डी. बी. महाले

व्यवसाय अभ्यासक्रम विभाग

महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणारे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर हे दानशूर व्यक्तिमत्त्व, शिक्षणप्रेमी समाजसेवक आणि लोककल्याणासाठी सदैव तत्पर असलेले नेतृत्व म्हणून परिचित आहेत. रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण आणि परिसराच्या विकासासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. गरीब, कष्टकरी, विद्यार्थी, रुग्ण, खेळाडू आणि गरजू नागरिकांच्या मदतीसाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले आहे. रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस २ जून रोजी साजरा केला जातो. त्यांच्या दानशूर वृत्तीचा, शैक्षणिक कार्याचा आणि समाजसेवेचा आढावा घेताना त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाची आणि कर्तृत्वाची प्रेरणादायी कहाणी समोर येते. साधेपणातून मोठेपणाकडे.

रामशेठ ठाकूर आज कितीही मोठ्या स्थानावर पोहोचले असले, तरी त्यांच्या स्वभावातील साधेपणा कायम आहे. '**शेठ**' म्हणून ओळख निर्माण झाल्यानंतरही त्यांचा साधा स्वभाव, साधी राहणी आणि माणसांशी असलेला आपुलकीचा संवाद बदललेला नाही. मोठेपण आले तरी माणूस म्हणून जमिनीवर राहणे, ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खासियत आहे.त्यांच्या जीवनप्रवासात संघर्ष, कष्ट, जिद्द आणि चिकाटी यांना विशेष महत्त्व आहे. त्यांनी आपल्या आयुष्याची सुरुवात शिक्षक म्हणून केली. रयत शिक्षण संस्थेच्या 'कमवा आणि शिका' या योजनेतून त्यांनी शिक्षण पूर्ण केले. सन १९७२ मध्ये त्यांनी पदवीचे शिक्षण पूर्ण केले आणि त्यानंतर बी.एड.चे शिक्षण घेतले. पनवेलमधील विठोबा खंडप्पा माध्यमिक विद्यालयात शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात केली.

सन १९७६ मध्ये त्यांच्या जीवनाला नवी दिशा मिळाली. छोट्या व्यवसायातून त्यांनी पुढे मोठी व्यावसायिक वाटचाल केली. कंत्राटदार म्हणून यश मिळविले; मात्र आपल्या संघर्षमय भूतकाळाचा आणि शिक्षक म्हणून केलेल्या कार्याचा त्यांनी कधीही विसर पडू दिला नाही.रामशेठ ठाकूर यांनी दोन वेळा लोकसभेत खासदार म्हणून रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. आपल्या राजकीय कारकिर्दीत त्यांनी विविध राजकीय प्रवाहांमध्ये काम केले; मात्र पक्षीय राजकारणापेक्षा समाजहिताला त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले.राजकीय मतभेद असले तरी व्यक्तीविषयी आदर कायम ठेवणे, हा त्यांच्या राजकीय संस्कारांचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे विविध पक्षांतील नेत्यांशी त्यांचे मैत्रीपूर्ण आणि

सुसंस्कृत संबंध राहिले आहेत. राजकारणातील वाढता कडवटपणा त्यांच्या स्वभावात कधीच दिसून आला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील समंजसपणा, संयम आणि सर्वसमावेशक दृष्टिकोनामुळे ते कोणत्याही पक्षातील व्यक्तीशी संवाद साधू शकतात. म्हणूनच त्यांची ओळख केवळ राजकारणी म्हणून नव्हे, तर समाजकारणी म्हणून अधिक ठळकपणे झाली आहे.

मा. रामशेठ ठाकूर यांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे शिक्षण क्षेत्रातील योगदान. स्वतः रयत शिक्षण संस्थेत शिकलेल्या रामशेठ ठाकूर यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून सर्वसामान्य आणि कष्टकरी कुटुंबातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक संस्था उभारल्या.जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था यांच्या माध्यमातून त्यांनी पनवेल, खारघर, खांदा कॉलनी, उलवे आणि परिसरात विविध शैक्षणिक संस्था उभारण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. सी. के. ठाकूर विद्यालय व महाविद्यालय, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालये, महाविद्यालये आणि विविध शैक्षणिक संकुले यांच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. आज हजारो विद्यार्थी या शैक्षणिक संस्थांमधून शिक्षण घेत आहेत. एकेकाळी स्वतः शिक्षक असलेला विद्यार्थी आज हजारो विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आधार बनला आहे, ही त्यांच्या कार्याची मोठी उपलब्धी आहे.त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे पनवेल आणि रायगड परिसरात उच्च शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या. विशेषतः गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना आपल्या घराजवळच दर्जेदार शिक्षण मिळावे, हा त्यांच्या कार्यामागील प्रमुख उद्देश राहिला आहे.रयत शिक्षण संस्था ही रामशेठ ठाकूर यांची मातृसंस्था आहे. ज्या संस्थेने त्यांना शिक्षण दिले, संस्कार दिले आणि जीवनाला दिशा दिली, त्या संस्थेप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त करत मोठे योगदान दिले.

सातारा येथील छत्रपती शिवाजी महाराज शिक्षण संकुलात रयत शिक्षण संस्थेसाठी जागेची आवश्यकता असताना रामशेठ ठाकूर यांनी सुमारे ७ कोटी रुपये खर्च करून इमारत उभारून दिली. त्यांच्या या योगदानाची दखल घेत या इमारतीला 'लोकनेते मा. रामशेठ ठाकूर भवन' असे नाव देण्यात आले.त्यांच्या रयत शिक्षण संस्थेप्रती असलेल्या योगदानाबद्दल विविध प्रसंगी गौरव करण्यात आला आहे. त्यांच्या मातृसंस्थेसाठी त्यांनी केलेले योगदान ही त्यांच्या कृतज्ञतेची आणि शिक्षणाविषयीच्या प्रेमाची जिवंत साक्ष आहे.मोखाडा येथील मोडकळीस आलेल्या महाविद्यालयाच्या बांधकामासाठीही त्यांनी ५ कोटी रुपयांचा निधी दिल्याचा उल्लेख केला जातो. शिक्षणाचा प्रकाश ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा, ही त्यांची सातत्यपूर्ण भूमिका राहिली आहे.




महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभाग आयोजित वन्यजीव चित्रफीत प्रदर्शन पाहणी करताना मा. रामशेठ ठाकूर साहेब व मा. भगीरथ शिंदे साहेब.



महाविद्यालयाची पाहणी करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर, ॲड. भगीरथ शिंदे साहेब व प्राचार्य डॉ. एल. डी. भोर.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर: कर्तृत्व, दानशूरता आणि जनसेवेचे महापर्व



प्रा. पी. के. कुवरे

सहाय्यक प्राध्यापक,
वनस्पतीशास्त्र विभाग

कोकणच्या आणि विशेषतः रायगड-नवी मुंबई परिसराच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक पटलावर ज्या काही निवडक व्यक्तिमत्त्वांनी स्वतःचा अथांग प्रभाव पाडला आहे, त्यात लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. २ जून १९५१ रोजी रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील गव्हाण (शिवाजी नगर) येथे एका शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या रामशेठ ठाकूर यांनी लहानपणापासूनच कष्टाची आणि प्रामाणिकपणाची शिकवण जपली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत 'कमवा आणि शिका' योजनेच्या माध्यमातून रयत शिक्षण संस्थेतून पदवी पूर्ण केल्यानंतर, त्यांनी अवघ्या २०० रुपये पगारावर शिक्षक म्हणून आपल्या प्रवासाची सुरुवात केली. शिक्षकाची नोकरी करत असतानाच त्यांनी उद्योग क्षेत्रात पाऊल ठेवले आणि सिडकोचे अवघ्या १० हजार रुपयांचे पहिले छोटे कंत्राट घेऊन आपल्या व्यावसायिक प्रवासाची पायाभरणी केली. स्वतःच्या अचूक निर्णयक्षमतेमुळे व कठोर परिश्रमांमुळे त्यांनी लॉजिस्टिक आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात शेकडो कोटींच्या उलाढालीचा भव्य उद्योग समूह उभारला. व्यवसायात उत्तुंग यश मिळवूनही त्यांनी आपले पाय जमिनीवरच ठेवले आणि मिळालेल्या यशाचा वाटा समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचवण्यासाठी स्वतःला पूर्णपणे समाजसेवेसाठी वाहून घेतले.

मा.रामशेठ ठाकूर यांचे सर्वात मोठे आणि चिरंतन योगदान म्हणजे त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात घडवून आणलेली क्रांती होय. वडिलांच्या स्मृत्यर्थ त्यांनी उभारलेल्या 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळा'च्या माध्यमातून पनवेल, उरण आणि नवी मुंबई परिसरातील ग्रामीण व शहरी भागांत शाळा, महाविद्यालये आणि व्यावसायिक शिक्षण संस्थांचे विशाल जाळे निर्माण केले, ज्यामुळे हजारो कष्टकरी, शेतकरी आणि आगरी-कोळी समाजातील मुलांना के.जी. ते पी.एच.डी. पर्यंतचे दर्जेदार शिक्षण परवडणाऱ्या दरात मिळाले. ज्या रयत शिक्षण संस्थेने त्यांना शिक्षणाचा मार्ग दाखवला, त्या संस्थेला त्यांनी स्वतःच्या कमाईतून ११० कोटींहून अधिक रुपयांचे भरीव योगदान दिले; इतकेच नव्हे तर साताऱ्यामधील भव्य संकुलापासून ते मोखाड्यासारख्या अत्यंत दुर्गम व आदिवासी भागात अद्ययावत शिक्षण संकुले उभारून त्यांनी गरीब व आदिवासी मुलांसाठी शिक्षणाची दारे खुली केली.

राजकीय व सामाजिक प्रवासातही त्यांनी आपल्या कार्यशैलीचा वेगळा ठसा उमटवला. कुलबा (सध्याचा

रायगड) लोकसभा मतदारसंघातून दोन वेळा खासदार म्हणून संसदेत नेतृत्व करताना त्यांनी जिल्ह्यातील रस्ते, पिण्याचे पाणी, जेएनपीटी बंदर, विमानतळ प्रकल्प आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी सातत्याने आवाज उठवला. नवी मुंबई, सिडको आणि जेएनपीटी प्रकल्पांसाठी जमिनी दिलेल्या प्रकल्पग्रस्त शेतकरी आणि भूमिपुत्रांना १२.५% विकसित भूखंड, योग्य मोबदला आणि नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळवून देण्यासाठी त्यांनी उभारलेला सनदशीर लढा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला. याशिवाय, आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रीडा संकुले उभारून 'कै. राजीव गांधी सुवर्ण चषक' कबड्डी स्पर्धेतून देशी खेळांना आधुनिक ओळख देणे, आरोग्य शिबिरांचे आयोजन करणे, गरजू रुग्णांना वैयक्तिक निधीतून वैद्यकीय मदत करणे आणि आपत्तीच्या वेळी तातडीने मदत पोहोचवणे यांमुळे ते खऱ्या अर्थाने जनमानसातील 'लोकनेते' बनले. स्वतःच्या यशाचा उपयोग समाजाचे अश्रू पुसण्यासाठी करणाऱ्या रामशेठ ठाकूर यांचे जीवन म्हणजे कष्ट, निष्ठा आणि निरपेक्ष जनसेवेचा एक उत्तम वस्तुपाठ आहे.



महाविद्यालयातील नवीन इमारतीचे उद्घाटन करताना मा. शरदचंद्रजी पवार साहेब, लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, मा.आ. सुनील भुसारा साहेब व मा. प्रकाश निकम साहेब.



महाविद्यालयातील नवीन इमारतीचे उद्घाटन करताना मा. शरदचंद्रजी पवार साहेब, लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब, नामदार रवींद्रजी चव्हाण साहेब.




महाविद्यालयातील कलामंचचे भूमिपूजन करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



महाविद्यालयातील TERI प्रकल्पाची पाहणी करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे ग्रामीण भागातील शिक्षणाचे कार्य व वृक्षप्रेम



प्रा. डॉ. डी. बी. बोरुडे

सहाय्यक प्राध्यापक,
वनस्पतीशास्त्र विभाग

महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि ग्रामीण विकासाच्या इतिहासात लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी आपल्या दूरदृष्टी, समाजसेवेची तळमळ आणि शिक्षणाविषयी असलेल्या निष्ठेच्या बळावर ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणले. शिक्षण हा समाजाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे या विचारावर त्यांचा दृढ विश्वास आहे. त्यामुळे त्यांनी ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे कार्य करत आहे.

ग्रामीण भागातील अनेक मुलांना शिक्षणासाठी शहरांमध्ये जावे लागत असे. आर्थिक अडचणी, वाहतुकीची कमतरता आणि शैक्षणिक सुविधांचा अभाव यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत होते. ही परिस्थिती बदलण्यासाठी लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी ग्रामीण भागात शैक्षणिक कार्य सुरु केले आणि त्यांना सक्षम करण्यास मोलाचे योगदान दिले. गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक सुविधा, सुसज्ज इमारती, प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यांच्या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना आपल्या गावाजवळच दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नैतिक मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेम यांचा विकास व्हावा, यासाठीही त्यांनी सातत्याने प्रोत्साहन दिले. गरीब, होतकरू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक ते सहकार्य मिळावे यासाठी त्यांनी अनेक सामाजिक उपक्रमांना पाठबळ दिले.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे निसर्ग आणि वृक्षांवरील प्रेम. पर्यावरण संवर्धन ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असा त्यांचा ठाम विश्वास आहे. झाडे ही केवळ पर्यावरणाचा नव्हे तर मानवी जीवनाचा श्वास आहेत असे ते नेहमी सांगत आहेत. त्यांच्या प्रेरणेने अनेक शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहिमा राबवल्या. विद्यार्थ्यांनी प्रत्येक वर्षी झाडे लावावीत, त्यांचे संगोपन करावे आणि पर्यावरणाबद्दल जागरूक व्हावे, यासाठी ते सातत्याने प्रेरणा देत असत. त्यांच्या मते, शिक्षण आणि पर्यावरण यांचा परस्परांशी अतूट संबंध आहे. सुशिक्षित समाज्याचे पर्यावरणाचे महत्त्व

समजू शकतो आणि त्याचे जतन करू शकतो असे त्याचे मत आहे.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांनी शिक्षण आणि पर्यावरण या दोन्ही क्षेत्रांमध्ये केलेले कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी उभारलेली शैक्षणिक परंपरा आणि निसर्गसंवर्धनाची मूल्ये आजही अनेकांना समाजकार्यासाठी प्रेरित करतात. त्यांच्या कार्यामुळे असंख्य विद्यार्थी शिक्षित झाले स्वावलंबी बनले आणि समाजाच्या विकासात योगदान देत आहेत. आजच्या काळात त्यांच्या विचारांचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, सामाजिक उत्तरदायित्व आणि पर्यावरण संवर्धन या तीन मूल्यांचा समतोल राखून समाजाचा विकास साधण्याचा संदेश त्यांच्या कार्यातून मिळतो. त्यांच्या कार्याचा आदर्श प्रत्येकाने समोर ठेवून शिक्षणाचा प्रसार, वृक्षसंवर्धन आणि समाजसेवा यासाठी योगदान देणे हेच त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शुभेच्छा ठरेल व मी त्यांच्या उदंड आयुष्यासाठी प्रार्थना करतो.



मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कृतज्ञता सप्ताह अहवाल प्रकाशन करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, मा. चंद्रकांत दळवी साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभानिमित्त मार्गदर्शन करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, मा. चंद्रकांत दळवी साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



वार्षिक पारितोषिक समारंभानिमित्त महाविद्यालयातील प्राध्यापक यांचा सन्मान करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभानिमित्त विद्यार्थ्यांचा सन्मान करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.

युगप्रवर्तक: लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर

परोपकाराय फलन्ति वृक्षाः परोपकाराय वहन्ति नद्यः।
परोपकाराय दुहन्ति गावः परोपकारार्थ मिदं शरीरम्।।

जसे दुसऱ्यांच्या कल्याणासाठी वृक्ष फळे देतात, नद्या वाहतात आणि गायी दूध देतात. तसेच माणसाचे शरीरही परोपकारासाठीच असायला हवे. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे जीवन या श्लोकाचे जिवंत उदाहरण आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक शैक्षणिक, राजकीय आणि सांस्कृतिक पटलावर असे खूप कमी व्यक्ती आहेत, ज्यांनी केवळ पदांमुळे नाही तर स्वतःच्या स्वभावामुळे लोकांच्या मनात हक्काचे स्थान निर्माण केले. आपल्या कर्तृत्वाचा आणि दातृत्वाचा एक अढळ ठसा उमटवणारे जननायक, लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब या मोजक्या व्यक्तींपैकी एक. साहेब आपल्या आयुष्याची ७५ वर्षे पूर्ण करत आहेत. हा केवळ एका नेत्याचा वाढदिवस नाही, तर एका सामान्य कुटुंबातून सुरू झालेल्या आणि लाखो लोकांचे अश्रू पुसणाऱ्या एका कृतार्थ प्रवासाचा, एका अखंड धगधगत्या सेवायज्ञाचा, भूमीपुत्रांच्या लढ्याचा, आणि लाखो गरिबांच्या चेहऱ्यावर हसू आणणाऱ्या दानशूर प्रवासाचा 'अमृत महोत्सव' आहे. जनसामान्यांनी त्यांना दिलेली 'लोकनेते' ही पदवी आणि त्यांच्या सढळ हाताने मदत करण्याच्या वृत्तीमुळे मिळालेली ओळख, साहेबांच्या आयुष्याची खरी कमाई आहे.

मा. रामशेठ ठाकूर साहेबांचा जन्म रायगड जिल्ह्यातील एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात झाला. ग्रामीण भागातील शेती, तिथला संघर्ष, गरिबी आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न त्यांनी अगदी जवळून अनुभवले. लहानपणापासूनच त्यांच्यावर कष्ट आणि



प्रा. डॉ. एन. ए. माधव

सहाय्यक प्राध्यापक,
वनस्पतीशास्त्र विभाग

प्रामाणिकपणाचे संस्कार झाले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा आणि रयत शिक्षण संस्थेचा, त्यांच्या जडणघडणीवर खूप मोठा प्रभाव पडला. गरिबी आणि परिस्थितीशी दोन हात करत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शिक्षणाचे महत्त्व त्यांनी स्वतः अनुभवले होते, म्हणूनच पुढे जाऊन त्यांनी हजारो गरीब, गरजू आणि होतकरू मुलांसाठी शिक्षणाची कवाडे खुली केली. त्यांनी शून्यातून आपले विश्व निर्माण केले, पण हे करत असताना ते आपल्या मातीला आणि माणसांना कधीही विसरले नाहीत.

मा. रामशेठ ठाकूर यांच्या समाजकार्याचा सर्वात मोठा आणि महत्त्वाचा खांब म्हणजे शिक्षण क्षेत्र. "शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे आणि गरिबी निर्मूलनाचे मुख्य शस्त्र आहे," या विचारावर त्यांचा गाढा विश्वास आहे. ज्या रयत शिक्षण संस्थेने त्यांना

घडवले, त्या संस्थेप्रती त्यांनी दाखवलेली कृतज्ञता, भूमीपुत्रांसाठी दिलेला लढा संपूर्ण देशासाठी एक आदर्श वस्तुपाठ आहे. केवळ शहरातच नाही, तर पालघर जिल्ह्यातील मोखाडा सारख्या दुर्गम, आदिवासी भागासाठी आणि तेथील मोडकळीस आलेल्या शाळांच्या दुरुस्ती व महाविद्यालयांच्या बांधकामासाठी त्यांनी निधी देऊन आदिवासी मुलांना हक्काचे शिक्षण मिळवून दिले. आज त्यांच्या या शैक्षणिक संकुलांमधून हजारो तरुण देश-विदेशात उच्च पदांवर कार्यरत आहेत.

मा. ठाकूर साहेबांचे समाजकार्य केवळ एका क्षेत्रापुरते मर्यादित नाही. त्यांच्या विचारांना गती देण्यासाठी स्थापन झालेल्या 'रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'ने समाजकार्याची व्याख्या बदलून टाकली आहे. या मंडळाच्या माध्यमातून समाजघटकातील शेवटच्या माणसापर्यंत मदत पोहोचवली जाते. यात महिला सक्षमीकरण व स्वावलंबन, कला आणि संस्कृतीला राजाश्रय, मोफत वैद्यकीय उपचार आणि शस्त्रक्रिया यांसारख्या असंख्य मदतीचे हात साहेब पुरवत आहेत, त्याच बरोबर प्रकल्पग्रस्त तरुणांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळावे आणि ते बेरोजगार राहू नयेत म्हणून त्यांनी कौशल्याधारित प्रशिक्षण केंद्र सुरू केली आहेत.

साहेब ७५ व्या वर्षात पदार्पण करत असतानाही त्यांचा उत्साह, त्यांची काम करण्याची पद्धत आणि जनसामान्यांशी असलेली नाळ एखाद्या तरुणालाही लाजवेल अशी आहे. पहाटेपासून सुरू होणारा त्यांचा दिनक्रम आणि रात्री उशिरापर्यंत चालणारा लोकदरबार, हे त्यांच्यातील अफाट ऊर्जेचे प्रतीक आहे. ते नेहमी तरुणांना सांगतात: "शून्यातून विश्व निर्माण करण्याची जिद्द ठेवा, कष्ट करायला घाबरू नका, आणि जेव्हा तुम्ही यशस्वी व्हाल, तेव्हा समाजाचे ऋण फेडायला कधीही विसरू नका." त्यांचा हाच विचार आजच्या तरुण पिढीसाठी सर्वात मोठी प्रेरणा आहे.

आज त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करत आहे. रामशेठ ठाकूर साहेब हे केवळ एका व्यक्तीचे नाव नाही, तर ते एक जिवंत विद्यापीठ आहेत, एक विचार आहेत आणि महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा बुलंद आवाज आहेत. त्यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने आपण सर्वांनी त्यांच्या दातृत्वाचा, कष्टाचा आणि समाजसेवेचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला पाहिजे. लोकनेते आदरणीय रामशेठ ठाकूर साहेब यांना ७५ व्या वाढदिवसाच्या आणि अमृत महोत्सवाच्या कोटी कोटी शुभेच्छा! त्यांना दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि निरोगी जीवन लाभो, हीच ईश्वर चरणी प्रार्थना!



महाविद्यालयातील कलामंच उद्घाटन प्रसंगी लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, मा. चंद्रकांत दळवी साहेब, ॲड. भगीरथ शिंदे साहेब व सेवक वर्ग.



महाविद्यालयाची नवीन सुसज्ज प्रशासकीय इमारत.

सर्वसामान्यांचे 'आधारवड' लोकनेते रामशेठ ठाकूर



प्रा. बी. एस. बांगर

सहाय्यक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग

महाराष्ट्र ही गौरवशाली पुरोगामित्वाची भूमी राहिलेली आहे. राज्याच्या सामाजिक, राजकीय वाटचालीत याचा प्रभाव असलेला दिसून येतो. अनेक संत,महापुरुषांच्या समता,बंधुता,न्याय तत्वांचा व विचारांचा प्रभाव समाजावर झालेला आहे. त्यात संत ज्ञानेश्वरांपासून छत्रपती शिवाजी महाराजापर्यंत व आधुनिक समाजसुधारक महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश होतो. यानंतर शिक्षण या क्षेत्रातील आधुनिक भगीरथ कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वारसा पुढे चालू ठेवण्याचे काम लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब हे परोपकारी व दानशूर व्यक्तिमत्व करत आहे. त्यांना महाराष्ट्रातील शिक्षण, समाजकारण आणि लोककल्याण या क्षेत्रात कार्यरत असलेले एक दूरदर्शी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या कार्यातून समाजसेवा, शिक्षणाचा प्रसार, आदिवासी विकास, आरोग्य सेवा आणि जनकल्याण या क्षेत्रांना नवी दिशा दिली आहे.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचा जन्म २ जून १९५१ मध्ये पनवेल तालुक्यातील नाव्हाखाडी येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातीलच प्राथमिक विद्यालयात झाले. रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील विद्यालयात त्यांनी 'कमवा आणि शिका' या तत्त्वाने आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांनी तेथील शिक्षणाची जाण ठेवत रयत शिक्षण संस्थेच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने मदतीचा हात देऊ केला आहे. "आयुष्याची सुरुवात शिक्षक म्हणून करणारा हा माणूस रयत शिक्षण संस्थेत (कमवा आणि शिका) या योजनेतून पदवीधर झाला ते साल १९७२. पुढच्या वर्षी बी .एड. पूर्ण केले. त्यानंतर पनवेलमध्ये प्रसिद्ध असलेल्या 'विठोबा खंडप्पा' या माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून सुरुवात केलेल्या रामशेठ ठाकूर यांनी १९७६ साली आपल्या जीवनाचा सांधा बदलला" आणि आपला नवीन व्यवसाय सुरु केला व तो पुढे यशस्वीही करून दाखविला. शिक्षक म्हणून अवघ्या २०० रुपयांच्या पगारावर कारकीर्द सुरू करून त्यांनी उद्योग, समाजकारण आणि शिक्षण या क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळवले. त्यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या माध्यमातून अनेक शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्था उभारल्या. आधुनिक शिक्षण प्रणालीचे प्रणेते बनण्याच्या प्रबळ दूरदृष्टी आणि ध्यासाने संस्थेने १९ संस्थांची स्थापना केली आहे. या सर्व संस्था अत्याधुनिक असून, त्यांच्या सुविधा व पायाभूत संरचनांचा सतत विस्तार होत आहे. या संस्थांमध्ये आज मितीस १७००० हून

अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.आणि या शिक्षण संस्थामधून लाखो विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडलेले आहेत.

शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची सर्वोच्च नोंद म्हणजे रयत शिक्षण संस्थेला दिलेले १३५ कोटींपेक्षा अधिक आर्थिक सहाय्य होय. या योगदानामुळे त्यांनी रयत शिक्षण संस्थेप्रती गुरुदक्षिणेचा एक आदर्श निर्माण केलेला आहे. सामाजिक बांधिलकी, दूरदृष्टी, सकारात्मक विचारसरणी, कठोर परिश्रम घेण्याची तयारी, प्रामाणिकपणा, अचूक निर्णयक्षमता, कर्तव्यनिष्ठा, श्रद्धा या गुणांमुळे ठाकूर साहेबांनी समाज जीवनातील यशाची अनेक शिखरे पादाक्रांत केली आहेत.

जागतिकीकरणामुळे समाजात बरेच बदल घडत आहेत. तरुण पिढी समाजात आपले अस्तित्व आणि ओळख निर्माण करण्यासाठी संघर्ष करत आहे.त्यात आदिवासी विद्यार्थीही टिकून राहावा यासाठी त्यांनी मोखाडा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शैक्षणिक संकुलाची उभारणी त्यांनी केली. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या या संकुलासाठी त्यांनी तब्बल सात कोटी रुपयांची देणगी दिली.या महाविद्यालयात जवळजवळ ९९% आदिवासी विद्यार्थी प्रवेशित असतात. अश्या दुर्गम, आदिवासी आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, हा त्यांच्या कार्यामागील मुख्य उद्देश आहे.यासाठी ते सतत प्रयत्नशील आहेत. यातून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षण चळवळीचा वारसा पुढे नेण्याचे रामशेठ ठाकूर यांचे योगदान अधोरेखित करते.

या महाविद्यालयात आज आधुनिक पायाभूत सुविधा व तंत्रज्ञानासह विद्यार्थी शिक्षण घेतात. मोखाड्यासारख्या दुर्गम भागात वारंवार भेटी देऊन त्यांनी शैक्षणिक संकुलाच्या उभारणीवर स्वतः लक्ष ठेवले. त्यामुळेच मा.शरद पवार साहेब यांनी त्यांच्या दानशूर वृत्तीचे विशेष कौतुक करत त्यांना "दानशेठ" अशी उपमा दिली आहे. तसेच त्यांच्या योगदानामुळे मोखाडा येथील महाविद्यालयाच्या विकासाला नवे परिमाण प्राप्त झाले.उत्तर पालघर जिल्ह्यातील एक नामाकीत महाविदयालय म्हणून नावारूपाला येत आहे. आधुनिक पायाभूत सुविधा, आर्थिक सहकार्य, गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम आणि सामाजिक बांधिलकी यांमुळे हे महाविद्यालय आदिवासी शिक्षणाचे आदर्श केंद्र म्हणून विकसित होत आहे. शिक्षणाद्वारे सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची त्यांची दूरदृष्टी, आदिवासी समाजाबद्दलची बांधिलकी आणि संस्थात्मक विकासासाठी केलेले योगदान यामुळे त्यांचे कार्य प्रेरणादायी ठरते.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांनी समाजसेवेचा आणि लोककल्याणकारी कार्याचा कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वसा आयुष्यभर जपलेला दिसून येतो. कोरोना महामारीच्या काळात रायगड जिल्ह्यात लॉकडाऊनमुळे अडचणीत सापडलेल्या स्थलांतरित कामगार, शेतकरी, मजूर, पत्रकार, छोटे व्यावसायिक, रिक्षाचालक, टॅक्सीचालक, आणि गरजू कुटुंबांना अन्नधान्य, भोजन, औषधे व इतर जीवनावश्यक वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर वितरण केले. पनवेल येथील रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून हजारो नागरिकांना अन्नधान्य आणि दररोज हजारो नागरिकांना मोफत भोजन उपलब्ध करून दिले. आरोग्य क्षेत्रात पीपीई किट, वैद्यकीय साहित्य, रक्तदान शिबिरे, मास्क वितरण आणि रुग्णालयांना आर्थिक मदत अशा विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली. यातून सेवाभाव, मानवतावादी दृष्टिकोन आणि संकटात सामान्य जनतेच्या पाठीशी उभे राहण्याची वृत्ती साहेबांची दिसून येते व त्यामुळे ते केवळ राजकीय नेते नसून लोकहितासाठी आयुष्य समर्पित करणारे समाजसेवक म्हणून उभे राहतात. म्हणून त्याच्या बाबतीत म्हटले जाते "सतत लोकांना मदत करणे हा रामशेठ ठाकूर यांचा पिंड आहे, त्यामुळे ते खऱ्या अर्थाने सर्व समाजाचे आधारवड आहेत"

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : शैक्षणिक क्षेत्रातील आधारस्तंभ



प्रा. दिलीप पागी

सहाय्यक प्राध्यापक,
भौतिकशास्त्र विभाग

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात काही व्यक्तिमत्त्वे आपल्या कार्यामुळे अजरामर होतात. लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण, सेवा आणि विकास या मार्गांचा स्वीकार करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे लोकनेते मा. रामशेठ ठाकूर. त्यांनी राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात केलेले कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी आहे.त्यांच्या कार्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे रयत शिक्षण संस्थेशी असलेले योगदान आणि शैक्षणिक विकासासाठी केलेले प्रयत्न. शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांना संधी मिळावी, हा विचार त्यांनी नेहमी पुढे ठेवला.

रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील एक अग्रगण्य शैक्षणिक संस्था आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी "बहुजन हिताय, बहुजन सुखाय" या विचारातून या संस्थेची स्थापना केली. ग्रामीण भागातील गरीब, शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली करणे हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट राहिले आहे.या महान शैक्षणिक चळवळीला पुढे नेण्यासाठी लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, या विचारातून त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्याला सहकार्य केले.रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात अनेक शाळा आणि महाविद्यालये कार्यरत आहेत. या संस्थेच्या विकासासाठी रामशेठ ठाकूर यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा, चांगले शैक्षणिक वातावरण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळणे आवश्यक आहे, या उद्देशाने त्यांनी शिक्षण क्षेत्राला प्राधान्य दिले.

पालघर जिल्ह्यातील लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र आहे. या महाविद्यालयाच्या विकासामध्ये रामशेठ ठाकूर यांचे योगदान उल्लेखनीय आहे. दुर्गम आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या गावाजवळ उच्च शिक्षण मिळावे, त्यांना शहरातील विद्यार्थ्यांप्रमाणे संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने अशा शैक्षणिक संस्थांना प्रोत्साहन देण्यात आले.या महाविद्यालयातून अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत आपले योगदान देत आहेत. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून

समाज विकासाचे कार्य पुढे जात आहे.

मा.रामशेठ ठाकूर यांचा नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर राहिला आहे. शिक्षणासोबत विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, सामाजिक जाणीव, नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास निर्माण होणे आवश्यक आहे, असा त्यांचा दृष्टिकोन आहे.रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता जीवनासाठी आवश्यक मूल्ये देण्याचे कार्य केले जाते. या विचारांना रामशेठ ठाकूर यांनी पाठिंबा दिला. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी, सुविधांचा अभाव आणि योग्य मार्गदर्शनाची कमतरता यामुळे उच्च शिक्षण घेणे कठीण जाते. ही समस्या लक्षात घेऊन शिक्षणाच्या प्रसाराला त्यांनी महत्त्व दिले. शिक्षणामुळे व्यक्ती सक्षम होते, कुटुंबाची प्रगती होते आणि समाजाचा विकास होतो, या विश्वासातून त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात योगदान दिले.



कृत्रिम बुद्धिमत्ता लॅब (AI) उद्घाटन प्रसंगी तारपा नृत्य पाहताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, मा. चंद्रकांत दळवी साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित कार्यक्रम प्रसंगी वृक्षारोपण करताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब व प्राचार्य डॉ. एल. डी. भोर.



कृत्रिम बुद्धिमत्ता लॅब (AI) ची पाहणी करुन माहिती घेताना लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब, मा. चंद्रकांत दळवी साहेब व ॲड. भगीरथ शिंदे साहेब.



महाविद्यालयाची नवीन सुसज्ज व प्रशस्त इमारत.

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर : जनसेवा, शिक्षण आणि मानवतेचा दीपस्तंभ



प्रा. डी. टी. सावंत

सहाय्यक प्राध्यापक,
इतिहास विभाग

रामशेठ ठाकूर हे संपूर्ण महाराष्ट्रात एक परोपकारी आणि दानशूर व्यक्तिमत्व म्हणून प्रसिद्ध तसेच लोकप्रिय आहेत. हा परोपकार त्यांच्या सर्व सामाजिक आणि राजकीय विचारधारेत दिसून येतो. माजी खासदार माननीय श्री रामशेठ ठाकूर यांच्या दूरदर्शी आणि प्रेरणादायी विचारांमुळे, करिष्माई नेते, पनवेलचे आमदार आणि सिडकोचे अध्यक्ष माननीय श्री प्रशांत ठाकूर यांनी १९९६ मध्ये श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाची स्थापना केली. पनवेलला स्मार्ट सिटीमध्ये रूपांतरित करण्यासाठी तसेच रायगडच्या लोकांच्या विकासासाठी याची विशेष स्थापना करण्यात आली आहे.

जागतिकीकरणामुळे समाजात बरेच बदल घडत आहेत. तरुण पिढी समाजात आपले अस्तित्व आणि ओळख निर्माण करण्यासाठी संघर्ष करत आहे. तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत आणि ते अस्वस्थ दिसत आहेत. त्यामुळे माननीय श्री प्रशांत ठाकूर यांनी तरुणांची ही अस्वस्थता लक्षात घेऊन मंडळाची उद्दिष्टये निश्चित केली आहेत. त्यांनी सर्व योजना आणि कार्यक्रमांना बारकाईने मार्गदर्शन आणि पाठिंबा दिला आहे. मंडळाच्या सर्व उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने त्यांनी समर्पित आणि दृढनिश्चयी कार्यकर्त्यांचा एक मजबूत संघ तयार केला आहे.आज, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाची कीर्ती केवळ सदस्यांच्या सामर्थ्यामुळे आणि सर्व उपक्रमांमधील त्यांच्या प्रामाणिक योगदानामुळे राष्ट्रीय स्तरावर पोहोचली आहे. मंडळाच्या या उल्लेखनीय यशाचे विविध स्तरांतील प्रतिष्ठित लोकांकडून खूप कौतुक केले जाते. परिणामी, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या कार्यकर्त्यांना प्रचंड आनंद आणि समाधानाचा अनुभव येतो. मंडळाच्या विविध उपक्रमांमुळे विशेषतः रायगडातील वंचित आणि दुर्बळ लोकांच्या मनात खूप आनंद आणि समाधान आले आहे. मंडळाने लोकांच्या आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कार्यक्रम प्रभावीपणे आणि यशस्वीपणे राबवले आहेत. मंडळाने आपल्या कार्याची सुरुवात विशेषतः पनवेल आणि परिसरातील विद्यार्थी समुदायावर मुख्य लक्ष केंद्रित करून केली.

प्रत्येक विद्यार्थ्याला समाजाचा सुधारक मानले जाते. त्याला बदलत्या समाजाचा आरसा म्हणूनही ओळखले जाते. सर्व विद्यार्थ्यांना समाजाचे भावी आधारस्तंभ मानले जाते. विद्यार्थ्यांची महत्त्वपूर्ण

भूमिका लक्षात घेऊन, मंडळाने पनवेल आणि उरण येथील प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा योजना सुरू केली आणि ती यशस्वीपणे राबवली. स्पर्धा परीक्षा योजनेच्या माध्यमातून मंडळाने विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. ग्रामीण विद्यार्थ्यांना शहरी विद्यार्थ्यांच्या बरोबरीने आणण्यासाठी मंडळाने परिसरात स्पर्धा परीक्षांविषयी विशेष प्रशिक्षण शिबिरेही आयोजित केली. त्यामुळे विविध शाळा आणि महाविद्यालयांमधील गुणवंत विद्यार्थी हे ग्रामीण भागातील आहेत आणि याचे श्रेय रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाला जाते.मंडळाने गरजू आणि गरीब विद्यार्थ्यांना केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत केली आहे. मंडळाने विशेषतः नवी मुंबई आणि रायगड येथील गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २० लाख रुपये दिले आहेत.जर विद्यार्थ्यांना वह्या आणि गणवेश खरेदी करणे शक्य होत नसेल, तर मंडळ गेल्या अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांना वह्या आणि गणवेश विनामूल्य वितरित करत आहे. दरवर्षी मंडळ ५०,००० विद्यार्थ्यांना वह्या आणि गणवेश वितरित करते. या उपक्रमासाठी मंडळ अंदाजे १० लाख रुपये खर्च करते.

माननीय रामशेठ ठाकूर सामाजिक कल्याण मंडळाने दिलेली मदत अत्यंत महत्त्वाची आहे. पूरस्थितीत संपूर्ण पनवेल शहर अक्षरशः पाण्याखाली असताना, मंडळाच्या स्वयंसेवकांनी अत्याधुनिक यंत्रसामग्री वापरून ते स्वच्छ केले. पूरस्थितीनंतर एका आठवड्यासाठी पनवेलच्या नागरिकांना उदारपणे योग्य अन्न आणि निर्जंतुक पाणी पुरवण्यात आले. रोगराई आणि साथीच्या रोगांपासून बचाव करण्याच्या दृष्टीने श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आणि लसीकरण शिबिरे आयोजित केली होती. श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने सुरुवातीचे दोन दिवस विस्थापित पनवेलवासीयांना अग्रगण्य मदत केली. पूरग्रस्तांना मिळणाऱ्या सरकारी मदतीचा पाठपुरावा त्यांनी काटेकोरपणे केला. आपत्तीनंतर तिसऱ्या दिवसापासूनच पूरग्रस्तांना सरकारकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीच्या वितरणातही मंडळाने महत्त्वाची भूमिका बजावली. मंडळाने आपल्या अविरत सेवेने मोठा आदर मिळवला आहे आणि पनवेलच्या नागरिकांच्या हृदयात एक विशेष स्थान निर्माण केले आहे.

सामाजिक कल्याण आणि सेवा क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानांव्यतिरिक्त, मंडळाने क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मंडळ अस्सल भारतीय खेळांना पुनरुज्जीवित करण्यासाठी प्रयत्नशील आहे, याचाच एक भाग म्हणून मंडळ जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर कबड्डी स्पर्धांचे मोठ्या थाटामाटाने आयोजन करते. विजेत्यांना दिली जाणारी मोठी बक्षिसे खरोखरच कौतुकास्पद आहेत, जसे की "स्वर्गीय राजीव गांधी सुवर्ण चषक" कबड्डी स्पर्धा. भारताचे दिवंगत पंतप्रधान श्री राजीव गांधी यांच्या नावाने स्थापित हा भारतातील कबड्डीप्रेमींसाठी एक आवडता आणि बहुप्रतिक्षित कार्यक्रम आहे. दरवर्षी देशभरातील कबड्डी संघ या भव्य कार्यक्रमात सहभागी होतात आणि आपले कौशल्य सादर करतात. श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने या संदर्भात एक मोठे पाऊल पुढे टाकले असून, उल्वा नोड, सेक्टर-१६/ए येथे १० एकरचा एक प्रशस्त भूखंड खरेदी केला आहे. श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, माजी खासदार आणि जनसामान्यांचे नेते माननीय श्री रामशेठ ठाकूर यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली एक आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल उभारले आहे. सर्व अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेले एक अत्याधुनिक स्टेडियम २५ कोटींच्या बजेटमध्ये बांधण्यात आले आहे. रामशेठ ठाकूर क्रीडा अकादमी हा मंडळाचा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे, जो क्रीडा क्षेत्रात विशेषज्ञ असून खेळांना प्रोत्साहन देण्याचे काम करतो. यासाठी सिडकोकडून एक भूखंडही मिळाला आहे. ही अकादमी सर्व खेळाडूंना त्यांची स्वप्ने साकार करण्यासाठी एक योग्य व्यासपीठ ठरेल.हे मंडळ संपूर्ण रायगड जिल्ह्यात विविध उपक्रम राबवते, परंतु त्याच वेळी स्थानिक सांस्कृतिक आदिवासींचाही नेहमीच

विशेष विचार केला जातो. पनवेलमध्ये स्थायिक होणाऱ्या नागरिकांना स्थानिक संस्कृतीची जाणीव करून देण्यासाठी मंडळ दरवर्षी कृषी-कोळी महोत्सव, संगीत भजन स्पर्धा आणि स्थानिक लोकनृत्य स्पर्धांचे आयोजन करते.या सांस्कृतिक महोत्सवांना केवळ आगरी-कोळी समाजच नव्हे, तर विविध समाज आणि संस्कृतींमधील लोक मोठ्या संख्येने भेट देतात आणि त्याचा आनंद घेतात. संगीतातील उत्कृष्टतेला समोर आणण्याचा प्रयत्न करणारे हे सांस्कृतिक महोत्सव, खरोखरच बहु-संस्कृतींचे प्रवेशद्वार आहेत.

पनवेलमध्ये आयोजित होणाऱ्या 'मल्हार महोत्सवा'चे ध्येय रायगड जिल्ह्यातील नागरिकांचा सर्वांगीण विकास हे आहे. 'मल्हार महोत्सवा'दरम्यान असंख्य कला, सांस्कृतिक आणि क्रीडा कार्यक्रम व स्पर्धा आयोजित केल्या जातात. कला आणि संस्कृती क्षेत्रातील विविध स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, मॅरेथॉन स्पर्धा, ज्या जनजागृतीचा संदेश देतात, ही पर्यटकांसाठी प्रमुख आकर्षणे आहेत. अशा कार्यक्रमांमधील सहभागाचा दर नेहमीच जास्त असतो. त्याचबरोबर, या कार्यक्रमांना लोकांकडून मोठ्या आवडीने आणि उत्साहाने प्रतिसाद मिळतो. या कार्यक्रमांमधील प्रेक्षक आणि सहभागींची वाढती संख्या हे या कार्यक्रमांच्या प्रचंड यशाचे स्पष्ट पुरावे आहेत.

मंडळाने ग्रामीण आणि शहरी भागांतील महिलांच्या विकासाला आणि सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी विविध बचत गट स्थापन केले आहेत. मंडळ महिलांना बचतीच्या विविध मार्गांविषयी आणि साधनांविषयी जागरूक करत असते. त्याचबरोबर, ते महिलांना त्यांच्यासाठी असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देत असते. मंडळाने सुशिक्षित, बेरोजगार तरुणांसाठी 'स्वयं रोजगार मार्गदर्शन केंद्र' देखील स्थापन केले आहे. हे केंद्र बेरोजगार सुशिक्षित तरुणांना शासनाकडून आर्थिक सहाय्य देणे, व्यवसायाशी संबंधित माहिती देणे, त्यांच्यासाठी संबंधित प्रस्ताव तयार करणे इत्यादी अनेक मार्गांनी मदत करते.

मंडळाच्या विविध उपक्रमांची केंद्र सरकारकडून यथोचित दखल घेतली गेली आहे. मानव संसाधन आणि विकास मंत्रालयाच्या नेहरू युवा केंद्राने रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंचाला 'सर्वोत्कृष्ट युवा मंडळ' म्हणून सन्मानित केले आहे. मंडळाचे अध्यक्ष माननीय श्री प्रशांत ठाकूर हे "सर्वोत्कृष्ट युवक" पुरस्काराचे मानकरी आहेत.कला, संस्कृती, क्रीडा, समाजकार्य इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारे "श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ" ही खरोखरच समाजकल्याणासाठी अविरतपणे झटणारी एक अग्रगण्य चळवळ आहे. ही एक समर्पित, विकसित आणि शिस्तबद्ध संस्था असून, ती अचूक नियोजन, शिस्त आणि कुशल प्रयत्नांच्या जोरावर निश्चितपणे यशस्वीपणे पुढे वाटचाल करेल. या युगपुरुषास अमृत महोत्सवानिमित्त मनपूर्वक शुभेच्छा!



महाविद्यालयातील विज्ञान विभाग बी.एस्सी. तृतीय वर्षाच्या (२०२५-२६) विद्यार्थ्यांसोबत लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब.



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाची निमंत्रण पत्रिका लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांना देतांना प्र.प्राचार्य ए. एन. चांदोरे व प्राध्यापक.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या दूरदृष्टीतून साकारलेला परिवर्तनाचा प्रेरणादायी प्रवास



प्रा. व्ही. पी. बोबे

सहाय्यक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग

"शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी चळवळ आहे. समाजाच्या विकासाचा पाया शिक्षणात असतो आणि त्या पायाला बळकटी देणाऱ्या संस्था व दूरदृष्टी असलेले नेतृत्व इतिहास घडवतो." "लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय मोखाडा" या महाविद्यालयाचा प्रवास हा अशाच इतिहासाचा साक्षीदार आहे. महाराष्ट्रातील आदिवासी, ग्रामीण, सर्वसामान्य आणि वंचित समाजापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे महान कार्य करणाऱ्या रयत शिक्षण संस्थेने सन १९८४ मध्ये लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय मोखाडा, या महाविद्यालयाची स्थापना केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या "कमवा आणि शिका" या महान विचारसरणीचा वारसा जपत या महाविद्यालयाने १९८४ पासुन मोखाडा तालुक्यासह पालघर जिल्ह्यातील ग्रामीण आणि आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत त्यांच्या जीवनाला नवी दिशा देण्याचे कार्य या महाविद्यालयाने सातत्याने केले आहे.

मी स्वतः या महाविद्यालयाचा २०२३ पूर्वीचा काळ जवळून अनुभवला आहे. त्या वेळी महाविद्यालयात एक साधी इमारत, मर्यादित वर्गखोल्या आणि मोजक्या सुविधा होत्या. आधुनिक साधनसामग्री नसली तरी शिक्षणाची गुणवत्ता, शिक्षकांची चिकाटी आणि विद्यार्थ्यांची जिद्द यांमध्ये कोणतीही कमतरता नव्हती. प्राचार्य, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी निष्ठेने कार्य करत होते. ग्रामीण आणि आदिवासी भागातील अनेक विद्यार्थ्यांसाठी हे महाविद्यालय आशेचा किरण होते. या महाविद्यालयाने हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी देऊन त्यांचे भविष्य घडवले.

सन २०२३ नंतर मात्र महाविद्यालयाच्या इतिहासात एक नवे पर्व सुरू झाले. "लोकनेते मा. रामशेठ ठाकूर" साहेबांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे महाविद्यालयाला नवीन, भव्य, प्रशस्त आणि आधुनिक इमारत लाभली. या विकासामुळे महाविद्यालयाचा चेहरामोहराच बदलून गेला. आधुनिक वर्गखोल्या, सुसज्ज प्रयोगशाळा, डिजिटल शिक्षण व्यवस्था, AI प्रयोगशाळा, प्रशस्त ग्रंथालय, आकर्षक परिसर आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या विविध आधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या. महाविद्यालयाचा विकास हा केवळ पायाभूत सुविधांपुरता मर्यादित राहिला नाही, तर शैक्षणिक

गुणवत्ता, संशोधन, कौशल्य विकास आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासालाही नवी दिशा मिळाली.

आज "लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा" या महाविद्यालयाला नॅक मूल्यांकनामध्ये A+ ग्रेड मिळाली असून, सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार मुंबई विद्यापीठा कडून प्राप्त झाला आहे, या महाविद्यालया मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-२०२०) नुसार आधुनिक शिक्षण देणारे, गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण निर्माण करणारे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य करणारे महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. महाविद्यालयात कौशल्य विकास, संशोधन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम, पर्यावरण संवर्धन, महानव्यक्तींच्या जयंती, संविधान जागरूकता, सामाजिक उत्तरदायित्व आणि विविध विद्यार्थी विकास उपक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. त्यामुळे हे महाविद्यालय केवळ पदवी प्रदान करणारी संस्था नसून जबाबदार, सुशिक्षित आणि सुसंस्कृत नागरिक घडविणारे प्रेरणास्थान बनले आहे.

या परिवर्तनामागे "लोकनेते मा. रामशेठ ठाकूर" साहेबांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी शिक्षणाला समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानत ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनाही शहरांप्रमाणे आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, हा ध्यास घेतला. त्यांच्या दूरदृष्टीमुळे महाविद्यालयाला आधुनिक पायाभूत सुविधा, नवीन संधी आणि विकासाची नवी दिशा मिळाली. त्यांनी केवळ भव्य इमारत उभारली नाही, तर विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आत्मविश्वास, संधी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा मजबूत पाया निर्माण केला. आज महाविद्यालयातील प्रत्येक विकासकाम, प्रत्येक शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या यशामध्ये त्यांच्या दूरदृष्टीचा आणि शिक्षणावरील निष्ठेचा ठसा स्पष्टपणे दिसून येतो.

महाविद्यालयातून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज उच्च शिक्षण, संशोधन, स्पर्धा परीक्षा, उद्योग, प्रशासन, सामाजिक कार्य आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करत आहेत. महाविद्यालयामार्फत वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, संविधान जागरूकता, आरोग्य जनजागृती, रक्तदान शिबिरे, महिला सक्षमीकरण आणि विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जात असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवा, नेतृत्वगुण आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ होत आहे. मी २०२३ पूर्वीचे आणि आजचे मोखाडा कॉलेज प्रत्यक्ष पाहिले आहे. त्यामुळे या परिवर्तनाचा मी साक्षीदार आहे. पूर्वीच्या साध्या वातावरणापासून आजच्या आधुनिक आणि भव्य परिसरापर्यंतचा प्रवास पाहताना मन अभिमानाने भरून येते. हा बदल केवळ इमारतींचा नाही; तो विचारांचा, गुणवत्तेचा, संधींचा आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचा आहे. या परिवर्तनामागे "रयत शिक्षण संस्थेची शिक्षणसेवेची परंपरा आणि लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेबांचे दूरदर्शी नेतृत्व हेच प्रमुख आधारस्तंभ आहेत"

मी बघितलेलं मोखाडा कॉलेज आणि लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी घडवलेलं सध्याचं मोखाडा कॉलेज" हा केवळ एका महाविद्यालयाच्या विकासाचा इतिहास नाही, तर ग्रामीण आणि आदिवासी विद्यार्थ्यांच्या आयुष्यात घडलेल्या सकारात्मक परिवर्तनाची प्रेरणादायी गाथा आहे. "रयत शिक्षण संस्थेने सन १९८४ मध्ये पेरलेले शिक्षणाचे बीज आज लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेबांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे विशाल वटवृक्षात रूपांतरित झाले आहे". आज हे महाविद्यालय ज्ञान, संस्कार, गुणवत्ता, सामाजिक बांधिलकी आणि आधुनिक शिक्षण यांचा सुंदर संगम बनले असून भविष्यातही हजारो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देत राहील, याबद्दल कोणतीही शंका नाही."इमारती दगड-विटांनी उभ्या राहतात; परंतु संस्थेचे खरे वैभव त्या संस्थेतून घडणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये असते. मोखाडा महाविद्यालयाने हे वैभव जपले आहे आणि लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेबांच्या नेतृत्वामुळे ते अधिक समृद्ध झाले आहे."

●●●

शिक्षण, संस्कार आणि मानवसेवेचे युगपुरुष: लोकनेते मा. रामशेठ ठाकूर



प्रा. आर.डी. घाटाळ

सहाय्यक प्राध्यापक,
मराठी विभाग

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सन १९८४ मध्ये मोखाडा येथे कला, वाणिज्य महाविद्यालयची स्थापना केली. या परिसरातील विद्यार्थ्यांची विज्ञान अभ्यासाची गरज पूर्ण करण्यसाठी संस्थेने सन २०१३ साली याच महाविद्यालयात विज्ञान शाखा सुरु केली. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, भारतरत्न आंबेडकर, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श घेऊन मा. श्री. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कार्यरत आहेत. त्यांचा माणसांवर अधिक विश्वास आहे. माणुसकी व कर्तव्याची जाण ठेवून मा. श्री. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी त्यांच्याजवळ असलेली आर्थिक शक्ती लोककल्याणासाठी सार्थकी लावण्याचे ठरविले आणि त्यांनी तसे केले आणि आताही करीत आहेत. मा. श्री. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी आपले संपूर्ण आयुष्य लोकसेवा, शिक्षण, समाजकारण आणि जनकल्याणासाठी समर्पित केले आहे. मा. श्री. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर हे शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय या क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणारे दूरदृष्टीचे नेते म्हणून ओळखले जातात. विशेषतः ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली करण्याचे त्यांचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

आज नव्या पिढीला खरे वाटणार नाही की, आयुष्याची सुरुवात शिक्षक म्हणून करणारा हा माणूस रयत शिक्षण संस्थेत (कमवा आणि शिका) या योजनेतून पदवीधर झाला ते साल १९७२ . पुढील वर्षी बी.एड. पूर्ण केले. पनवेलमध्ये प्रसिद्ध असलेल्या 'विठोबा खंडप्पा' या माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून सुरुवात केलेल्या मा. श्री. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांनी सन १९७६ साली छोट्या व्यवसायातून ते आज 'रामशेठ' झाले. पण त्यांचे सगळ्यात मोठे काम त्यांनी व्यावसायिक म्हणून जे काही केले असेल, त्याहीपेक्षा आपण शिक्षक होतो हे न विसरता त्यांनी उभी केलेली शैक्षणिक संकुले तसेच शिक्षण संस्थांचे मोठे जाळे त्यांनी उभे केले आहे. अनेक संस्था उभारताना रामशेठ यांनी शिक्षण संस्थेचा दर्जा, पावित्र्य आणि आर्थिक शिस्त सर्व काही सांभाळले आहे. पण आज मा. श्री. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर हे नाव महाराष्ट्रभर झाले, ते त्यांनी शिक्षणामध्ये स्वत:ला झोकून देऊन जे काही काम उभे करून ठेवले, त्यामुळे झाले आहे. मला वाटते की, रयत शिक्षण संस्थेचे लाखो विद्यार्थी असतील, ते त्यांच्या कर्तृत्वाने मोठेही झाले असतील, आर्थिकदृष्ट्या संपन्नही असतील. पण रामशेठ वेगळे

आहेत. हा एकमेव माजी विद्यार्थी आहे. त्यांनी संस्थेसाठी कोट्यावधी रुपये खर्च केले आहेत.

मोखाडा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या उभारणीत आणि विकासात त्यांचा मोलाचा वाटा असून मोखाडा येथील नवीन इमारतीचे बांधकाम मा. श्री. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेबांच्या पदस्पर्शाने पूर्ण झाले आहे. त्यामुळे त्यांना या महाविद्यालयाचे "आधारस्तंभ" म्हणणे योग्य ठरेल. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षात मा. श्री. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा उद्घाटन व नामकरण समारंभ शनिवार दि. ०८ एप्रिल २०२३ रोजी संपन्न झाला. उद्घाटन मा. खा. शरदचंद्रजी पवार (अध्यक्ष र. शि. संस्था, सातारा) यांच्या शुभहस्ते तर नामकरण मा. दिलीपरावजी वळसे पाटील (माजी गृहमंत्री (महाराष्ट्र राज्य) सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा) यांच्या शुभहस्ते झाले. तेव्हा मा. श्री. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब यांना अगदी जवळून बघता आले. त्यांच्यामधील दातृत्व, सामाजिक बांधीलकी, शिक्षण क्षेत्रातील दूरदृष्टी, साधेपणा व वक्तशीरपणा या मुख्य गुण वैशिष्ट्यांची ओळख झाली. तसेच जिद्द, चिकाटी, प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम घेण्याची तयारी या गुणांचे बाळकडू त्यांना लहान वयातच आई-बाबांकडून मिळाले असावेत. पनवेल पासून साधारणतः १७० किमी अंतरावर असलेला मोखाडा या ठिकाणी वर्षातून दोन वेळा तरी भेट देणार. महाविद्यालयची काय वाटचाल सुरु आहे याची चौकशी करणारे, काही आर्थिक अडचणी असल्यास आर्थिक सहाय्य करणारे दानशूर व्यक्ती या व्यक्तीमुळे आज मोखाडा महाविद्यालयाचा कायापालट झालेलेला आहे. साहेब नेहमी म्हणतं की या महाविद्यालयासाठी जे जे लागेल ते मी द्यायला तयार आहे. पण येथील विद्यार्थी मागे पडता कामा नये. त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयात विज्ञान शाखेतील प्रत्येक विभागासाठी स्वातंत्र्य प्रयोगशाळा, सर्व विभागासाठी स्वातंत्र्य केबिन, ग्रंथालय, प्रत्येक वर्गासाठी इन्ट्रॅक्टिव्ह पॅनल बसविण्यात आले आहेत. साहेब इथेच थांबले नाही तर २१ वे शतक विज्ञान, तंत्रज्ञान आणि ए. आय. चे युग आहे. येथील विद्यार्थ्यांना ए. आय. चे शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी स्वातंत्र्य ए. आय. लॅब उपलब्ध करून दिली आहे . तसेच महाविद्यालयातील सी. एच. बी. प्राध्यापकांच्या मानधनात देखील वाढ करण्यात आली आहे. विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांना चालना मिळाली. एन. एस. एस., क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, करिअर मार्गदर्शन शिबिरे यांद्वारे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात आपली गुणवत्ता दाखवण्याची संधी मिळाली. त्यामुळे या महाविद्यालयाने केवळ शिक्षण संस्था म्हणून नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे केंद्र म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. तसेच महाविद्यालयाला २०२३ मध्ये नॅक पुनर्मुल्यांकनात सी.जी.पी.ए. ३.४३ मिळवत A+ ग्रेड प्राप्त केली आहे. मुंबई विद्यापीठातील ग्रामीण भागातील महाविद्यालयामधील A+ ग्रेड मिळविणारे एकमेव महाविद्यालय आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता ग्रामीण विभागातील 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात प्रदान करण्यात आला होता.

मा. श्री. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सामाजिक बांधिलकी. त्यांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन मानले आणि त्यानुसार कार्य केले. आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न स्तुत्य आहेत. त्यांच्या दूरदृष्टीमुळे अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात यशस्वी झाले आहेत. आज मा. श्री. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेबांना श्री. मधुकर भावे यांनी 'रामशेठ' नव्हे 'दानशेठ', श्री. हरेश साठे यांनी सर्वसामान्यांचे 'आधारवड', श्री. संजय महादिक यांनी 'देवदूत' तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आधुनिक काळातील 'एकलव्य' असे संबोधले आहे.



मुंबई विद्यापीठ

सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार

प्रमाणित करण्यात येते की,
रयत शिक्षण संस्थेचे
लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा, जिल्हा-पालघर
यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता
ग्रामीण विभागातील
सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार
प्रदान करण्यात येत आहे.

प्रा. (डॉ.) रविंद्र कुलकर्णी
कुलगुरू, मुंबई विद्यापीठ

University of Mumbai

Best College Award

Certified that
Rayat Shikshan Sanstha's
Loknete Ramsheth Thakur Arts, Science and Commerce College, Mokhada, Dist.-Palghar
has been conferred with the
Best College Award
for Rural Area
for the Academic Year 2023-24

Prof. (Dr.) Ravindra Kulkarni
Vice-Chancellor, University of Mumbai

Vidyanagari, Mumbai
September 15, 2025



मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्या वतीने देण्यात आलेला 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' सन्मानपत्र व चषक.



मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्या वतीने देण्यात येणारा 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' केंद्रीय मंत्री मा. किरेन रिजीजू यांच्या हस्ते स्विकारताना संस्थेचे सचिव मा. विकास देशमुख, प्र. प्राचार्य डॉ. ए. एन. चांदोरे व माजी प्राचार्य डॉ. एल. डी. भोर.